संस्थापक :
साने गुरुजी

# साधना

शनिवार
१५ मार्च २००८
मूल्य रु. ८/-



## अनुक्रम :


- ही क्षमायाचना आहे, कर्जमाफी नव्हे!
  **— संपादकीय**
- किसान कर्जमुक्ती आणि श्रेयासाठी स्पर्धा
  **— मोहन धारिया**
- आगामी काही महिने,
  राजकीय संक्रमणाचे राहतील
  **— निरीक्षक**
- पाकिस्तानात लोकशाहीचा विजय
  **— अशोक चौसाळकर**
- ओबामा लाट अडली
  रशियात खांदेपालट झाली
  **— गोविंद तळवलकर**
- एका योद्ध्याच्या राजवटीचं अर्धशतक
  **— अशोक राजवाडे**
- जगावेगळी वेदना **— ग. प्र. प्रधान**
- आणीबाणीचे दिवस आणि न्या. खन्ना
  **— चित्रांगदा**
- निमित्त : खैरलांजी
  **— अवधूत परळकर**
- सुपर वुमन की सुपर फॅमिली
  **— वैशाली रोडे**
- एकही प्रतिक्रिया मुख्य मुद्यावर नव्हती, म्हणून
  **— पुरुषोत्तम खांडेकर**
- **प्रतिसाद**








[व्यंगचित्रे : 'द हिंदू'च्या सौजन्याने.]

# ही क्षमायाचना आहे, कर्जमाफी नव्हे!

शेतकऱ्यांना दिलेल्या अभूतपूर्व अशा कर्जमाफीमुळे दोन प्रमुख मुद्दे पुढे आले आहेत, त्यातील एक मुद्दा राजकीय असणे स्वाभाविक आहे. या कर्जमाफीचे श्रेय घेण्यासाठी मेळावे आणि प्रचारमोहिमा चालू आहेत त्यातही आश्चर्य करण्यासारखे काही नाही. लोकसभेच्या निवडणुका येत्या वर्षांत केव्हाही होऊ शकतात. त्यामुळे कर्जमाफीचा मुद्दा सुमारे २० कोटी मतदारांना थेट प्रभावित करणारा आहे. शिवाय हा मतदार तोच आहे, ज्याने 'शायनिंग इंडिया'च्या प्रचाराला न भुलता सध्याच्या राज्यकर्त्यांना सत्तेवर बसवले आहे. अर्थात, या कर्जमाफीमुळे निवडणुकांत जो संभाव्य फायदा होईल, त्यात बरेच 'जर-तर' आहेत, मात्र दुसरा एक मुद्दा आम्हांला फार महत्त्वाचा वाटतो.

'साधना'चे विश्वस्त माजी केन्द्रीय मंत्री आणि नियोजन मंडळाचे माजी उपाध्यक्ष श्री. मोहन धारिया यांनी दीड वर्षांपूर्वी संपूर्ण कर्जमाफीची मागणी करून त्यासाठी उपोषणही केले होते. त्यावेळी जनमत त्याकडे 'एक अव्यवहार्य मागणी' अशाप्रकारे पहात होते. मग गेल्या दीड वर्षांच्या कालावधीत असे काय घडले की ही मागणी मान्य करावी लागली? या मागणीमागे वाढलेला दबाव, निवडणुकांचा जवळ येणारा हंगाम, ग्रामीण भारताच्या दारिद्र्याचे विविध सरकारी आकडेवारींनी पुढे आणलेले व झोप उडवणारे चित्र आणि असेच इतर अनेक मुद्दे याबाबत मांडता येतील. परंतु या सर्वांमधून एक बाब स्पष्ट होते, ती म्हणजे गेल्या पंधरा वर्षांत देशातील 'खाउजा' (खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण) धोरणाने भारताच्या ग्रामीण भागाच्या वाट्याला जी उद्‌ध्वस्तता आली, त्याचे परिमार्जन करणे सर्व बाजूंनी अटळ बनले आहे. जागतिकीकरणाचे धोरण हे उघडपणे जगातील बड्या भांडवलदारांना (त्यात भारतातीलही भांडवलदारांचा एक वर्ग समाविष्ट आहे) सोयीचे होते. या मंडळींना कसलेही सामाजिक उत्तरदायित्व नव्हते. या धोरणाने रोजगार व सुबत्ता-समृद्धी वाढेल असे ढोल जोरजोराने पिटले जात होते. पण देशातील साठ टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे आणि राष्ट्रीय उत्पन्नातला शेतीचा वाटा मात्र घसरत २३ टक्क्यांवर येऊन पोचला आहे, याबद्दल खंत वा खेद व्यक्त केला जात नव्हता. यावर उपाय काय सुचवले गेले? शेती सोडा, शेतीचे कंपनीकरण करा; सेझमध्ये जमिनी देऊन स्वतःचा आर्थिक विकास साधा; निर्यातप्रधान शेती करा वगैरे... पण यांपैकी कोणत्याच उपायाने मूळ अरिष्टाचा मुकाबला होत नव्हता. काही उपाय तर 'रोगापेक्षा इलाज भयंकर' असे होते.

या सतरा वर्षांच्या काळात सारे लक्ष 'सेवा' व 'उद्योग' या क्षेत्रांवर केन्द्रित झाले आणि परदेशातून किती गुंतवणूक मिळाली याबद्दल बढाई मारून, शेतीकडे राजरोस दुर्लक्ष झाले; पैशाअभावी सिंचन प्रकल्प रखडले. राष्ट्रीयकृत बँकांनी 'नफा' हा एकमेव निकष मानला आणि १८ टक्के पतपुरवठा शेतीसाठी करणे सोडून दिले. शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते, अवजारे देण्याची

स्थापण्या
समता शांती
टेवुनी शुद्ध
**साधनां।**
करिती साधना
त्यांना टेवो
उत्स्फूर्त
**साधना**


**१५ मार्च २००८**
वर्ष ६० / अंक ३०

- संपादक : **नरेंद्र दाभोलकर**
- युवा संपादक : **विनोद शिरसाट**

- हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०,** येथे प्रकाशित केले.
- दूरध्वनी : **वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी, [०२०] २४४५१७२४.** संपादक : टेलिफॅक्स – २४४३२४०२. E-mail : ssadhana@vsnl.net साधना मीडिया सेंटर – २४४५९६३५ / ४१.
- वार्षिक वर्गणी : व्यक्तिगत रु. ३००/-, संस्थांसाठी रु. ४००/-
- [अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.]
- मुखपृष्ठ : **शेखर गोडबोले,** Mob. 9822503398

व्यवस्था सहकारी संस्था करेनाशा झाल्या. त्यामुळे निर्माण झालेली पोकळी मोन्सॅटोसारख्या बहुराष्ट्रीय कंपन्या भरू लागल्या. शेतमालाला पुरेसा भाव तर मिळत नव्हताच, पण त्यासाठी सहकारी व प्रक्रिया संस्था यांच्या माध्यमातून प्रयत्न करण्याऐवजी, बड्या बहुराष्ट्रीय कंपन्या सारा शेतमाल आपल्या हातांत आणण्याचा प्रयत्न करू लागल्या. कृषि विस्तार सेवेत घट झाली. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे, आर्थिक विकासाचा दर ५ टक्क्यांवरून ९ टक्क्यांपर्यंत वाढला; परंतु शेती-उत्पन्नाची वाढ मात्र ३.५ टक्क्यांवरून २ टक्क्यांपर्यंत खाली आली. कनिष्ठ दर्जाचा गहू चढ्या किमतीत आयात करावा लागला. तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया यांची आयात ४०० टक्क्यांनी वाढली.

शेती-व्यवसायाचा ऱ्हास केवळ शेतकऱ्यांनाच मारक ठरत नाही, देशालाही त्याची किंमत मोजावी लागते. त्यामुळे लक्षावधी बळीराजांच्या आत्महत्या ही त्यातील एक बाब देखील सामाजिक स्वास्थ्य किती आमूलाग्र हादरवू शकते याचे दाहक दर्शन घडवते. उपेक्षित, शोषित व सोशिक शेतकऱ्यांनी आपला मूक आक्रोश आत्महत्यांद्वारे व्यक्त केला. ज्या जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणात आत्महत्या झाल्या, तेथे विशेष पॅकेज देऊन तोडगा काढण्याचे प्रयत्न झाले. पण ते फसणारच होते. कारण या गंभीर समस्येसाठी सर्वंकष उपायांची गरज होती. आता महत्त्वपूर्ण पाऊल (साठ हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीद्वारे) उचलले गेले आहे, पण तेही अपुरे आहे. कर्जमुक्तीचा फायदा बागायती जमिनीचे कमी क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांना झाला आणि तुलनेने जास्त क्षेत्र असलेला जिरायती जमिनीच्या शेतकऱ्यांचा एक मोठा वर्ग यातून वगळला गेला. स्वाभाविकच कर्जमुक्तीच्या निकषामध्ये आणखी उदार धोरण घेण्याची मागणी पुढे येऊ लागली आहे. या जबाबदारीचा काही वाटा राज्य सरकारलाही उचलावा लागेल असे दिसते, पण तरीही खाजगी सावकारीचा प्रश्न उरतोच.

कर्जमाफीच्या या अभूतपूर्व निर्णयांमधून काही बाबी लक्षात आल्या आहेत. अशा निर्णयावर पूर्वी उद्योगपती, मध्यमवर्ग व शेअरबाजाराची चिंता वाहणारे लोक टीकेची झोड उठवत. यावेळी मात्र तसे जवळपास झालेले नाही. 'शेतकऱ्यांनी व्यसन टाळावे, आळस सोडावा, लग्नावरचा खर्च कमी करावा, म्हणजे कर्जबाजारी होऊन आत्महत्या करणे टळू शकेल', असे अनाहूत सल्ले देण्यात आले नाहीत. याचे वेगवेगळे अर्थ होऊ शकतात. यापेक्षा मोठ्या रकमेची आणि शेतकऱ्यांच्या तुलनेने मूठभर नव्हे चिमुटभरही नसलेल्या उद्योगपतींची कर्जे माफ केली जातात, हे वास्तव सहजासहजी डोळ्यांआड करण्यासारखे नव्हते. देशाचा संरक्षण खर्च बघता-बघता प्रतिवर्षी एक लाख कोटींवर पोचला आहे, त्याबद्दल तर बोललेच जात नाही. व्यसन आणि लग्न यांतील खर्च अथवा कामचुकारपणाचा दुर्गुण हे या देशातील राष्ट्रीय रोग आहेत, त्याबाबत केवळ शेतकऱ्यांकडे अंगुली निर्देश करणे अन्यायकारक आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी लाखाचा आकडा ओलांडला; त्यामुळे थोडीशी संवेदनशीलता असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या काळजाला, मग भले ती कितीही श्रीमंत असो, या वेदनेची धग थोडीतरी जाणवली असणारच. त्याबरोबरच ग्रामीण भागामध्ये उपलब्ध असणारी प्रचंड बाजारपेठ मोडून पडणे आणि एक फार मोठा जनसमूह सतत अगतिक अस्वस्थ व संतप्त राहणे यातले धोकेही उद्योग व व्यापारी वर्गाच्या लक्षात आले असणार. या सगळ्याचा एकत्रित व थोडक्यात अर्थ असा की या देशातील बहुसंख्य शेतकऱ्यांचे प्रश्न आता ऐरणीवर येण्याची शक्यता वाढू लागली आहे. कारण आपल्या देशाने स्वीकारलेले विकासाचे प्रारूप हे उघडपणे शेतीकडे उपेक्षेने बघणारे होते. आताच्या कर्जमाफीच्या निर्णयाने या उपेक्षेला एक धक्का बसला आहे; पण खरे पाहिले तर ही 'कर्जमाफी' नाही तर 'माफीनामा' आहे. धनिक वर्गाने व राज्यकर्त्यांनी (आजवर केलेल्या अपराधासाठी) व्यक्त केलेली 'क्षमायाचना' आहे. ही क्षमायाचना निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केली आहे आणि त्यामुळे त्यात 'दानशूरपणा'चा आव आणलेला आहे. पण असे असले तरी, बहुसंख्य शेतकऱ्यांच्या अनेकविध प्रश्नांसाठी आणि देशाच्या नियोजनात ते प्रश्न मध्यवर्ती आणण्यासाठी या निमित्ताने निर्माण झालेला दबाव ही मोठीच उपलब्धी आहे. हा दबाव असाच कायम ठेवावयास हवा. सिंचनाच्या सुविधांपासून, कमी व्याजदराच्या कर्जांपासून, शेतमालाला रास्त भाव मिळेपर्यंतच्या प्रवासात बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची अनिवार्यता, या सामूहिक दबावातून निर्माण करावयास हवी. देशाच्या कृषिक्षेत्राच्या विकासाची मंदावलेली गती लक्षात घेतली तर या प्रश्नांचे गांभीर्य अधिकच तीव्रपणे जाणवते. कर्जमुक्तीच्या दिशेने पाऊल टाकताना हे विदारक चित्र एकवटून समोर आले आहे, ते बदलून टाकण्याचे आव्हानही तेवढ्याच राजकीय व सामाजिक निर्धाराने स्वीकारावयास हवे. ■

मोहन धारिया

# किसान कर्जमुक्ती आणि श्रेयासाठी स्पर्धा

अर्थमंत्री पी.चिदंबरम यांनी सर्व अल्पभूधारक व छोट्या शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले आणि तुलनेने मोठ्या शेतकऱ्यांना २५% कर्जमाफीचा निर्णय अर्थसंकल्पात जाहीर केला, त्या क्षणापासून किंबहुना तो जाहीर होण्यापूर्वीच व्यवस्थित तयारी करून त्या निर्णयाचे श्रेय घेण्याची स्पर्धा सर्व लहान-मोठ्या पक्षांनी चालविली आहे. फटाके उडवून, पेढे वाटून व मेळावे घेऊन जल्लोष केला जात आहे. तयार ठेवलेली पोस्टर्स व कटआऊट्स मोक्याच्या ठिकाणी लावण्यात आली आहेत. प्रादेशिक भाषेतील व इंग्रजी वृत्तपत्रामध्येही पूर्ण पानभर जाहिराती प्रसिद्ध झाल्या. कर्जमाफीचे श्रेय कोणी घ्यावे अथवा कोणाला द्यावे या वादात जाण्याऐवजी सामान्य जनतेला राजरोस फसविण्याचा जो प्रकार चालू आहे, त्याबाबतची वस्तुस्थिती जनतेसमोर येणे योग्य ठरेल.

**श्रेयासाठी चाललेल्या चढाओढीऐवजी या कर्जमाफीच्या योजनेमध्ये ज्या मूलभूत त्रुटी आहेत, त्यांचा शोध घेऊन ५ एकरवरील कोरडवाहू शेतकऱ्यावर झालेला अन्याय दूर करणे, ताबडतोब पतपुरवठा सुरू होणे, व्याजाचा दर ४ टक्क्यावर आणणे, शेतीमालाला किफायतशीर भाव देणे, निसर्गाच्या लहरीविरूध्द विमा संरक्षण देणे, आदी मूलभूत मागण्याचा पाठपुरावा करण्यासाठी आंदोलन सुरू करावे, असे या श्रेयग्रस्त पक्षांना माझे आवाहन आहे.**

प्रचलित मध्यवर्ती शासनाच्या कारकिर्दीत भारतामध्ये सुमारे १,५०,००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यामध्ये महाराष्ट्राचा क्रमांक पहिला आहे. विदर्भातील शेतकऱ्यांच्या संघटनांनी व नेत्यांनी याचा तीव्र निषेध व्यक्त करण्यास सुरूवात केली तेव्हा शासन जागे झाले आणि मुख्यमंत्र्यांनी पॅकेज जाहीर केले. काही काळाने मा.पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग विदर्भात आले आणि त्यांनी जून २००६ मध्ये खास रु.३८७३.२६ कोटी रुपयांचे पॅकेज मंजूर केले. त्यामधून शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याऐवजी आत्महत्या चालूच राहिल्या. वनराईच्या कार्यासाठी मी विदर्भात गेलो असताना, तेथील दारूण परिस्थितीची मला कल्पना आली आणि मग मध्यवर्ती शासनाने या प्रकरणी सत्वर लक्ष घालावे अशी मागणी मी सुरू केली. संबंधित सर्व संघटनांनी आणि माझ्या अध्यक्षतेखालील देशातील सुमारे ६००० स्वयंसेवी संस्थांच्या राष्ट्रीय महासंघाने मला साथ देण्याचे मान्य केले. विदर्भातील संघटना,काही नेते, देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे व काही पत्रकार आदी वगळता या समस्येवर त्यावेळी कोणताही पक्ष फारसे बोलत नव्हता. आम्हा मित्राला ते तीव्रतेने जाणवले, मग पत्रव्यवहार व बैठका चालू राहिल्या आणि २ आक्टोबर२००६ रोजी गांाधी जयंतीच्या दिवशी पुणे येथील आगाखान पॅलेसमधील कार्यक्रमाचे वेळी मी उपोषणाचा निर्णय घेतला. पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग व कित्येक केंद्रीय नेते माझे जवळचे मित्र होते, ते या उपोषणाची गांभीर्याने दखल घेतील व शेतकऱ्यांना न्याय देतील असे मला वाटत होते. त्या निर्णयाला स्वयंसेवी संस्थांच्या महासंघाचे श्री.एल.व्ही.सप्तर्षी, आदर्श गाव समितीचे कार्याध्यक्ष कै.बापूसाहेब देशपांडे, अफार्मचे डॉ.मुकुंद घारे, कृषिशास्त्रज्ञ डॉ.बुधाजीराव मुळीक, देशोन्नतीचे संपादक श्री.प्रकाश पोहरे आदींनी पाठिंबा दिला. उपोषणासंबंधी पाठविलेल्या पत्राचे गांभीर्य लक्षात घेऊन पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी चर्चेसाठी दिल्लीला बोलावले. आम्हा सर्वासमवेत पंतप्रधानांची दि.३० ऑक्टोबर २००६ रोजी मोकळ्या वातावरणात प्रदीर्घ चर्चा झाली. मा.पंतप्रधानसमवेत अर्थमंत्री चिदंबरम, कृषीमंत्री शरद पवार, अल्पसंख्यांक खात्याचे मंत्री बॅ.अब्दुल रेहमान अंतुले, राज्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आदी हजर होते. आम्हाला मिळालेल्या माहितीच्या आधारे पाच एकर खालील कोरडवाहू जमीन असलेल्या शेतकऱ्यांच्या मुक्तीसाठी सुमारे रु.१५००० कोटीपेक्षा कमी भार शासनावर पडेल असे आम्ही स्पष्ट झाले. शासनाने रिझर्व्ह बँकेमार्फत ही माहिती प्राप्त करावी असाही आग्रह आम्ही केला.'मध्यवर्ती शासनाने या समस्येचा सांगोपांग विचार करून, एकूण किती आर्थिक बोजा पडेल त्याची माहिती घेण्यासाठी डॉ. राधाकृष्णन समिती नेमली आहे; समितीचा अहवाल येईपर्यंत तुम्ही उपोषणाचा निर्णय स्थगित करावा' अशी विनंती मा.पंतप्रधानांनी केली. मात्र निर्णय केव्हा घेणार, यासंबंधी ठोस आश्वासन देण्यास नकार दिला. त्या बैठकीत मा.अर्थमंत्री व कृषीमंत्री यांनी कोणत्याही प्रकारे पाठिंबा दिला नाही, उलट एवढा मोठा भार शासनाला पेलवणार नाही असेच सूचित केले. बॅ.अंतुले यांनी मात्र

उघडपणे 'तुमची मागणी रास्त आहे, मुख्यमंत्री असताना मी किसान कर्जमुक्तीचा निर्णय घेतलेला आहे. पण मा.पंतप्रधानांनी केलेल्या विनंतीनुसार तुम्ही निर्णय स्थगित करावा' असा आग्रह केला. सध्या राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीमध्ये विद्यमान कृषीमंत्री महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी शेतकऱ्यांना कर्जमुक्ती दिली, अशी माहिती ठळकपणे प्रसिद्ध होत आहे. पण पुलोदच्या अथवा नंतरच्या काळात सर्व शेतकऱ्यांची कर्जे माफ करण्याचा निर्णय केव्हाही झालेला नाही. ३० ऑक्टोबरच्या चर्चेच्या वेळी दिल्लीला असताना श्री.शरद पवारांनी कर्जमुक्तीचा खंबीर निर्णय घ्यावा अन्यथा 'भूमिपुत्र म्हणून मी मंत्रीमंडळात राहू शकणार नाही,' असे स्पष्टपणे सांगावे असा आग्रह मी केला होता. 'तसे केले तर देशातील सर्व शेतकरी तुम्हाला दुवा देतील' असेही मी सुचविले होते, पण दुर्दैवाने त्यांनी मान्यता दिली नाही. दुसऱ्या दिवशी श्री.बापूसाहेब देशपांडे यांना आपल्या घरी बोलावून घेऊन त्यांनी आपली असमर्थता व्यक्त केली. शिवाय मा.पंतप्रधानांनी सहानुभूतीपलीकडे कोणतेही ठोस आश्वासन दिले नव्हते, म्हणूनच केवळ नाईलाजास्तव उपोषणाचा निर्णय मला घ्यावा लागला. मा.पंतप्रधानांनी त्यावेळीच आमच्या मागण्या मान्य केल्या असत्या तर कर्जमाफीचे सर्व श्रेय शासनाला व प्रामुख्याने काँग्रेस पक्षाला मिळाले असते. ॲड.विजय मोरे व काही अन्य सहकारी मित्र दि. १४ नोव्हेंबर २००६ च्या उपोषणात सहभागी झाले, पण उपोषणाच्या काळात केंद्रातील अथवा राज्य शासनातील कोणीही माझ्या प्रकृतीची साधी चौकशीदेखील केली नाही. तेव्हा माझे ८२ वर्षांचे वय संपत आले हाते. ६-७ दिवसांच्या उपोषणानंतर किडनीच्या गंभीर त्रासामुळे माझी प्रकृती झपाट्याने ढासळू लागली. त्यावेळी प्रिय मित्र ग.प्र.प्रधानमास्तर , मुकुंदराव किर्लोस्कर, डॉ.बाबा आढाव, डॉ.मुकुंद घारे, डॉ. बुधाजीराव मुळीक, कुमार जोशी व काही मान्यवर मित्र भेटण्यासाठी आले आणि त्यांनी उपोषण सोडण्याचा आग्रह धरला. 'देशातील कोरडवाहू शेतकऱ्यांचा हा प्रश्न तुम्ही प्रथमच ऐरणीवर आणला आहे. तुमचा जीव देशाला अधिक मोलाचा वाटतो, तुम्ही उपोषण सोडले नाही तर आम्ही सर्वजण उपोषणास बसू' असे त्यांनी मला ठणकावून सांगितले. त्यानंतर दोन दिवसांत प्रधानसरांच्या हस्ते उपोषण सोडण्याचे मी मान्य केले. दरम्यान महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी स्वत: येऊन शासनाच्या वतीने माझ्या उपोषणातील सहकारी मित्र तसेच वृत्तपत्रांचे बातमीदार व विविध वाहिन्यासमोर आमच्या मागण्यांना पाठिंबा देण्याचे व महाराष्ट्र शासनामार्फत दिल्लीत केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. ठरल्याप्रमाणे ज्येष्ठ गांधीवादी प्रधानसरांच्या हस्ते मी व सहकारी मित्रांनी उपोषण सोडले.

त्या उपोषणामुळे शासनात चर्चा सुरू झाली, पण निर्णय लागेना. आत्महत्या चालूच होत्या. पुन्हा बैठका, परिषदा आणि मा.पंतप्रधान मनमोहन सिंग, संयुक्त आघाडीच्या नेत्या सोनिया गांधी,केंद्रीय मंत्री व विरोधी पक्षाच्या नेत्यांना पत्र पाठवून आम्ही त्या मागण्या मान्य करण्यासाठी आग्रह सुरू ठेवला.

ऑक्टोबर २००७ च्या पहिल्या आठवड्यात दिल्लीला गेलो असताना मा.पंतप्रधान व मा.कृषीमंत्र्यांची भेट घेतली. त्यावेळी मा.पंतप्रधान म्हणाले, 'त्यांची विनंती मी मान्य केली असती तर बरे झाले असते.' त्यावेळी न्यायाच्या तराजूतील मा.पंतप्रधानांनी वारंवार केलेल्या विनंतीपेक्षा असंख्य आत्महत्याग्रस्त विधवा महिलांचे अश्रूंचे पारडे अधिक जड झाले आणि त्यामुळे आपल्या विनंतीला मान देणे मला अशक्य झाले नाही,' असा खुलासा मी केला. त्या चर्चेच्या वेळी 'मी काही ब्रिटीश शासनाचे निर्णय गॅझेटमध्ये पहात आहे' असे म्हणता क्षणीच मा.पंतप्रधानांनी 'ब्रिटीश शासनाने कठीण काळात शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले होते असे मलाही समजले आहे व तुमच्या मागण्यांवर गांभिर्याने चर्चा करीत आहोत' असे आश्वासन दिले. दुसऱ्या दिवशी मा.कृषीमंत्री श्री.शरद पवार यांची भेट घेतली. त्या भेटीतही पवार म्हणाले, मा.पंतप्रधानांनी कर्जमुक्तीची गांभीर्याने दखल घेतली असून काही मार्ग लवकर काढा असे सुचविले आहे. परदेशी शासन किसानांना कर्जमुक्त करते पण आपण करीत नाही हे योग्य नाही,असे त्यांनीही सांगितले. थोडक्यात माझ्या दिल्लीवारीत या प्रश्नावर लवकरच मार्ग निघेल असा दिलासा घेऊन व आंदोलन सुरू ठेवावयाचे असे ठरवून मी परत आलो.

ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये काहीही घोषणा झाली नाही. म्हणूनच ठरल्याप्रमाणे सुमारे १००० कार्यकर्त्यांची परिषद दिनांक २२-२३ डिसेंबर२००७ मध्ये बारामती येथे घेण्याचे आम्ही जाहीर केले. दरम्यान मा.कृषीमंत्री अकोला कृषी विद्यापीठात एका कार्यक्रमासाठी आले होते. तेव्हा सर्व शेतकऱ्यांची सर्व कर्जे माफ केल्याशिवाय शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी उभारी मिळणार नाही, असे म्हणाले. १२ डिसेंबर २००७ रोजी वाढदिवसाचे दिवशी मा.शरद पवार पुण्याला आले असताना अभिनंदनासाठी बारामती होस्टेलवर मी गेलो होतो. तेथे खूप गर्दी झाली होती. त्यावेळी 'मला तुमच्याशी महत्त्वाची चर्चा करावयाची आहे' असे सांगून कृषीमंत्र्यानी मला थांबवून घेतले. त्यांच्या तेथील कार्यालयात श्री.पतंगराव कदम, विजयसिंह मोहिते पाटील, अजितदादा पवार हे मंत्रीही उपस्थित होते. तेव्हा विश्वासात घेऊन ते म्हणाले 'तुमच्या आग्रहाच्या पुढे जाऊन सर्व शेतकऱ्यांना कर्ज माफ करण्याचे आम्ही ठरवीत आहोत. पण कर्जे परत फेडावयाचे नाही, अशी मानसिकता निर्माण होऊ नये म्हणून पुढील पाच वर्षे व्याजासह कर्ज पुरवठा केल्यासच त्या शेतकऱ्याची दरवर्षी २०% प्रमाणे कर्जवसुली धरून कर्जमुक्त करावयाचे. तत्पूर्वी त्याला पतपुरवठा सुरू ठेवण्याचा विचार आहे. याकामी सुमारे

१,१६,००० कोटी रक्कम लागणार असून, त्यासाठी उद्या दिनांक १३ डिसेंबरला रिझर्व्ह बँक, राष्ट्रीयकृत बँका, नाबार्ड आदींशी चर्चा ठेवली असून त्यासाठी सह्याद्री अतिथीगृहात मुंबईला मी बैठक बोलावली आहे.

वरील योजनेचे मी स्वागत केले. मात्र 'व्याज दराचे व अन्य मागण्यांचे काय? अशी विचारणा करून पैसे उभे करणे अवघड नाही असे मी सांगितले.' जे सरकार शहरासाठी १,६५,००० कोटी खर्च करू शकते व कोट्यवधी रुपयांचे श्रीमंत व्यावसायिकांचे कर माफ करते. त्यांना शेतकऱ्यांचे सुमारे १,१६,००० कोटीचे कर्ज भागवणे अवघड नाही. मी लेखी सुचविल्याप्रमाणे सुमारे २० लाख कोटी रुपयांचा काळा पैसा सक्तीने बाहेर काढला व गर्भ श्रीमंतांच्या अतिरिक्त मालमत्तेवर लक्झरी टॅक्स बसवला तर काही लाख कोटी रुपये सरकारला सहज उभारता येतील असे सुचविले. त्यावर 'तुमची सूचना साम्यवादी स्वरूपाची आहे' असे उद्‌गार त्यांनी काढले. मी काही म्हणत असतानाच बाहेरील प्रचंड गर्दीमुळे आम्हाला अर्धा तास चाललेली चर्चा थांबवावी लागली.

या आशादायी वातावरणात बारामती येथे ॲड.विजय मोरे व त्यांच्या सहकारी मित्रांनी घेतलेली महत्त्वपूर्ण परिषद पूर्णपणे यशस्वी झाली. परिषदेच्या जागेजवळच तेथील राष्ट्रवादी काँग्रेसने एक मेळावा मुद्दाम आयोजित केला होता, पण आमच्या परिषदेवर त्याचा काही परिणाम झाला नाही. सतत दोन दिवस स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांनी हजर राहून त्या प्रयत्नांना चोख उत्तर दिले. या परिषदेत श्री.शरद पवार यांनी सर्व शेतकऱ्यांची सर्व कर्जे माफ करण्याची घोषणा केली असतानाही आम्ही सर्व कोरडवाहू शेतकऱ्यांची सर्व कर्जे व पाच एकरपर्यंत सिंचनावरील कर्जे माफ करावीत अशी मागणी केली. तसेच फक्त कर्जमुक्तीने आत्महत्या थांबणार नाहीत. त्यासाठी कायम स्वरूपी उत्पादनाला किफायतशीर किंमत, सर्व पिकासाठी बियाणे, सतत पतपुरवठा, गोदामे, शीतगृहे आदी सुविधा देण्याची गरज आहे, अशा सर्वंकष मागण्या परिषदेने मंजूर केल्या. त्याचा पाठपुरावा करण्यासाठी महाराष्ट्रात व अन्य राज्यांत दौरे करण्याचा निर्णय परिषदेने घेतला. त्या निर्णायामध्ये जो पक्ष अथवा शासन कर्जमुक्ती करणार नाहीत अथवा विरोध करतील त्यांचे उमेदवार आगामी निवडणुकीत पराभूत करा असा महत्त्वाचा निर्णय होता. माझ्या नेतृत्वाखालील असंख्य स्वयंसेवी संस्थांनी पत्रे व तारांचा भडीमार सुरू केला. राष्ट्रवादीचे खासदार श्री.दत्ता मेघे यांनी धोका पत्करून वर्धा, यवतमाळ, नागपूर आदी ठिकाणी माझे भव्य कार्यक्रम आयोजित केले. २६ जानेवारी या प्रजासत्ताकदिनी विदर्भातील प्रत्येक जिल्हा अधिकाऱ्यासमोर धरणे धरून शासनाला आमच्या मागण्या सादर करण्यात आल्या. सर्व विदर्भातील वातावरण गरम झाले होते. त्यातच शिवसेनेने कर्जमुक्तीसाठी भव्य मेळावे घेऊन शासन विरोधी वातावरण निर्माण केले. त्यांना मी उघडपणे साथ दिल्यामुळे विदर्भात सत्ताधारी पक्षाचा एकही आमदार अथवा खासदार निवडून येणार नाही, अशी खात्री पटल्यावर सत्ताधारी खडबडून जागे झाले. आमच्या मागण्या मान्य कराव्याच लागणार असे दिसताक्षणीच काँग्रेस व राष्ट्रवादीच्या नेत्यांनी दिल्लीच्या आदेशानुसार कर्जमुक्तीची जाहीर मागणी करण्यास सुरूवात केली. महाराष्ट्र, राजस्थान, पंजाब आदी राज्यातील नेते व शेतकऱ्यांनी १० जनपथसमोर मेळावा घेतला. तेथे यु.पी.ए. अध्यक्ष सोनिया गांधी यांनी प्रथमच कर्जमुक्तीला जाहीर पाठींबा देऊन तसा सल्ला पंतप्रधानांना देण्याची ग्वाही दिली. श्रेयासाठी बजेटपूर्वी केलेले हे नाटक आहे, अशी टिका वृत्तपत्रासह कित्येकांनी केली. अधिकाररूढ पक्षाला व उमेदवारांना पराभूत करणारे हे आंदोलन फक्त महाराष्ट्रापुरते नव्हे तर आमच्या ६००० संस्थामार्फत सर्व देशात होईल व पुन्हा सत्तेवर येणे अशक्य होईल ही खात्री पटल्यामुळेच विद्यमान शासनाने सर्व विरोध लक्षात घेऊन २९ फेब्रुवारी २००८ रोजी सादर झालेल्या अर्थ संकल्पात ६०,००० कोटी रुपयांची तरतूद करून (५ एकरखालील सर्व शेतकऱ्यांचे सर्व कर्ज व त्यावरील शेतकऱ्याचे २५%) कर्ज मुक्तीची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. याकामी कर्जमुक्तीला पाठींबा देणारे तेलगुदेशमचे नेते डॉ.चंद्राबाबू नायडू यांच्या नेतृत्वाखालील तिसऱ्या आघाडीने घेतलेली भूमिकाही महत्त्वाची ठरली.

२९ फेब्रुवारी रोजीच सर्वत्र मोठी पोस्टर्स व बॅनर्स फडकले गेले. इतकेच नव्हे तर श्रेय मिळावे म्हणून दोन दिवसांत पूर्णपानभर जाहीराती प्रसिद्ध केल्या. पूर्व नियोजनाशिवाय ते शक्य नव्हते. 'आमच्यामुळेच कर्जमाफी मिळाली' असा फसवा प्रचार अद्यापही चालू आहे. शिवसेनेनेही तोच उपक्रम चालविला असला तरी तसे करण्याचा त्यांना थोडाफार अधिकार आहे. सध्याची श्रेयासाठी चाललेली स्पर्धा व केविलवाणी धडपड पाहून ह्या सर्व इतिहासामागील सत्य माहीत असलेल्या माझ्यासारख्या व्यक्तीची मनसोक्त करमणूक होते. विदर्भाच्या दौऱ्यात ज्या प्रेमाने व आदराने आमच्या उपोषणाचे स्वागत झाले त्याची प्रत्यक्ष प्रचिती मी घेतली आहे. मला आनंद आहे की आजच्या सत्ताप्रेमी व भोगवादी वातावरणात त्यागवादाचे महत्त्व अजूनही जनतेला अत्यंत मोलाचे वाटते. श्रेयासाठी चाललेल्या चढाओढीऐवजी या कर्जमाफीच्या योजनेमध्ये ज्या मूलभूत त्रुटी आहेत, त्यांचा शोध घेऊन ५ एकरवरील कोरडवाहू शेतकऱ्यावर झालेला अन्याय दूर करणे, ताबडतोब पतपुरवठा सुरू होणे, व्याजाचा दर ४ टक्क्यावर आणणे, शेतीमालाला किफायतशीर भाव देणे, निसर्गाच्या लहरीविरूध्द विमा संरक्षण देणे, आदी मूलभूत मागण्याचा पाठपुरावा करण्यासाठी आंदोलन सुरू करावे, असे या श्रेयग्रस्त पक्षांना माझे आवाहन आहे.

**मोहन धारिया**
वनराई, अदित्य रेसिडेन्सी, मित्रमंडळ, पुणे ९.
फोन : २४४४०३५१

दिल्ली दरवाजातून...

# आगामी काही महिने राजकीय संक्रमणाचे राहतील!

निरीक्षक

**कारत यांनी हा दम दिल्यानंतर ज्येष्ठ मार्क्सवादी ज्योति बसू यांनी तर युपीए आणि डावे यांच्यातील हे राजकीय संबंध अशा रीतीने कितीकाळ टिकतील असा प्रश्न केला आहे. भाजपला रोखण्यासाठी ही तडजोड केली जात आहे परंतु हे कितीकाळ असा प्रश्न बसू यांनी केला आहे. त्यातूनच मार्क्सवाद्यांनी आता तिसऱ्या पर्यायाची भाषा पुन्हा सुरू केली आहे. मार्क्सवादी कम्मुनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन मार्चच्या अखेरीला होत आहे त्यामध्ये यासंदर्भातील डाव्यांच्या भूमिकेची रूपरेषा जाहीर होणे अपेक्षित आहे. आगामी काही महिने हे राजकीय संक्रमणाचे राहतील.**

२००८-०९चा केंद्रीय अर्थसंकल्प वाजतगाजत सादर केला गेला. अपेक्षेप्रमाणे त्यामध्ये शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्मात आली. चार कोटी शेतकऱ्यांना (लहान-मध्यम) त्याचा लाभ मिळणार आहे. लहान-मध्यम शेतकऱ्यांमध्ये दोन हेक्टरपर्यंत जमीन असलेल्या शेतकऱ्यांचा समावेश आहे. परंतु त्यावरूनही नवीन वाद निर्माण होत आहे. विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार नाही असे सांगण्यात आले आहे. नागपूरचे लोकप्रतिनिधी आणि केंद्रीयमंत्री विलास मुत्तेमवार यांनी पंतप्रधानांना पत्र लिहून या अडचणीकडे लक्ष वेधले आहे. सावकारांकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचे काय, असे प्रश्नही उपस्थित केले जाऊ लागले आहेत. परंतु याच्याच जोडीला कर्जमाफीच्या ऐतिहासिक घोषणेचा लाभ घेण्यासाठी राजकीय पक्षांमध्ये चढाओढ, स्पर्धा, परस्परांवर कुरघोडी करण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. यामध्ये देशातला एकही पक्ष मागे नाही. परंतु काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप व शिवसेना हे पक्ष श्रेयाच्या स्पर्धेत आघाडीवर आहेत.

कर्जमाफीचा गाजावाजा करतानाच काँग्रेसने भारत-अमेरिका अणू-कराराचा मुद्दाही पुन्हा पोतडीतून बाहेर काढून त्यावर आक्रमक भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. गेले काही महिने तो बासनात गेल्यासारखा होता, पण आता पुन्हा त्यावर चर्चा होऊ लागली आहे. दुसरीकडे विविध राजकीय शर्यतींमध्ये आपणही मागे पडू नये म्हणून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि त्यांच्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीनेही अणू-करारावरून डरकाळ्या फोडून निर्वाणीचे इशारे देण्यास सुरुवात केली आहे. ही सर्व चिन्हे देशाची लोकसभा निवडणुकीच्या दिशेने सुरू झालेल्या वाटचालीची आहेत. लोकसभा निवडणूक ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणार की मार्च-एप्रिल-२००९ मध्ये ठरलेल्या वेळापत्रकानुसार होणार एवढाच प्रश्न अनुत्तरित आहे. परंतु सध्याच्या हालचाली पाहता निवडणुका कदाचित याच वर्षअखेरीला होऊ शकतात. त्यामुळे वरील मुद्यांच्या बरोबरीने निवडणुका कधी होणार याची चर्चा देखील राजकीय वर्तुळात जोरदारपणे सुरू आहे. सर्वजण आपापले आडाखे मांडत बसले आहेत. काँग्रेसने वेळापत्रकापूर्वी निवडणुका घेण्याबाबत अनुकूलता दाखविलेली असली, तरी त्यांच्या आघाडीतील घटकपक्ष त्यासाठी तयार होण्याची शक्यता नाही. निवडणुकीनंतर पुन्हा सत्तेत येण्याची खात्री नसल्यानेच शेवटच्या क्षणापर्यंत सत्तेत राहण्याची घटकपक्षांची धडपड दिसून येते. त्यामुळे काँग्रेसला स्वतःला लवकर निवडणुकांचे वेध लागलेले असले, तरी घटकपक्ष त्यांना ते करू देणार नाहीत अशी स्थिती आहे. रेल्वेमंत्री लालूप्रसाद तर मुदतपूर्व निवडणुकांच्या पूर्ण विरोधात आहेत. बिहारमधील राजकारणात लालूप्रसाद एकाकी पडले आहेत आणि त्यामुळे त्यांना कोणत्याही परिस्थितीत त्या वेळापत्रकापूर्वी नको आहेत. द्रमुक, राष्ट्रवादी काँग्रेस यांचीही भूमिका याहून वेगळी नाही. त्यामुळे देशावर लवकर निवडणुका लादण्याचा काँग्रेसचा प्रयत्न कितपत यशस्वी होईल हे सांगणे कठीण आहे.

अर्थमंत्री पी.चिदंबरम यांनी देशाला लोकप्रिय स्वरूपाचा अर्थसंकल्प दिला आहे. लहान व मध्यम शेतकऱ्यांना कर्जमाफी हा त्यातील केंद्रबिंदू आहे. महाराष्ट्रातील जवळपास ७५ टक्के शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळेल असे सांगण्यात येते. चिदंबरम यांनी अर्थसंकल्प सादर करताना आपल्या पोतडीतून लोकप्रिय योजनांचा पाऊस पाडला आहे. परंतु महागाई किंवा चलनफुगवटा आटोक्यात राखणे, राजकोषीय किंवा वित्तीय तुटीवर नियंत्रण आणि आर्थिक विकासाचा सध्याचा वेग कायम राखणे ही तीन उद्दिष्टे प्रमुख असल्याचे चिदंबरम यांनी सांगितले. परंतु अर्थसंकल्प सादर केल्यानंतर एका आठवड्याच्या आत चलनफुगवटा किंवा महागाईचा दर ५.०२ टक्क्यांवर गेला. हा दर पाच टक्क्यांच्या आत ठेवणे हे उद्दिष्ट असल्याचे अर्थमंत्र्यांचे म्हणणे होते, परंतु पहिल्या आठवड्यातच त्यांचा अपेक्षाभंग झाला. प्रामुख्याने जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीमुळे हा दर वाढल्याचे सांगितले गेले. जीवनावश्यक वस्तुंच्या पुरवठ्यात

निर्माण होत असलेल्या अडचणी व अडथळे हे या महागाईचे प्रमुख कारण असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे लोकांची वाढती खरेदी क्षमता व मागणी आणि त्या प्रमाणात पुरेशा पुरवठ्याचा अभाव यातून महागाई निर्माण होत असल्याचे अर्थमंत्र्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे पुरवठा सुरळीत करणे एवढा एक प्रमुख उपाय काटेकोरपणे अमलात आणणे हाही एक अग्रक्रमाचा मुद्दा मानला जात आहे. हे सांगतानाच महागाई कमी होण्याची शक्यता कितपत आहे, याबाबतही अर्थशास्त्री इशारे देत आहेत. कारण वाढती मागणी व अपुरा पुरवठा यामुळे अन्नधान्याचे भाव जगभरातच वाढत असल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे आणि या समस्येवर अद्याप उपाय सापडलेला नाही. भारतही त्याला अपवाद नाही आणि त्यामुळेच येणारा काळ परीक्षेचा ठरणार आहे. जगातील प्रमुख अन्नधान्योत्पादन करणाऱ्या देशांमध्ये अन्नधान्याचा वापर इथेनॉल या पर्यायी इंधनासाठी मोठ्या प्रमाणात केला जात असल्याने खाण्यासाठी अन्नधान्याची कमतरता निर्माण होऊ लागली आहे. यावर प्रमुख देशांनी परस्परात विचारविनिमयही सुरू केला आहे.

अर्थसंकल्पात लोकप्रिय घोषणा असल्या तरी रोजगारनिर्मितीसारख्या मुद्यावर त्यामध्ये फारसा भर देण्यात आलेला नाही. त्यासंदर्भात अर्थमंत्र्यांनी चातुर्याने बगल दिली आहे. अर्थसंकल्पपूर्व पाहणी अहवालात देशातील संघटित क्षेत्रात (सरकारी व खासगी दोन्ही) असलेल्या रोजगाराची टक्केवारी घटल्याचे नमूद करण्यात आले आहे. अर्थसंकल्पात रोजगारनिर्मितीच्या मुद्यावर फारसा भर दिला नसल्याकडे लक्ष वेधले असता, त्यांनी वरील पाहणी अहवालातील आकडेवारीचाच संदर्भ दिला. ही आकडेवारी २००५ पर्यंतची आहे. २००६-०७ची आकडेवारी मिळालेली नाही परंतु आर्थिक विकासाचा सरासरी दर आठ टक्क्यांच्या पुढे असल्याने त्याचे प्रतिबिंब रोजगारनिर्मितीमध्येही पडणे अटळ आहे आणि ते निश्चित पडलेले असेल असा दावा त्यांनी कोणताही पुरावा नसताना केला. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पपूर्व पाहणी अहवालातही 'रोजगारविहीन आर्थिक विकासा'बद्दल चिंता व्यक्त केली होती. नियोजन मंडळाच्या म्हणण्यानुसार वाढ ही रोजगारविरहित नाही. परंतु नव्याने शिक्षित होणारे तरुण आणि त्यांच्या प्रमाणात रोजगाराच्या संधी वाढत नसल्याने ही विकास-वाढ स्थिर होते व ही स्थिती चांगली नाही. परंतु या समस्येवर वर्तमान अर्थसंकल्पात कोणताही प्रकाश टाकण्यात आलेला नाही किंवा त्याबाबत फारशी चर्चाही नाही. थोडक्यात चिदंबरम यांनी सर्वसाधारण लोकांना आवडेल असा अर्थसंकल्प सादर करून 'संमोहनास्त्र' सोडले आहे आणि काँग्रेस त्या संमोहनाच्या साह्याने निवडणुकीसाठी कंबर कसू पहात आहे.

अणुकराराच्या मुद्यावर डावे पक्ष सरकार पाडू शकणार नाहीत, कारण सरकार पाडले तर डावे पक्ष शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या रागाचे बळी ठरतील. कारण सरकार पाडल्यास अर्थसंकल्पाची फळे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे अशक्य होईल असे एका मंत्र्याने मोठ्या फुशारकीने सांगितले. काँग्रेस पक्षानेही अणुकराराबाबत 'इंटरनॅशनल ॲटॉमिक एजन्सी'बरोबरच्या वाटाघाटी बहुतांशाने यशस्वी झालेल्या आहेत असा दावा करून आता त्यातून तयार झालेला मसुदा आता डाव्या पक्षांनाही मान्य होऊ शकतो असे म्हटले. काँग्रेस पक्षाने ही आक्रमक भूमिका घेतल्याबरोबर मार्क्सवाद्यांचे सरचिटणीस प्रकाश कारत यांनी लगेचच अणुकरार हा देशहिताचा नाही आणि त्यावरील डाव्यांची भूमिका बदललेली नाही आणि सरकारने काही वेडे साहस केल्यास त्याचे परिणाम भोगावे लागतील असा दम तत्काळ देऊन टाकला. कारत यांनी हा दम दिल्यानंतर ज्येष्ठ मार्क्सवादी ज्योति बसू यांनी तर युपीए आणि डावे यांच्यातील हे राजकीय संबंध अशा रीतीने कितीकाळ टिकतील असा प्रश्न केला आहे. भाजपला रोखण्यासाठी ही तडजोड केली जात आहे परंतु हे कितीकाळ असा प्रश्न बसू यांनी केला आहे. त्यातूनच मार्क्सवाद्यांनी आता तिसऱ्या पर्यायाची भाषा पुन्हा सुरू केली आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन मार्चच्या अखेरीला होत आहे त्यामध्ये यासंदर्भातील डाव्यांच्या भूमिकेची रूपरेषा जाहीर होणे अपेक्षित आहे. आगामी काही महिने हे राजकीय संक्रमणाचे राहतील. कारण काहीही घडले तरी लोकसभेच्या निवडणुका या लगेचच होणे अशक्य आहे. कारण मुख्य अडसर आहे तो मतदारसंघ फेररचनेचा आणि आता कायद्यानुसार नव्या निवडणुका या फेररचनेनुसारच होणे बंधनकारक आहे. निवडणूक आयोगाने त्यासाठी किमान सहा ते सात महिन्याचा कालावधी मागितला आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत ऑक्टोबर-नोव्हेंबर हा उजाडणारच मग ठरलेल्या वेळापत्रकाच्या म्हणजेच मार्च-एप्रिलच्या आधी केवळ दोन-तीन महिने निवडणुका घेण्याने काय हशील होणार आहे? त्यामुळे लवकर निवडणुका खरोखरच होणार काय, हाही एक मोठा प्रश्नच आहे. अर्थसंकल्पाचे फायदे लोकांपर्यंत पोहोचण्याची बाबही विसरून चालणार नाही. पण निवडणुकांचे नगारे वाजू लागले आहेत हे खरे.

**– निरीक्षक**

**आपल्या वर्गणीची मुदत संपली तर नाही ना?**

# पाकिस्तानात लोकशाहीचा विजय

## अशोक चौसाळकर

**मुशर्रफ सध्या नव्या सरकारला काम करू देण्यास तयार आहेत, काही बाबतीत ते तटस्थही राहतील, पण त्यांचा असा अंदाज आहे की हे सरकार स्थिर राहणार नाही. महत्त्वाकांक्षी नवाझ शरीफ व झरदारी हे सत्तेमागचे सूत्रधार असतील आणि त्यांच्यात मतभेद निर्माण होतील. लोकांच्या वाढत्या अपेक्षा सरकार पूर्ण करू शकणार नाहीत. सरकार अस्थिर झाले की त्यास पदच्युत करून लष्कर पुन्हा सत्ता आपल्या हातात घेऊ शकते.**

१८ फेब्रुवारी २००८ रोजी पाकिस्तानात संसदेसाठी व राज्य विधानसभांसाठी निवडणुका झाल्या होत्या. या निवडणुकांत राष्ट्रीय संसदेत कोणत्याही एका पक्षास बहुमत मिळाले नाही, पण मुशर्रफ यांना पाठिंबा असणारे मुस्लिम लीग (कायदे आझम) व एम.ए.एम. या दोन पक्षांचा पराभव झाला. १९७० नंतर प्रथमच पाकिस्तानात ही स्वतंत्र निवडणूक झाली. तिचे परिणाम दूरगामी होणार आहेत.

पाकिस्तानात सिंध, पंजाब, बलुचिस्तान आणि सरहद्द प्रांत हे चार प्रांत असून उत्तरेकडचा भूप्रदेश हा केंद्रशासित भूप्रदेश आहे. पाकिस्तानच्या राष्ट्रीय संसदेत २७२ सभासद असून त्यातील निम्म्यापेक्षा जास्त सभासद पंजाबमधून निवडून येतात. सिंध प्रांतात सिंधी भाषिकांची संख्या ६० टक्के असून त्या प्रांतातील कराची व हैदराबाद या दोन शहरांत भारतातून गेलेले निर्वासित राहतात. तेथे त्यांची संख्या मोठी आहे. त्यांचा 'मुहाजिर कौमी मूव्हमेंट' नावाचा पक्ष आहे. काही भागात पठाण लोक पण राहतात. सरहद्द प्रांत हा अफगाणिस्तानास लागून असून या प्रांताचे मधल्या काळात फार मोठे नुकसान झाले, त्यात लाखो आफगाण घुसले. अफू, चरस व बंदुका यांचा व्यापार सुरू झाला. तालिबानचा येथे प्रभाव वाढला आणि एम.ए.एम. हा कट्टर मुस्लिमांचा पक्ष तेथे सत्तेवर आला. या पक्षाला लष्कराचा पाठिंबा होता. बलुचिस्तान हा आकाराने सर्वात मोठा पण लोकसंख्येने सर्वात छोटा प्रांत. या प्रांतात बलुची राष्ट्रवादी विचारांचे पक्ष प्रभावी असून त्यांची पाकिस्तानी लष्कराशी लढाई सुरू आहे. त्यामुळे 'बलुच नॅशनल फ्रंट'ने निवडणुकांवर बहिष्कार टाकला. या प्रांतात वेगवेगळ्या बलुच टोळ्या सरकारच्या विरोधात आहेत. सरहद्द प्रांतात पठाणात व पश्तूनांत पश्तून राष्ट्रवादी विचारांचा 'नॅशनल आवामी पार्टी' हा पक्ष प्रभावी होता, तर तेथील पंजाब्यात व इतर वांशिक गटात 'पाकिस्तान पीपल्स पार्टी' हा पक्ष प्रभावी होता. थोडक्यात पाकिस्तानची परिस्थिती भारतासारखीच विविधता व संघर्ष यांनी रेखीत झालेली आहे.

पाकिस्तानात सैन्याधिकारी, सनदी अधिकारी व मुल्ला-मौलवी यांचे वर्चस्व असून या तिन्ही घटकांचा प्रस्थापित सरंजामशाही व्यवस्थेस पाठिंबा आहे. त्यामुळे पाकिस्तानात लोकशाही रुजली नाही. मुस्लिम लीग ही एक चळवळ करणारी पार्टी नव्हती. चौधरी लियाकत अली यांच्या मृत्यूनंतर सत्ता प्रथम सनदी अधिकाऱ्यांच्या व नंतर लष्करी अधिकाऱ्यांच्या हातात गेली. १९५६ ची राज्यघटना आयूबखान यांनी रद्दबातल केली तर १९७३ ची राज्यघटना जनरल झिया उल हक यांनी रद्द केली. १९८८-९९ या काळात लष्कराने सत्ता आपल्या हातात ठेवत नवाझ शरीफ आणि बेनझीर भुट्टो यांना खेळवत ठेवले आणि शेवटी १९९९ साली मुशर्रफ यांनी सत्ता आपल्या ताब्यात घेतली. नवाझ शरीफ व बेनझीर भुट्टो यांच्या पक्षांनी त्या काळात बाळसे धरले, पण लष्करी गुप्तहेर संघटना आणि सनदी नोकरशहा यांनी सातत्याने निवडून आलेल्या नेत्यांची बदनामी केली, त्यांची खिल्ली उडवली. त्यामुळे नवाझ शरीफ व भुट्टो यांच्या हातात पूर्ण सत्ता कधीच नव्हती. ते लष्कर आय.एस.आय. व नोकरशहा यांच्या तालावर नाचत व ते ज्यावेळी नको असत त्यावेळी अध्यक्ष त्यांचे सरकार बरखास्त करीत.

पाकिस्तानात विविधता आहे. राष्ट्रबांधणीची प्रक्रिया व्यवस्थित झाली नाही. भारताचा द्वेष व येनकेन मार्गाने काश्मीर ताब्यात घेण्याची इच्छा व त्यासाठी लष्कराचे गौरवीकरण या गोष्टी सुरू राहिल्या, त्यातून अफगाणिस्तानात यादवी युद्ध सुरू झाल्यानंतर तेथे आपले हस्तक सरकार स्थापन करणे व तेथे जमलेल्या जिहादींना भारताविरुद्ध वापरणे, ही दोन उद्दिष्टे सत्ताधाऱ्यांनी आपल्या डोळ्यासमोर ठेवली. या दोन्ही गोष्टी पाकिस्तानला पेलणाऱ्या नसल्यामुळे पाकिस्तानची त्यात हानी झाली, पण हे सर्व कळावयास तेथील लोकांना दहा वर्षे लागली. याच काळात मुशर्रफ यांनी आपली हुकूमशाही तेथे स्थापन केली. पण सप्टेंबर २००१ नंतर त्यांना आपले धोरण बदलावे लागते. मुल्ला-मौलवी त्यांच्या विरोधात गेले. दहशतवाद्यांनी त्यांची हत्या करण्याचा प्रयत्न केला. शेवटी हो ना करीत फेब्रुवारी २००८ मध्ये त्यांनी निवडणुका घोषित केल्या. भुट्टो व नवाझ शरीफ यांचे दोन महत्त्वाचे पक्ष या निवडणुकीत सामील झाले. नवे सेनापती जनरल कियानी यांनी तटस्थतेचे धोरण स्वीकारले, कारण गुप्तहेर संघटना व सैन्याचे अधिकारी निवडणुकीत भ्रष्टाचार करण्यामध्ये तरबेज आहेत, पण यावेळी तसे झाले नाही.

पाकिस्तानात निवडणूक प्रचार चालू असतानाच बेनझीर भुट्टो यांची हत्या करण्यात आली. ही हत्या कोणी केली हे अजून स्पष्ट झालेले नाही. निवडणुकीत दहशतवाद्यांनी मोठा हिंसाचार घडवून आणला. पण या काळात पाकिस्तानच्या चार प्रांतात चार वेगवेगळे पक्ष प्रभावी आहेत हे दिसू लागले. सिंध प्रांतातील निकालही त्याचप्रमाणे लागले.

पंजाब प्रांतात विधानसभेत नवाझ शरीफ यांच्या पक्षास बहुमत मिळाले. राष्ट्रीय संसदेतही तेथून त्यांना चांगल्या जागा मिळाल्या. याच प्रांतात मुस्लिम लीग (कायदे आझम) या सत्ताधारी पक्षासही काही जागा मिळाल्या. या प्रांतात पाकिस्तान पीपल्स पार्टीला पण काही जागा मिळाल्या. सिंध प्रांतात विधानसभेत पीपीपीला बहुमत मिळाले. संसदेतही जास्त जागा मिळाल्या. 'मुहाजिर कौमी मूव्हमेंट' या उर्दू भाषिक लोकांच्या पक्षास शहरी भागात चांगल्या जागा मिळाल्या. खरा बदल सरहद्द प्रांतात झाला. तेथे इस्पिंदियार वली खान यांच्या नेतृत्वाखालील 'नॅशनल अवामी पार्टी'स सर्वात जास्त जागा मिळाल्या. विधानसभेत पण त्यास बहुमताच्या जवळपास जागा मिळाल्या. इस्पिंदियार हे सरहद्द गांधी खान अब्दुल गफार खान यांचे नातू आणि वली खान यांचे पुत्र. ''मी गेली ५००० वर्षांपासून पठाण आहे, गेल्या १००० वर्षापासून मुसलमान आहे व गेली ५५ वर्षे पाकिस्तानी आहे'' असे ते म्हणत. नॅशनल अवामी पार्टी डाव्या धर्मनिरपेक्ष राष्ट्रीयतेचा पुरस्कार करते. या पक्षाने मुस्लिम जमातवाद्यांचा व मूलतत्त्ववाद्यांचा पराभव केला. एम.ए.एम. या धर्मवादी गटास फक्त दोन जागा मिळाल्या हे लष्कराचे बाहुले होते. सरहद्द प्रांतातील काही व इतर वांशिक गट प्रभावी असणाऱ्या भागात पीपीपीने पण चांगल्या जागा मिळाल्या. बलुचिस्तानात मुख्य राजकीय पक्षांनी बहिष्कार टाकल्यामुळे मुशर्रफ समर्थक मुस्लिम लीगला तेथे बहुमत मिळाले आहे, पण तेथे जर पुन्हा निवडणुका घेतल्या तर 'बलोच राष्ट्रीय पक्ष' मोठ्या बहुमताने निवडून येण्याची लक्षणे आहेत. सध्या त्या भागात मुशर्रफ यांच्या विरोधात गनिमी काव्याने लढा सुरू आहे.

राष्ट्रीय असेंब्लीत आज कोणत्याही पक्षास बहुमताचा पाठिंबा नाही, पक्षवार स्थिती खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| १. पाकिस्तान पीपल्स पार्टी | ८८ |
| २. पाकिस्तान मुस्लिम लीग (नवाझ) | ६६ |
| ३. पाकिस्तान मुस्लिम लीग (कायदे आझम) | ४० |
| ४. मुहाजिर कौमी मूव्हमेंट | १९ |
| ५. नॅशनल आवामी पार्टी | १० |
| ६. इतर छोटे पक्ष व अपक्ष | ४९ |

(यात एम.ए.एम २, एम.क्यू.एम.एम.२ या पक्षांचा समावेश होतो.)

लोकसंख्या व प्रादेशिक विस्तार यांचा विचार करता, आता पाकिस्तानात पीपल्स पार्टी, मुस्लिम लीग (नवाझ) आणि नॅशनल अवामी पार्टी हे तीन पक्ष प्रमुख पक्ष असून ते अनुक्रमे सिंध, पंजाब व सरहद्द प्रांत या तीन प्रांतात प्रभावी आहेत. तिन्ही प्रांतात काही प्रमाणात जागा मिळविण्यात भुट्टो यांचा पक्ष यशस्वी ठरला असल्यामुळे त्या पक्षास राष्ट्रीय पक्ष म्हणता येईल.

आता पाकिस्तानात पर्यायी सरकार बनवण्याचा प्रयत्न चालू आहे. परवेझ मुशर्रफ यांना नवाझ शरीफ यांचा विरोध असून त्यांनी पदत्याग करावा आणि त्यांनी बरखास्त केलेल्या न्यायाधीशांची फेरनियुक्ती करावी अशी त्यांची मागणी आहे. पीपीपीची सत्ता सध्या आसिफ झरदारी यांच्या हातात असून पंतप्रधानपद त्यांच्याच पक्षास मिळणार आहे. झरदारी यांनी मुशर्रफ यांच्या लीगशी आघाडी करावी असा त्यांचा प्रयत्न होता. अजून सरकार तयार झालेले नाही, पण शरीफ व झरदारी यांच्यात मतभेद आहेत. शरीफ यांचे दबावाचे राजकारण सुरू असून आपला पक्ष सरकारला बाहेरून पाठिंबा देईल असे ते आता म्हणत आहेत.

पण पीपीपी शरीफ व नॅशनल अवामी पार्टी यांचे संयुक्त राष्ट्रीय सरकार स्थापन होणे पाकिस्तानच्या हिताचे आहे, कारण या तीन पक्षांना सर्व प्रांतांचा व मोठ्या जनसमूहाचा पाठिंबा आहे. पाकिस्तानचे राजकीय नेते स्थिर सरकार देऊ शकत नाहीत, ते भ्रष्ट व लबाड आहेत असे सांगत गेली ५० वर्षे लष्कर सरकारांत हस्तक्षेप करीत आले आहे. आज पाकिस्तानला स्थिर सरकारची गरज आहे व असे स्थिर सरकार स्थापन करण्याची जबाबदारी पीपीपी व मुस्लिम लीग या दोन पक्षांची आहे.

परवेझ मुशर्रफ यांना सध्या अमेरिकेचा पाठिंबा आहे. त्याचप्रमाणे पाकिस्तानचे लष्कर त्यांच्यामागे उभे आहे. सनदी नोकरशहा जागतिक बँक व नाणेनिधीत काम केलेले अधिकारी हे पण त्यांच्या पाठीमागे उभे आहेत. सध्या नवे सरकार त्यांच्याशी संघर्ष करू शकत नाही. मुशर्रफ सध्या नव्या सरकारला काम करू देण्यास तयार आहेत, काही बाबतीत ते तटस्थही राहतील, पण त्यांचा असा अंदाज आहे की हे सरकार स्थिर राहणार नाही. महत्त्वाकांक्षी नवाझ शरीफ व झरदारी हे सत्तेमागचे सूत्रधार असतील आणि त्यांच्यात मतभेद निर्माण होतील. लोकांच्या वाढत्या अपेक्षा सरकार पूर्ण करू शकणार नाहीत. सरकार अस्थिर झाले की त्यास पदच्युत करून लष्कर पुन्हा सत्ता आपल्या हातात घेऊ शकते.

त्यामुळे १९७० नंतर प्रथमच पाकिस्तानात लोकशाही रुजविण्याची संधी राजकीय पक्षांना प्राप्त झाली आहे. नव्या सरकारपुढे अग्रक्रमाचे चार प्रश्न आहेत. १. बलुचिस्तानातील बलुच राष्ट्रवाद्यांशी चर्चा करून समझोता घडवून आणणे व लोकनियुक्त मंत्र्यांच्या हातात सत्ता सुपूर्द करणे, २. तिन्ही प्रांतात लोकनियुक्त सरकारांची स्थापना करून त्यांना स्थैर्य प्रदान करणे.
३. पाकिस्तानातील इस्लामी दहशतवादाचा लोकांच्या पाठिंब्याने बीमोड करणे व त्यासाठी सरहद्द प्रांतातील इस्पिदियार वली खान यांच्या सरकारला मोकळेपणाने काम करू देणे, कारण जवळजवळ ६० वर्षानंतर डॉ.खानसाहेबांच्या घराण्याकडे सत्ता येते आहे.
४. मुशर्रफ यांनी भारताशी जो वार्तालाप सुरू केला आहे तो चालू ठेऊन काश्मीरप्रकरणी योग्य असा तोडगा शोधणे. धर्माधिष्ठित व आक्रमक राष्ट्रवादामुळे पाकिस्तानचा घात झालेला आहे. पाकिस्तानचे सध्याचे लष्कर आकाराने मोठे आहे आणि त्याचा उपयोगही नाही. पाकिस्तानच्या आर्थिक विकासास गती देण्यासाठी लष्कराचे महत्त्व कमी करणे गरजेचे आहे. पाकिस्तानातील राजकीय नेते स्थिर व कार्यक्षम सरकार स्थापन करू शकतात हे एकदा सिद्ध झाल्यानंतर मुशर्रफ यांचे महत्त्व कमी होत जाईल. म्हणूनच नव्या संयुक्त सरकारचा प्रयोग महत्त्वाचा वाटतो.

**अशोक चौसाळकर**
राज्यशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

परामर्श

# ओबामा-लाट अडली

**गोविंद तळवलकर**

**यापुढे मॅकेन यांना उमेदवारी मिळवण्यासाठी मोहीम काढण्याची गरज नाही. डेमॉक्रॅटिक पक्षाच्या दोन्ही उमेदवारांना मात्र प्रचार-मोहिमेत जूनपर्यंतचा काळ घालवावा लागेल. त्या काळात मॅकेन राष्ट्रीय पातळीवरच्या निवडणूक मोहिमेत गुंतून जातील. डेमॉक्रॅटिक पक्षाच्या उमेदवारांना अद्याप बाराएक राज्यांत मोहीम काढावी लागणार आहे. या पक्षाची उमेदवार निवडीची प्रक्रिया गुंतागुंतीची असल्यामुळे व प्रमाणशीर प्रतिनिधित्व स्वीकारल्यामुळे २०२५ इतके प्रतिनिधी मिळवण्याची अट हिलरी किंवा ओबामा गाठू शकणार नाहीत. मग जवळजवळ आठशे विशेष प्रतिनिधींना कौल द्यावा लागेल.**

चार मार्च रोजी अमेरिकेत अध्यक्षीय निवडणुकीसाठी रिपब्लिकन व डेमॉक्रॅटिक पक्षाचा उमेदवार निवडण्याकरिता संबंधित पक्षांच्या सदस्यांचे मतदान झाले. चार राज्यांपैकी तीन राज्यांत श्रीमती हिलरी क्लिंटन विजयी झाल्या. रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार जॉन मॅकेन यांना आवश्यक तितकी मते मिळाल्यामुळे ते आता त्या पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून जाहीर झाले आहेत.

चार मार्चपूर्वीच्या मतदानाच्या आधी श्रीमती क्लिंटन यांचे प्रतिस्पर्धी बराक ओबामा यांनी अकरा राज्यांत हिलरी यांचा पराभव केला होता. त्यामुळे टेक्सास, ओहॅओ या दोन मोठ्या राज्यांतील निवडणूक हिलरी क्लिंटन हरल्या असत्या, तर त्यांना उमेदवारी मागे घेण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. निवडणूक मोहीम सुरू झाल्यापासून अमेरिकेतील बहुतेक वृत्तपत्रे व त्याहीपेक्षा टी.व्ही. वाहिन्या यांनी ओबामा यांना झुकते माप देण्याचे धोरण अवलंबले आहे. त्यातच एकामागोमाग एक याप्रमाणे अकरा राज्यांत ते विजयी झाल्यामुळे त्यांच्या बाजूने लाट निर्माण झाली होती. ही लाट चार मार्चच्या मतदानामुळे अडवली गेली.

हिलरी क्लिंटन यांच्यावर साऱ्या प्रसारमाध्यमांनी टीकेची झोड उठवून त्यांनी माघार घ्यावी असा प्रचारच चालवला होता. त्यांच्या पक्षातल्या काहींनी ओबामा यांना जाहीरपणे पाठिंबा दिला आहे. त्यांनीही हिलरी यांना माघारीचा सल्ला तीन मार्चलाही दिला. प्रसारमाध्यमांनी हिलरी क्लिंटन यांचे राजकीय मृत्युलेख केव्हापासूनच लिहिले आहेत. लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, या वाहिन्या व पत्रे एकमेकांशी स्पर्धा करत असल्या तरी हिलरी यांच्यावर शरसंधान करण्याबाबत मात्र त्यांची एकवाक्यता आहे. ती इतकी की, त्यांच्यावर टीका करताना अनेकदा सारखीच वाक्येही उच्चारली जातात आणि टीकेचे मुद्देही सारखे असतात.

चार मार्चचे मतदान टेक्सास, ओहॅओ, ऱ्होड आयलंड व व्हर्मॉन्ट या राज्यांत झाले. त्यांपैकी ऱ्होड आयलंड व व्हर्मॉन्ट ही लहान राज्ये आहेत व बाकीची दोन मोठी आहेत. त्यातही टेक्सास हे अमेरिकेतील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य आहे. यामुळे या मतदानास महत्त्व होते. हिलरी यांनी दोन्ही मोठी राज्ये गमावली असती तर त्यांना फारसे भवितव्य नव्हते; पण त्यांनी चारपैकी तीन राज्ये जिंकली. यामुळे डेमॉक्रॅटिक पक्षाच्या दोन उमेदवारांची स्पर्धा चालूच राहणार आहे.

हिलरी यांच्या विजयामुळे अनेक स्तंभलेखक, टी.व्ही. वाहिन्यांचे संचालक व त्यांवरील चर्चांत भाग घेणारे यांची मोठी पंचाईत झाली. 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या दोन स्तंभलेखकांनी हिलरी यांनी माघार घेऊन त्यांचा पक्ष वाचवावा असा सल्ला चार-पाच दिवस आधी दिला होता. तिसऱ्याने लिहिले की हिलरी यांचा पराभव झाला तरी त्यांना हताश होण्यासारखे काही नाही. यातले दोघे रिपब्लिकन पक्षाबद्दल सहानुभूती बाळगणारे म्हणून ओळखले जातात. त्यांना डेमॉक्रॅटिक पक्षाचा इतका उमाळा येण्याचे कारण काय?

'न्यूयॉर्क टाइम्स'च्या तीन-चार स्तंभलेखकांनी हिलरी यांची जितकी टवाळी करता येईल तितकी करण्यात गेला महिना खर्च केला आहे. सी.एन.एन., ए.बी.सी. इत्यादी वाहिन्यांनी हेच धोरण अवलंबिले तर एम.एस.एन.बी.सी. हिने हिलरी यांच्याविरुद्ध अघोषित युद्धच सुरू केले आहे. हे सारे पत्रकार एरव्ही वृत्तपत्रांचा स्वतंत्र बाणा इत्यादी संबंधात बोलण्यात व लिहिण्यात बरेच रक्त आटवत असतात, पण कोणीही संयम बाळगत नाहीत.

एम.एस.एन.बी.सी. या वाहिनीची मालकी जनरल इलेक्ट्रिक कंपनीकडे आहे. तिचे अध्यक्ष व मुख्य कारभारी वेल्श हे निवृत्त होण्यापूर्वीच त्यांनी अमेरिकेचे माजी अध्यक्ष बिल क्लिंटन यांच्याविरुद्ध धोरण अवलंबिले होते. तेच आजही चालू आहे. तेव्हा कशाचा स्वतंत्र बाणा?

या साऱ्या मोहिमेचा रोख हिलरी यांच्या विरुद्ध आहे, याचे एक कारण त्या स्त्री आहेत हे आहे. एक स्त्री राष्ट्राची अध्यक्ष होते हेच अनेकांना मान्य नाही. त्यांना ओबामा हे आफ्रो-अमेरिकन असूनही हिलरी यांच्याऐवजी पसंत आहेत यावरून ते मोठे उदार आहेत असे नव्हे. त्यांना हिलरी नकोत. आणखी एक कारण आहे. त्यांना माहीत आहे की, रिपब्लिकन पक्षाच्या कोणत्याही उमेदवारास त्यातल्या त्यात जोरदार टक्कर हिलरी देऊ शकतात. त्यांना नामोहरम केले की ओबामा निवडून येण्याचा संभव कमी असल्यामुळे आपोआपच रिपब्लिकन उमेदवाराचा मार्ग मोकळा होईल, असा यांचा हिशेब आहे.

परंतु बुश यांच्या अनागोंदी कारभारामुळे अमेरिका आज आर्थिक संकटात असून त्याची झळ सामान्य माणसांना लागत आहे. यामुळे डेमॉक्रॅटिक पक्षाचा उमेदवार यशस्वी होण्यास अनुकूल वातावरण आहे. तेव्हा हिलरी वा ओबामा यांपैकी कोणीही मॅकेन यांचा पराभव करू शकतात. हिलरी यांच्यावर सतत शरसंधान सोडणाऱ्यांना रिपब्लिकन अध्यक्ष हवा आहे. मागे अल् गोर यांच्यावर 'न्यूयॉर्क टाइम्स' व 'वॉशिंग्टन पोस्ट'चे स्तंभलेखक याच रीतीने टीका करत होते. गोर यांनी आपल्याला वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमे यांनी कशी वागणूक दिली याची माहिती एका प्रदीर्घ लेखात नुकतीच दिली आहे.

ओबामा हे अमेरिकेच्या सेनेटवर निवडून आले तीन वर्षांपूर्वी. त्या आधी थोडी वर्षे ते इलिनॉय या राज्याच्या सेनेटवर होते. अमेरिकेच्या सेनेटवर आल्यानंतर गेले वर्षभर ते अध्यक्षीय निवडणुकीच्या मोहिमेत आहेत. यामुळे दोन्हीकडे त्यांना विशेष काही करता आले नाही. ते वॉशिंग्टनची राजकीय व्यवस्था बदलण्याच्या गोष्टी करतात आणि अमेरिकेत परिवर्तन घडवून आणून सर्व जग बदलण्याची त्यांची आकांक्षा आहे. हे कसे शक्य आहे? तुम्ही जी इतकी आश्वासने देता त्या दिशेने आतापर्यंत तुम्ही काय केले, असे त्यांना प्रसारमाध्यमांनी विचारायला हवे. ते न केल्यामुळे हिलरी यांनी हा प्रश्न उपस्थित केला. त्याबरोबर ओबामा यांचे पाठीराखे चवताळले. विशेष म्हणजे ज्या आफ्रो-अमेरिकनांसाठी बिल क्लिंटन यांनी बरेच काही केले ते विसरून बहुसंख्य आफ्रो-अमेरिकन त्यांच्यावर उलटले. ओबामा निवडणुकीला उभे असल्यामुळे त्यांना प्रश्न विचारले जाणारच. त्यांना तसे विचारणे म्हणजे सर्व आफ्रो-अमेरिकनांवर टीका असे कसे होते? तशी ती होत असेल तर हिलरी यांना प्रश्न विचारणे म्हणजे सर्व अमेरिकन स्त्रियांवर टीका असे का मानू नये?

या वातावरणामुळे हिलरी या सुद्धा ओबामा यांच्या विधानांवर अधिक आक्षेप घेऊ शकत नाहीत. आता तर चार मार्चच्या निवडणुकीतील आपला पराभव प्रसारमाध्यमांच्या टीकेमुळे झाला अशी तक्रार ओबामा यांनी केली आहे. आपण निवडणुकीला उभे आहोत, आपला राज्यारोहण समारंभ नाही, हे त्यांनी लक्षात घेतलेले नाही. पण जे आताच्या निवडणुकीत होत नाही व उमेदवार ठरेपर्यंत होणार नाही, ते राष्ट्रीय पातळीवर निवडणूक प्रचार झाल्यावर होणारच आहे. कारण तेव्हा ओबामा यांची गाठ मॅकेन या पक्षाच्या उमेदवाराशी आहे. आफ्रो-अमेरिकन समाजाने रिपब्लिकन पक्षाला कधी भरघोस पाठिंबा दिला नसल्यामुळे तो पक्ष ओबामा यांच्यावर टीका करताना हातचे राखून ती करणार नाही.

यापुढे मॅकेन यांना उमेदवारी मिळवण्यासाठी मोहीम काढण्याची गरज नाही. डेमॉक्रॅटिक पक्षाच्या दोन्ही उमेदवारांना मात्र प्रचार-मोहिमेत जूनपर्यंतचा काळ घालवावा लागेल. त्या काळात मॅकेन राष्ट्रीय पातळीवरच्या निवडणूक मोहिमेत गुंतून जातील.

डेमॉक्रॅटिक पक्षाच्या उमेदवारांना अद्याप बाराएक राज्यांत मोहीम काढावी लागणार आहे. या पक्षाची उमेदवार निवडीची प्रक्रिया गुंतागुंतीची असल्यामुळे व प्रमाणशीर प्रतिनिधित्व स्वीकारल्यामुळे २०२५ इतके प्रतिनिधी मिळवण्याची अट हिलरी किंवा ओबामा गाठू शकणार नाहीत. मग जवळजवळ आठशे विशेष प्रतिनिधींना कौल द्यावा लागेल. त्यांपैकी अनेकांनी या वा त्या उमेदवाराचा पुरस्कार केला आहे. शिवाय या विशेष प्रतिनिधींपैकी काहींना निवडणूक वगैरे लढवण्यासाठी ओबामा यांनी सात लाख डॉलर्स तर हिलरी यांनी दोन लाख डॉलर्स दिले आहेत. अमेरिकेत हे कायदेशीर आहे आणि तो भ्रष्टाचार मानला जात नाही. पण या स्थितीत या विशेष प्रतिनिधींचे मतदान कितपत अलिप्ततेने होणार?

डेमॉक्रॅटिक पक्षाने चाचणी करण्यासाठीचे मतदान कोणत्या राज्याने केव्हा करायचे हे ठरवून दिले होते; पण फ्लॉरिडा व मिशिगन या राज्यांतल्या पक्षशाखांनी त्याआधीच मतदान घेतले. तेव्हा पक्षाच्या राष्ट्रीय समितीने त्या निवडणुकींचा निकाल मानला जाणार नाही असा निर्णय देऊन लाखो लोकांना मतदानापासून वंचित केले. पक्षाचा उमेदवार ठरवण्यासाठी जे अधिवेशन भरेल त्यास या दोन राज्यांचे प्रतिनिधी हजर राहू शकणार नाहीत. असे हे गौडबंगाल आहे. तेव्हा तुम्हांला तुमच्या पक्षाचा उमेदवार ठरवण्यासाठीची प्रक्रिया पार पाडता येत नाही, तर तुम्ही

देशाचा कारभार कसा करणार, असा प्रश्न रिपब्लिकन पक्ष विचारल्याशिवाय राहणार नाही. डेमॉक्रॅटिक पक्षाच्या नेत्यांत काही मुत्सद्दीपणा व दूरदर्शित्व आहे की नाही, यावर आता बरेच अवलंबून आहे.

## रशियात खांदेपालट झाली

रशियात व्लादिमिर पुटिन यांची अध्यक्षपदाची मुदत संपली व त्यांच्या जागी नुकतेच नेमलेले उपपंतप्रधान दिमित्री मेदवेदेव हे आले आहेत. हा खांदेपालट निवडणूक घेऊन झाला. बोल्शेविक क्रांती झाल्यापासून आजपर्यंत या रीतीने रशियात सत्तापालट झाला नव्हता. पुटिन यांची येल्त्सिन यांनी प्रथम पंतप्रधान म्हणून नेमणूक केली आणि नंतर कारभार चालवणे अशक्य झाल्यावर येल्त्सिन यांनी पुटिन यांच्याकडे अध्यक्षपदाची सूत्रे दिली. त्यानंतर पुटिन निवडणूक घेऊन अधिकारपदावर आले तरी प्रथम खांदेपालट झाला तो लोकमताने झाला नव्हता.

यावेळी मेदवेदेव हे सत्तर टक्के मते मिळवून विजयी झाले आहेत आणि पुटिन यांना ते पंतप्रधान म्हणून नेमणार आहेत. रशियाच्या नव्या घटनेस धरून हा बदल होत आहे. या घटनेप्रमाणे अध्यक्षपदाची मुदत पाच वर्षांची आहे; पण दोन वेळा या पदावर निवड होऊ शकते. पुढे अध्यक्षाने राजीनामा दिला किंवा दहा वर्षांची मुदत पुरी करून नवी निवडणूक झाली आणि तीत अध्यक्षपद जिंकलेल्या व्यक्तीने आधीच्या अध्यक्षास पंतप्रधान केले तरी ते घटनेस धरून होते.

घटनेप्रमाणे अध्यक्षास अधिक अधिकार असले तरी पंतप्रधान या नात्याने पुटिन बराच अधिकार गाजवतील आणि मेदवेदेव यांना दुय्यम म्हणून प्रत्यक्षात काम करावे लागेल. हे पुटिन यांनी रशियात मिळवलेल्या स्थानामुळे घडणार आहे आणि त्यास कोणाचा इलाज नाही. या स्थितीत रशियातील लोकशाही व नवी राजवट यांची परीक्षा पाश्चात्त्य जगातल्या लोकशाही राजवटींची वा भारतातल्या राजवटीची कसाटी लावून होऊ शकणार नाही.

रशियन घटनेतील या तरतुदीप्रमाणे पुटिन पंतप्रधान होणार आहेत. मेदवेदेव यांची कारकीर्द मेमध्ये सुरू होईल आणि पुटिनही त्याचवेळी पंतप्रधान होतील. मेदवेदेव हे सेंट पीटर्सबर्गचे आहेत. पुटिनही त्याच शहरातले आणि दोघांनी तिथे एकत्र काम केले होते. मेदवेदेव हे वकील होते आणि पुटिन अध्यक्ष झाल्यानंतर रशियात नैसर्गिक वायूचे उत्पादन व वितरण करणाऱ्या प्रचंड सरकारी कंपनीचे प्रमुख म्हणून त्यांनी मेदवेदेव यांची नेमणूक केली.

मेदवेदेव हे नाव रशियात प्रसिद्ध आहे. डॉ. झोरेस मेदवेदेव हे प्रसिद्ध शास्त्रज्ञ होते. प्रथम स्टालिन व नंतर क्रुश्चॉव यांच्या कारकिर्दीत त्यांच्यावर सरकारी रोष झाला होता. यामुळे ते इंग्लंडमध्ये राहात असत. त्यांचे भाऊ रॉय मेदवेदेव हे नामवंत इतिहासकार म्हणून ओळखले जात. ते लेनिनवादी होते आणि स्टालिनशी त्यांचे जमले नाही. त्यांच्या सुदैवाने त्यांना श्रमछावणीत जावे लागले नाही आणि गोळीस बळी पडावे लागले नाही. क्रुश्चॉव यांनी त्यांना बरीच मोकळीक दिली होती. रॉय मेदवेदेव यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. यात क्रुश्चॉव यांच्या राजवटीबद्दल एक आहे. दुसरे चीन व रशिया यांच्यात कशी तेढ निर्माण झाली याचे विवेचन करणारे आहे; पण 'लेट हिस्टरी जज्ज' हा रॉय मेदवेदेव यांचा ग्रंथ जगभर गाजला. स्टालिनच्या अमानुष कारकिर्दीचा भरभक्कम पुराव्यासहित आढावा त्यात घेतला आहे. क्रुश्चॉव यांनी स्टालिनच्या दुष्कृत्यांवर प्रकाश टाकून त्याचे अवमूल्यन केले असल्यामुळे त्यांनी रॉय मेदवेदेव यांना हा ग्रंथ लिहिण्यास प्रोत्साहन दिले. आश्चर्याची गोष्ट ही की ब्रेझनेव अधिकारावर आल्यानंतरही हे धोरण कायम राहिले व म्हणून मेदवेदेव यांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. या मेदवेदेव बंधूंचे दिमित्री मेदवेदेव कोणी नातेवाईक आहेत की नाहीत, हे स्पष्ट झालेले नाही. कदाचित लांबचे नातेवाईक असू शकतील.

दिमित्री मेदवेदेव यांच्याविरुद्ध दोन-तीन उमेदवार निवडणूक लढवत होते. पण त्यांना अगदीच कमी मते मिळाली. हे अपेक्षित होते. याचे एक कारण असे की पुटिन व त्यांचा 'युनायटेड रशिया पार्टी' हा पक्ष लोकप्रिय आहे. स्वतः पुटिन यांची लोकप्रियता बरीच असून ताज्या आकडेवारीप्रमाणे ऐंशी टक्के लोक त्यांच्या बाजूचे आहेत. पुटिन यांच्यावर पाश्चात्त्य देशांतील टीका गेल्या काही वर्षांत शिगेला पोचली आहे. टीकाकारांच्या मते पुटिन यांनी लोकशाहीचा देखावा उभा केला आणि पूर्वीच्या झारशाहीप्रमाणे वा बोल्शेविकांच्या राजवटीप्रमाणेच कारभार चालवला आहे.

रशियात पूर्ण लोकशाही आल्याचा दावा पुटिनही करत नाहीत. वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमे यांच्यावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बंधने आहेत. इतर पक्षांना वाढण्यास फारसा वाव नाही. गेल्या दहा वर्षांत अनेक पत्रकारांचा खून झाला आहे. चेचनिया हा मुस्लिम बहुसंख्येचा भाग स्वतंत्र होऊ पाहात होता. यासाठी तिथल्या पुढाऱ्यांनी दहशतवादाचा अवलंब केला होता. या बंडाळीचा बीमोड करण्यासाठी पुटिन यांनी कठोर उपाय योजले, पण त्याशिवाय दुसरा मार्ग चेचनियाच्या दहशतवाद्यांनी ठेवला नव्हता हेही मान्य करावे लागेल.

रशियात मर्यादित लोकशाही आहे हे खरे असले, तरी रशियाचा इतिहास आणि सोव्हिएत युनियन बरखास्त

झाल्यावर येल्त्सिन यांनी जो सावळा गोंधळ घातल्यामुळे रशियाची काय दुरवस्था होती याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. ज्यास संसदीय राजकारण म्हणतात ते रशियात कधी चालले नाही. सोव्हिएत युनियनची समाप्ती झाल्यावर येल्त्सिन यांनी सरकारी मालकीचे सर्व उद्योग बंद करून सरसकट खाजगीकरण सुरू केले. खाजगीकरण आवश्यक असले तरी ते जादूची कांडी फिरवून येत नाही. त्यासाठी बरीच तयारी करावी लागते. पण येल्त्सिन यांना व्यक्तिगत आयुष्यात शिस्त नव्हती तशीच ती राज्यकारभार करतानाही नव्हती.

यामुळे रशिया कर्जांच्या डोंगराखाली चेंगरला आणि चलनवाढ व महागाई यांचा कळस झाला. कम्युनिझममुळे नवा माणूस तयार झाल्याच्या बढाया मारल्या जात होत्या; पण तसे काहीच झाले नाही. उलट बरेच दिवस उपाशी असलेल्या माणसास अन्न मिळाले की त्याला खा खा सुटते तशी 'रशियन कम्युनिस्ट पक्षा'च्या लहानमोठ्या पुढाऱ्यांनी लूट सुरू केली. असंख्य सरकारी कारखाने, व्यापार व मालमत्ता ही सारी अगदी पडत्या किमतीस त्यांनी घेतली. काळा बाजार व काळा पैसा यांनी थैमान घातले. सैन्यास पगार देणे कठीण झाले. लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही की, आज जे अमेरिकन पुढारी आणि पत्रे पुटिन यांच्यावर टीका करतात ते येल्त्सिन हे कोणी अवतारी पुरुष आहेत असे मानत होते. अनेक अमेरिकन अर्थतज्ज्ञ येल्त्सिन यांच्या सरकारचे सल्लागार होते आणि त्यांनीही भरपूर मलई खाल्ली.

पुटिन अध्यक्ष झाल्यावर त्यांनी कडक उपाय योजले आणि देशाची संपत्ती फस्त करून परदेशात गुंतवणूक करणाऱ्यांना पायबंद घातला. त्यांची गैर मार्गाने जमा केलेली संपत्ती ताब्यात घेण्यात आली. रशियाने दीर्घकाळ युक्रेन, जॉर्जिया इत्यादी भागांवर बरेच कडक नियंत्रण ठेवले होते. सोव्हिएत युनियन बरखास्त झाल्यावर हे प्रदेश स्वतंत्र झाले आणि त्यांनी विरोधी पवित्रा घेतला. अमेरिकेशी त्यांनी जुळवून घेतले आणि मग नेटो इत्यादी लष्करी करारात ते सामील झाले. रशिया याप्रमाणे वेढला गेला असताना पुटिन यांच्या सुदैवाने तेलाचे भाव वाढत गेले. तेल व नैसर्गिक वायू यांबाबत रशिया संपन्न आहे. यामुळे रशियाचा खजिना फुगत गेला. मग चलनवाढ व महागाई खाली आणि आणि रोजगार वाढत गेला. गेल्या वर्षी लोकांच्या उत्पन्नात सोळा टक्क्यांनी वाढ झाली आहे.

पूर्वीप्रमाणे सरकारीकरण नाही, खाजगी मालकी आहे; पण ती बेबंद नाही. यामुळे रशियाने सर्व कर्ज फेडले आणि आर्थिकदृष्ट्या तो वरच्या थरात जाऊन पोचला. मग पुटिन यांनी अमेरिका, इंग्लंड यांच्यापुढे नमते घेण्याचे बंद केले. रशियन लोकांत यामुळे राष्ट्रीय स्वाभिमानाची भावना वाढीला लागली. अगदी दयनीय अवस्थेला पोचलेला रशिया पुटिन यांनी या अवस्थेला आणल्यामुळे रशियन लोक त्यांच्या मागे आहेत. पाश्चात्त्य टीकाकार हे लक्षात घेत नाहीत. किंबहुना रशियाचा हा नवा अवतार त्यांना खपत नाही.

अर्थात पुटिन यांना सर्व सूत्रे सरकारच्या हातात ठेवून चालणार नाही. खाजगीकरणामुळे व नव्या तंत्रज्ञानामुळे नवा वर्ग तयार झाला आहे. त्याचा कम्युनिझमशी कधी संबंध आला नाही. हा नवा वर्ग अर्थकारणाबरोबर उद्या राजकीय व इतर जीवनातही स्वातंत्र्य हवे अशी मागणी करणार. शिवाय मॉस्कोत सर्व सत्ता केन्द्रीत झाल्यामुळे भ्रष्टाचार बोकाळला आहे आणि ग्रामीण भाग मागे पडत आहे. यापुढे आर्थिक प्रगती चालू ठेवायची तर सध्याचे केन्द्रीकरण उपयोगी पडणार नाही. हा बदल करण्यात मेदवेदेव व पुटिन यांना पुढील दहा वर्षांत यश मिळाल्यास झार व बोल्शेविक या दोघांच्याही राजवटीत नव्हता इतका व खऱ्या अर्थाने रशिया महासत्ता होईल.

पुटिन यांनी अमेरिका व इतर पाश्चात्त्य देश यांच्या संबंधात ताठर भूमिका घेतल्यामुळे रशियात त्यांचा दबदबा वाढला आहे. तथापि शीतयुद्धाचे वातावरण तयार होऊ लागले असून राष्ट्रवादी विचार बळावत गेले आणि अमेरिकाही ताठर भूमिका घेत राहिली तर शीतयुद्ध पुन्हा सुरू होईल. तसे झाले तर सोव्हिएत युनियन डबघाईला आली तशी नवी व्यवस्था येण्याचा धोका नाकारता येणार नाही. अमेरिकेत नवी राजवट जानेवारीत येईल तेव्हा आवश्यक तो धोरणविषयक बदल झाला तर शीतयुद्धाचे संकट टळेल.

govindtalwalkar@hotmail.com

■

**...सहवेदना...**

भादवण, ता. आजरा, जि. कोल्हापूर येथील सेवानिवृत्त कलाशिक्षक **रामचंद्र उर्फ चंद्रकांत केसरकर** यांचे नुकतेच निधन झाले. साधना साप्ताहिकाच्या प्रारंभीच्या अंकाच्या घड्या मुंबईत पदपथावर घातल्या गेल्या, तेव्हाच्या धडपडणाऱ्या मुलांच्या फळीतील ते शिलेदार होते. साने गुरुजींच्या प्रार्थनेला त्यांनी अप्रतिम चाली लावल्या. त्याच चालीनुसार आज अखेर उत्तूर विद्यालयात प्रार्थना म्हटली जाते. जाणीवपूर्वक त्यांनी उत्तूरसारख्या खेड्याचे क्षेत्र निवडले. भरपूर पैसे मिळण्याच्या संधी सोडल्या. साने गुरुजींना दैवत मानून राष्ट्र सेवादलाच्या निष्ठावान सैनिकाचे जीवन ते जगले. त्यांच्या स्मृतीस आदरांजली.

**— साधना परिवार**

अशोक
राजवाडे

# एका योद्ध्याच्या राजवटीचं अर्धशतक

लेनिन, गांधी, माओ, हो चि मिन्ह, नेल्सन मंडेला अशा मोठ्या नेत्यांच्या मालिकेत शोभून दिसेल अशा एका नेत्याने राज्यशकट हाकण्याच्या कामातून निवृत्ती जाहीर केली आहे. पण दुसऱ्या एका कामाला रुग्णशय्येवर पडल्यापासून त्याने सुरुवात केलेली आहे. त्यांनी शस्त्रसंन्यास घेतलेला नाही, मात्र बंदुकीऐवजी आता लेखणी हातात घेतली आहे. गेले किमान दोन वर्षे मी स्वत: कॅस्ट्रोंचे लेख वाचतो आहे. पर्यायी माध्यमांत– म्हणजे तूर्त तरी इंटरनेटवर– हे लेख प्रसिद्ध होत असतात आणि त्याच्या मागच्या प्रदीर्घ अनुभवामुळे आणि ज्या संघर्षातून कॅस्ट्रो गेले आहेत ते पाहता त्यांच्या शब्दांना विलक्षण वजन आहे, यात मला कोणतीही शंका नाही.

फिडेल कॅस्ट्रोना आपल्या काळातला एक श्रेष्ठ योद्धा म्हणून पाहणं उचित ठरेल. आणखी एक गोष्ट आहे. क्यूबा हा एका वेढा पडलेला देश आहे आणि हा वेढा अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाने घातलेला आहे. अमेरिकेचे दहा अध्यक्ष आले आणि गेले, पण हा नेता त्या साऱ्यांना पुरून उरलेला आहे.

लोकशाही आणि हुकूमशाही या दोन संकल्पनात निरनिराळ्या प्रती असतात काय? काळा आणि पांढरा असे दोनच रंग आपल्यासमोर असतील आणि काळा म्हणजे हुकूमशाही आणि पांढरा म्हणजे लोकशाही असं सरधोपट समीकरण मांडलं तर कॅस्ट्रोना काळ्या यादीतच टाकावं लागेल. पण वास्तव याहून अधिक गुंतागुंतीचं आहे. आपण आपल्या देशातल्या आजच्या काळातल्या नेत्यांकडे थोडी नजर टाकू. सांप्रतच्या किती नेत्यांना लोकशाहीबद्दल मूलभूत आस्था आहे? खरं तर यातली बहुतेक मंडळी या आस्थेच्या इतकी पलीकडे गेलेली आहेत, की असल्या गोष्टींबद्दल ही मंडळी काही विचार करीत असतील असं वाटत नाही. (यातल्या अनेक नेत्यांच्या नावावर फौजदारी गुन्हेसुद्धा दाखल आहेत.) नरेंद्र मोदींसारखे नेते तर यापलीकडे जाऊन मुस्लिमविरोधी कुटिल कारवायांचं राजकारण पुढे चालवत आहेत आणि आपले अभिजन या नेत्याकडे भारताचा भावी प्रमुख नेता म्हणून पाहत आहेत.

यातले बहुसंख्य नेते सधन वर्गांच्या हितसंबंधात इतके अडकलेले आहेत की जनतेच्या बऱ्या-वाईटाबद्दल त्यांना काही आस्था आहे असं मानणं हे दिवास्वप्नासारखं आहे. मग केवळ ते मतपेटीच्यामार्फत निवडून येतात म्हणून ते लोकशाही मानतात याला काहीच अर्थ नाही. सेझसारख्या लुटमारीच्या धंद्यात हे नेते कार्यरत आहेत. निवडून आल्यानंतर त्यांनी केलेल्या कृती आणि केलेल्या धोरणांचा पाठपुरावा पाहिला, तर ते जनताभिमुख आहेत असं छातीठोकपणे म्हणता येणार नाही. खाजगीकरणाला त्यांनी दिलेला पाठिंबा हा त्याच्या सधन वर्गांना बिलगलेला असण्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. धनाढ्यांच्या आणि स्वत:च्या हितसंबंधांना इजा न पोहोचवता (उलट ते जपत आणि त्यांचं संवर्धन करीत) जेवढं जमेल तेवढं आपले राजकारणी करीत आहेत. नववैश्यांच्या जागतिकीकरणाच्या सिद्धांतांना या मंडळींनी गृहीतच धरलं आहे आणि केवळ याच मार्गाने जणू काही जनतेचा उद्धार होईल, असं जनतेला पटवून देणं हा त्यांच्या सिद्धांतांचा आणि कामाचा एक भाग आहे. मग या नेत्यांना लोकांविषयी आस्था आहे असं म्हणणं कितपत योग्य आहे? उलट ते करत असलेल्या अनेक गोष्टी जनताविरोधी आहेत. आणि जनतेविषयी आस्था हा लोकशाही विचारांचा गाभाच नव्हे काय?

याउलट फिडेल कॅस्ट्रोसारखे नेते या हितसंबंधांच्या साखळ्यांना धुडकावून लावत आपल्या समजुतीप्रमाणे आणि आपल्या

> **कॅस्ट्रो हे कठोर आदर्शवादी आहेत आणि कोणतीच तडजोड न करता त्यांनी आपला आदर्शवाद राबवला आहे. हे करत असताना सतत त्यांची नजर सर्वांत तळाच्या माणसाकडे असते हे आपण इथे लक्षात घेणं आवश्यक आहे. आपल्या देशातलं प्रत्येक मूल शाळेत गेलं पाहिजे यावर कॅस्ट्रोचा कटाक्ष असतो. एवढंच नव्हे तर त्याला पुरेशा कॅलरीज मिळाल्या पाहिजेत याबद्दल ते आग्रही आहेत. सव्वा कोटी लोकसंख्येच्या क्यूबात शंभरी पार केलेल्या सुमारे तीन हजार व्यक्ती आहेत हीच गोष्ट पुरेशी बोलकी आहे. साऱ्या जगाचं वैभव एका मक्याच्या दाण्यात सामावू शकतं असं कॅस्ट्रोचं म्हणणं आहे.**

विचारांनी सतत जनतेच्या बाजूने उभे राहिले यातच त्यांचं मोठेपण आहे. हे करत असताना दरवेळी त्यांनी केलेल्या कृती बरोबरच होत्या असं नाही; कधी त्यांच्या हातून प्रमादही घडले असतील, पण त्यांच्या हेतूंविषयी शंका घेता येणार नाही.

अमेरिका आणि क्यूबा यांच्यातला संघर्ष हा खरं तर वादळ आणि दिव्याच्या फडफडणाऱ्या ज्योतीच्या प्रतीकासारखा आहे. गेली पन्नास वर्षे अमेरिकेने क्यूबावर आर्थिक निर्बंध लादले आहेत. आणि या निर्बंधांना कोणताही नैतिक आधार नाही. जगातल्या जवळजवळ सर्व राष्ट्रांनी या निर्बंधांना जाहीरपणे विरोध केला आहे; त्यांच्याविरुद्ध मोठ्या संख्येने संयुक्त राष्ट्रांत मतदान केलं आहे. (अर्थात असल्या आंतरराष्ट्रीय लोकशाहीला अमेरिकेने कधीच जुमानलेलं नाही.) जर लोकशाही हा आधार म्हणायचा तर अत्यंत विकृत आणि हिंसक हुकूमशहांना अमेरिकेने पाठीशी घातलं आहे. आयंदे, सुहार्तो, सद्दाम हुसेन, बॅटिस्टा, सोमोझा यांसारख्या अनेक हुकूमशहांची अमेरिकेने पाठराखण केली आहे. याह्या खान, अयूब खान, जनरल मुशर्रफ अशा हुकूमशहांना पाठिंबा दिला आहे.



अमेरिकेतल्या ज्यू आणि ख्रिश्चन मूलतत्त्ववाद्यांच्या लॉबीच्या दबावाखाली इस्रायलमार्फत पॅलेस्टाईनच्या लोकांची सर्व प्रकारची मुस्कटदाबी करण्याची कृती गेली पन्नास वर्षे अमेरिका करीत आली आहे. गाझा पट्टीत आज घडत असलेलं उपासमारीचं दबावतंत्र हा याचाच पुढचा भाग आहे.

फिडेल कॅस्ट्रोना मारण्याचे किती प्रयत्न झाले त्याची मोजदादच नाही आणि यातले बहुसंख्य प्रयत्न सी.आय.ए.ने घडवून आणले हेही आता जगजाहीर आहे. डोलन कॅनेल नावाच्या माणसाने 'कॅस्ट्रोना मारण्याचे ६३८ प्रयत्न' या अर्थाचं शीर्षक असलेला एक माहितीपट यावर काढला आहे. २८ नोव्हेंबर २००६ या दिवशी ब्रिटनच्या 'चॅनेल ४' या वाहिनीवर हा माहितीपट दाखवला गेला आहे. राजकीय, लष्करी आणि आर्थिक दहशत असूनही क्यूबा ताठ कण्याने उभा राहिला; इतकेच नव्हे तर एवढ्याशा छोट्या देशाचं बलाढ्य अमेरिका काहीच वाकडं करू शकली नाही. या साऱ्याचं एक कारण फिडेल कॅस्ट्रोसारखा एक लढवय्या या देशात पहाडासारखा उभा होता हे आहे. अमेरिकेच्या राजकीय शब्दकोशात लोकशाहीच्या कल्पनेचा खरा अर्थ जनतेच्या सत्तेशी संबंधित नसून तो तिथल्या मूठभरांच्या हितसंबंधांशी (म्हणजे पर्यायाने सत्तेशी) जोडलेला असतो. हे संबंध म्हणजे सामान्य अमेरिकन माणसाचे हितसंबंध अशी सहमती गृहीत धरलेली असते. ज्या प्रमाणात अमेरिकेच्या भांडवलाला एखाद्या देशात घुसायला मोकळीक असते, तितक्या प्रमाणात तेथील लोकशाही समर्थनीय आहे असं समजलं जातं. जर या कल्पनेला कोणी विरोध करू लागला तर मात्र अमेरिका आपल्या भात्यातले सर्व बाण वापरून त्या सत्तेचा पाडाव करू पाहते. यात साम, दाम, दंड आणि भेद अशा साऱ्या मार्गांचा बिनदिक्कत अवलंब केला जातो आणि लोकशाहीबद्दल बोलताना हे सारे प्रमाद भोळ्याभाबड्या माणसांनी नजरेआड करावे अशी त्यांची अपेक्षा असते. लोकशाही हे अमेरिकेच्या लेखी एक चमकदार वेष्टन आहे आणि त्याच्या आत भांडवलाधिष्ठित कल्पनांचं चॉकलेट गुंडाळलेलं आहे. नेमक्या याच चॉकलेटला कॅस्ट्रोनी विरोध केला आणि त्यामुळे त्यांच्यावर अमेरिकेची वाकडी नजर पडली. ते अमेरिकेच्या रोषाला पात्र ठरले. हे वास्तव जर आपण समजून घेतलं नाही तर आपण कॅस्ट्रोंवर सरधोपट टीका करत राहू. त्यांच्या विरोधात असलेले सर्वजण जणू काही निर्मळ मनाने हे काम करीत होते असे गृहीत धरू; आणि कॅस्ट्रो हे जणू काही एकमेव हुकूमशहा आहेत असं भाबडेपणाने मानत राहू. जेव्हा सद्दाम हुसेन अमेरिकेचा मित्र होता तेव्हा त्याने त्याच्याच जनतेवर केलेल्या अत्याचारांबद्दल अमेरिकेच्या सिनेटमध्ये निषेधाचा ठरावही अमेरिकेने येऊ दिला नाही. तेव्हा अमेरिकेच्या लोकशाहीच्या प्रेमाबद्दल न बोललेलंच बरं. निरनिराळ्या वित्तसंस्था, स्वयंसेवी संस्था, लष्कर, मदतीचा पैसा, भ्रष्टाचार या साऱ्यांतून विविध मार्गाने ज्या लोकशाहीचा आविष्कार होत असतो ती लोकशाही आणि कॅस्ट्रोसारख्यांचा समाजवाद ह्या कल्पना जवळजवळ परस्परविरोधी आहेत असं म्हणता येईल. कॅस्ट्रोनी आपल्या आयुष्यात या साऱ्या लोकशाहीपासून दूर राहणं पसंत केलं आणि त्यांच्यावर हुकूमशाहीचा शिक्का बसला. ज्या आर्थिक निर्बंधांच्या वेढ्यात क्यूबा अजूनही अडकलेला आहे, त्या संदर्भातच कॅस्ट्रोसारख्यांच्या समाजवादाचा आविष्कार लक्षात घेणं आवश्यक आहे.

लोकशाही आणि हुकूमशाही यांच्यात विविध स्तर आहेत काय हा प्रश्न स्वत:ला विचारला तर गुंतागुंतीचं वास्तव समजायला कदाचित मदत होईल.

दुसरं म्हणजे आपण कुठल्या दृष्टीने कॅस्ट्रोकडे पाहतो हेही लक्षात घेणं आवश्यक आहे. कॅस्ट्रो हे कठोर आदर्शवादी आहेत आणि कोणतीच तडजोड न करता त्यांनी आपला आदर्शवाद राबवला आहे. हे करत असताना सतत त्यांची नजर सर्वांत तळाच्या माणसाकडे असते हे आपण इथे लक्षात घेणं आवश्यक आहे. सामाजिक विचाराच्या क्षेत्रात वाढ आणि संपत्तीचं न्याय्य वाटप असे दोन शब्द सतत वापरले जातात. यापैकी वाढ हा शब्द भांडवली अर्थशास्त्र मानतं आणि समाजवादी मंडळी सतत संपत्तीच्या न्याय्य वाटपाबद्दल बोलतात. पण होतं असं की पहिल्या

विचारात संपत्तीच्या न्याय्य वाटपाकडे दुर्लक्ष होत राहतं आणि समाजवादात वाढ होत नाही. यापैकी कॅस्ट्रोनी आपल्या समजेप्रमाणे समाजाच्या तळच्या वर्गाकडे पूर्ण लक्ष दिलं पण क्यूबाची अर्थव्यवस्था बहुतेक वेळा कुंठितावस्था राहिली.

जागतिकीकरणाबद्दल जेव्हा एवढा गवगवा सुरू आहे तेव्हा कॅस्ट्रो यांच्या आंतरराष्ट्रीय वादाबद्दल बोललं जात नाही हा केवढा विनोद आहे? जागतिकीकरण आणि फिडेल यांचा आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन ही खरं तर दोन टोकं आहेत. जागतिकीकरणाचं इंजिन आंतरराष्ट्रीय भांडवल आहे तर कॅस्ट्रोंचा आंतरराष्ट्रवाद त्याच्या मनुष्यकेंद्री समाजवादी दृष्टिकोनातून स्फुरलेला आहे. विकसनशील देशांमध्ये जिथे जिथे आपत्ती येतात तिथे क्यूबाची वैद्यकीय पथकं जाऊन मदतकार्य करतात. पाकिस्तानात अलीकडेच झालेल्या भूकंपातही या पथकांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. एकूण अठरा देशात क्यूबाचे सुमारे २९००० वैद्यक तज्ज्ञ आरोग्यसेवा पुरवीत आहेत. अमेरिकेत हाहाकार उडवणाऱ्या कतरीना वादळाच्या वेळी खुद्द अमेरिकेला क्यूबाने वैद्यकीय पथकं देऊ केली होती. मात्र अमेरिकेने क्यूबाच्या आवाहनाला उत्तरसुद्धा पाठवलं नाही. अनेक विकसनशील देशातल्या लोकांवर क्यूबाच्या डॉक्टरांनी हजारो शस्त्रक्रिया केल्या आहेत आणि त्याही मोफत. क्यूबाचे आरोग्यविषयक अनेक निर्देशांक प्रगत राष्ट्रांची बरोबरी करणारे आहेत.

**क्यूबाच्या अठ्ठावीस वैद्यकीय कॉलेजांतून सुमारे बावीस हजार विद्यार्थी आज शिक्षण घेत आहेत. हे विद्यार्थी तीस देशांतून आलेले आहेत. या सर्वांच्यात एकच सामायिक गोष्ट आहे. ती म्हणजे या साऱ्या विद्यार्थ्यांना एरवी हे शिक्षण घेता आलं नसतं. बहुतेक वेळा जवळजवळ सारा खर्च क्यूबाचं शासन करतं. कधीकधी व्हेनेझुएला त्यासाठी मदत करतो. गंमतीची गोष्ट म्हणजे खुद्द अमेरिकेतून क्यूबामध्ये जाऊन शिक्षण घेतलेल्यांची पहिली बॅच गेल्याच वर्षी बाहेर पडली. यात अमेरिकेच्या गरीब घरातले विद्यार्थी होते.**

क्यूबाच्या अठ्ठावीस वैद्यकीय कॉलेजांतून सुमारे बावीस हजार विद्यार्थी आज शिक्षण घेत आहेत. हे विद्यार्थी तीस देशांतून आलेले आहेत. या सर्वांच्यात एकच सामायिक गोष्ट आहे. ती म्हणजे या साऱ्या विद्यार्थ्यांना एरवी हे शिक्षण घेता आलं नसतं. बहुतेक वेळा जवळजवळ सारा खर्च क्यूबाचं शासन करतं. कधीकधी व्हेनेझुएला त्यासाठी मदत करतो. गंमतीची गोष्ट म्हणजे खुद्द अमेरिकेतून क्यूबामध्ये जाऊन शिक्षण घेतलेल्यांची पहिली बॅच गेल्याच वर्षी बाहेर पडली. यात अमेरिकेच्या गरीब घरातले विद्यार्थी होते.

आपल्या देशातलं प्रत्येक मूल शाळेत गेलं पाहिजे यावर कॅस्ट्रोचा कटाक्ष असतो. एवढंच नव्हे तर त्याला पुरेशा कॅलरीज मिळाल्या पाहिजेत याबद्दल ते आग्रही आहेत. सव्वा कोटी लोकसंख्येच्या क्यूबात शंभरी पार केलेल्या सुमारे तीन हजार व्यक्ती आहेत हीच गोष्ट पुरेशी बोलकी आहे. साऱ्या जगाचं वैभव एका मक्याच्या दाण्यात सामावू शकतं असं कॅस्ट्रोचं म्हणणं आहे. हवानाच्या रस्त्यावर लावलेल्या एका फलकाचं चित्र नुकतंच पहायला मिळालं होतं. त्यात म्हटलं होतं, 'घर नसल्यामुळे जगातली कोट्यवधी मुलं रस्त्यावर झोपतात, हवानामधलं एकही मूल रस्त्यावर झोपत नाही. गांधीजींच्या अंत्योदयाचं स्वप्न तरी याहून कुठे वेगळं होतं?'

कॅस्ट्रोंच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत; आणि ते संबंधित घडामोडींसह लिहायचे झाले तर एखादं पुस्तकच लिहावं लागेल. कॅस्ट्रोची स्मरणशक्ती उत्कृष्ट आहे असं म्हटलं जातं. कॅस्ट्रोच्या वाचनाबद्दल अनेक दंतकथा प्रसिद्ध आहेत. गॅब्रियल गार्सिया मार्किझ हा जगप्रसिद्ध लेखक कॅस्ट्रोचा मित्र. जेव्हा आपलं लिखाण तो कॅस्ट्रोना वाचायला देई तेव्हा नंतरच्या काहीच दिवसात कॅस्ट्रो त्यावर खुणा करून ठेवत आणि मग त्यांच्या त्यावर चर्चा होत.

क्यूबाची क्रीडा क्षेत्रातील भरारी हा जगातला आणखी एक कौतुकाचा विषय आहे. मुंबईएवढी लोकसंख्या असलेल्या क्यूबाने ऑलिंपिकमध्ये आतापर्यंत असंख्य पदकं मिळवली आहेत. भारतासारख्या भल्या मोठ्या देशाला आजपावेतो एखाद्याच पदकावर समाधान मानावं लागलं आहे.

आणखी एका गोष्टीचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. क्यूबामध्ये तुम्ही कुठेही जा; तुम्हाला सगळीकडे संगीत भेटत राहील असा उल्लेख मी नुकताच एका पुस्तिकेत वाचला आणि ती पुस्तिका क्यूबाच्या कम्युनिस्ट पक्षाने प्रसिद्ध केली नव्हती; तर एका प्रवासी गाईडमध्ये ही माहिती होती.

थोडक्यात म्हणजे जे जे काही मानवी होतं ते सारं साधायचा कॅस्ट्रोनी प्रयत्न केला. अगदी कठोरपणे केला. ह्यूगो चावेझसारखे कॅस्ट्रोचे मानसपुत्र आज कॅस्ट्रोंचा विचार पुढे नेत आहेत. जोडीला एवो मोरालेस (बोलिव्हिया), राफेल कोरिया (इक्वाडोर) अशा नेत्यांची नवी पिढी पुढे सरसावली आहे. पण या साऱ्यांनी कॅस्ट्रोचा कठोर आदर्शवाद जपण्याऐवजी मधला मार्ग पसंत केला आहे. नवभांडवलशाहीच्या अतिरेकात जनतेला वाऱ्यावर सोडून दिलं जात होतं; त्याऐवजी त्यांनी जनतेचे प्रश्न सोडवण्यावर भर दिला आहे. आणि कॅस्ट्रोची भूमिका अनुभवी वडीलधाऱ्यांची आहे. त्यात नवे नेते यशस्वी होतील का? की कायम मध्यम मार्गातच अडकून पडतील? कॅस्ट्रोसारखं साहस आणि तशी धडक त्यांना देता येईल का? काही झालं तरी कॅस्ट्रोचं काम असंख्य माणसांना स्फूर्ती देत राहील यात शंका नाही.

**अशोक राजवाडे**

ashokrajwade@gmail.com

बी-३०२, अमिषा अपार्टमेंट, लक्ष्मण म्हात्रे मार्ग, नवागाव, दहिसर (प.), मुंबई ४०००६८.

फोन : ०२२-२८९५३६१२, भ्रमणध्वनी : ९२२३२४७४१२.

# जगावेगळी वेदना

## ग. प्र. प्रधान

**माझा रिझल्ट कळल्यावर माझ्या पत्नीला, घरच्या सगळ्यांना आनंद झाला. मी मात्र कमालीचा दु:खी झालो. सर तो थिसीस माझा नाही, त्याच्यातले अनेक भाग मॅनिप्युलेट केलेले आहेत. त्या निष्कर्षांना प्रयोगांचा आधार नाही. माझा थिसीस साफ खोटा आहे. अशा खोट्या संशोधनावर माझे भावी आयुष्य उभारले तर मी दरोडेखोर ठरेन. मी बोर्डीला साने गुरुजींची बौद्धिके ऐकली. मी कधी खोटे बोललो नाही. लबाडी केली नाही आणि आता या खोट्या पीएच.डी.च्या आधाराने मी जगायला लागलो तर आज माझा नर्व्हस ब्रेकडाऊन झालाय. सहा महिन्यात मी वेडा होईन. मी ती पीएच.डी घेणार नाही.' प्रभाकर पुन्हा रडू लागला.**

माझा जुना वर्गमित्र चंदू कोष्टी मला भेटायला आला होता आणि नेहमीप्रमाणेच चहा पीत आमच्या गप्पा सुरू झाल्या. मी त्याला म्हणालो, 'तुझ्या पुतण्याला प्रभाकरला रसायनशास्त्रात पीएच.डी. मिळाली हे काही दिवसांपूर्वी कळले म्हणून तुमच्या पुण्यातल्या घरी त्याचे अभिनंदन करायला गेलो, परंतु प्रभाकर ठाण्याला आहे आणि आजारी आहे असं समजलं, काय झालंय त्याला?' चंदू म्हणाला, 'आज तेच तुला सांगायला आलोय. डॉक्टरांच्या मते 'नर्व्हस ब्रेकडाऊन' आहे. मानसिक ताण असह्य झाल्यामुळे हे झालं असावं असं डॉक्टर म्हणतात.

'म्हणजे काळजीच आहे की रे, पण मानसिक ताण येण्याचं कारणच काय?' मी विचारले. चंदू म्हणाला, 'तो कोणाशी धड बोलत नाही. तो इथं फर्ग्युसन कॉलेजमध्ये एफ.वाय.ला शिकायला आला तेव्हापासून तू त्याला ओळखतोस. त्याला तुझ्याबद्दल फार आदर वाटतो आणि विश्वासही वाटतो. मला तुझी मदत पाहिजे. तो तुझ्याशीच त्याच्या मनातलं बोलेल. चार-पाच दिवसांनी माझा भाऊ त्याला इथं घेऊन येईल, नंतर मी तुला घरी घेऊन जाईन. तूच बोल आमच्या प्रभाकरशी.' 'बोलेन की, मला जे करणं शक्य आहे ते करीन. प्रभाकर काही करून बरा झाला पाहिजे.'

चंदू माझ्याकडून गेल्यावर मी विचार करू लागलो. मला कितीतरी जुन्या आठवणी आल्या. कोष्टी हे भिवंडीचे सधन कुटुंब. ते व्यापारी होते. चंदू हा मॅट्रिक झाल्यावर पुण्याला शिकायला आला. त्याची हायस्कूलमध्ये शिकणारी दोन धाकटी भावंडेही त्याच्याबरोबर आली. त्यांची एक काकी त्यांच्याजवळ राहिली आणि कोष्टी मंडळींनी पुण्यात बिऱ्हाडच केलं. प्रभाकर हा चंदूच्या सर्वांत थोरल्या भावाचा मुलगा. त्याच्या वडिलांनी त्याला ठाणे जिल्ह्यातच बोर्डीला वसतिगृहात शिकायला ठेवलं होतं. चंदू आणि मी एफ्.वाय.आर्टस् पासून बरोबर होतो. बी.ए. झाल्यावर तो घरचा व्यापारी व्यवसाय करू लागला. मी एम.ए. झाल्यावर फर्ग्युसन कॉलेजमध्येच शिकवू लागलो. चंदू पुण्याला आला की माझ्या घरी येई. आमच्या आयुष्याचे प्रवाह वेगळे झाले होते, पण मैत्री मात्र कायमच राहिली. चंदूचा पुतण्या बोर्डीच्या हायस्कूलमधून मॅट्रिक झाला आणि एफ.वाय. सायन्सला आमच्याच कॉलेजात शिकू लागला. चंदू त्याला घेऊन माझ्याकडे आला. 'हा माझा पुतण्या प्रभाकर. बोर्डीला शिकायला होता तो. तुमच्या सेवादलात जातो. साने गुरुजी बोर्डीला त्यांच्या भावाकडे जात असत. तो त्यांचा भाऊ हायस्कूलमध्येच शिक्षक होता. त्यामुळे साने गुरुजी बोर्डीला गेले की शाळेतील विद्यार्थ्यांना गोष्टी सांगत. आमच्या प्रभाकरने साने गुरुजींनी सांगितलेल्या गोष्टी ऐकल्या आहेत. साने गुरुजींचे साहित्यही त्याने वाचले आहे, पण त्याला विज्ञानाची आवड आहे म्हणून फर्ग्युसनला एफ.वाय. सायन्समध्ये नाव घालायला मी सांगितले. तू तिथे शिकवतोस. आमच्या प्रभाकरवर लक्ष ठेव, त्याला फर्स्ट क्लास मिळाला पाहिजे इंटरसायन्सला.'

प्रभाकर नंतरही मला भेटला. तो अभ्यासू होता. पण मी फिजिक्स शिकवणाऱ्या माझ्या सहकाऱ्याला विचारले तेव्हा तो म्हणाला, 'कोष्टी अभ्यासू आहे, बुद्धिमान आहे पण फर्स्टक्लास विद्यार्थी नाही, प्रभाकरला इंटरसायन्सला सेकंड क्लास मिळाला. त्याला मेडिकलला प्रवेश न मिळाल्यामुळे तो बी.एस्सी.ला बॉटनी झुऑलजी घेऊन शिकू लागला. त्याला प्राध्यापक व्हायचे होते, परंतु एम.एस्सीला त्याला दुसरा वर्गही मिळाला नाही. तो फार निराश झाला. तो माझ्याकडे आला तेव्हा मी त्याला म्हणालो, 'तुमची परिस्थिती चांगली आहे. आत्ताच नोकरी करण्याची तुला जरूरी नाही, तू पीएच.डी हो म्हणजे तुला नंतर लेक्चररशिप मिळेल.' मी माझा मित्र चंदू यालाही हेच सांगितले. चंदू म्हणाला, 'आमच्या घरी सगळेजण घरचा व्यवसायच पाहतात. प्रभाकरला खुशाल आणखी दोन-तीन वर्षे शिकू दे. मात्र आम्ही आता त्याचे लग्न करून टाकणार आहोत.' कोष्टी कुटुंब जुन्या वळणाचे होते. प्रभाकरचे लग्न मॅट्रिक झालेल्या एका साध्या, सरळ मुलीशी झाले. ती काही दिवस भिवंडीस राहिली आणि नंतर पुण्यालाच आली. पुण्यात बिऱ्हाड असल्यामुळे चंदूच्या दुसऱ्या भावांची मुले पुण्यातच शिकायला आली होती.

प्रभाकर काही दिवसांनी माझ्याकडे आला होता, तो फार निराश दिसला. तो मला म्हणाला, 'सर मला पीएच.डीला गाईडच मिळत नाही. लेक्चररशिपही मिळत नाही. मी आता काय करू?' मी म्हणालो, 'बॉटनी हा माझा विषय नाही, त्यामुळे तुझ्या प्रबंधाचा काय विषय असावा हे मला सांगता येणार नाही, पण पुणे विद्यापीठातील बॉटनीचे विभागप्रमुख डॉ.महाबळ माझ्या ओळखीचे आहेत. मी पाहतो तुला काही मदत करता येते का ते. त्यानंतर तीन-चार महिने काही जमले नाही. नंतर डॉ.महाबळांना

मी पुन्हा भेटलो. ते म्हणाले, 'पुण्याच्याच ॲग्रिकल्चर कॉलेजमधील एका प्राध्यापकाला नुकताच पीएच.डीचे गाईड म्हणून मान्यता मिळाली आहे. तुमच्या त्या एम.एस्सी झालेल्या विद्यार्थ्याला त्यांना भेटायला सांगा.' प्रभाकरला मी हा निरोप दिला. काही दिवसांनी तो माझ्याकडे आला, खुषीत दिसत होता. 'सर ॲग्रिकल्चर कॉलेजमधील प्रा.ओझा माझे गाईड व्हायला तयार आहेत. ॲग्रिकल्चरच्या संदर्भातील बॉटनीतील एका विषयाचे मला त्यांनी वाचन करायला सांगितले आहे. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली मी अभ्यासाला सुरुवात केली आहे. चार-सहा महिन्यांत मी सिनॉपसिस लिहिले की मला पीएच.डीचा विद्यार्थी म्हणून ओझा सर मला स्वीकारतील.' प्रभाकर पुढे म्हणाला, 'डॉ.ओझा अगदी साधे गृहस्थ आहेत. मला ते म्हणाले, 'भिवंडीचा कोलम तांदूळ फार चांगला असतो. तू मला आणून देशील का? तुम्हाला माहिती आहे की व्यापाराप्रमाणेच भिवंडीजवळ किन्हवलीला आमची शेतीही आहे, मी त्यांना आमच्या घरचे भात आणून दिले.' मला हे थोडेसे चमत्कारिक वाटले, पण मी काही बोललो नाही. सहा महिन्यांनी डॉ.ओझांनी प्रभाकरला पीएच.डी.चा विद्यार्थी म्हणून स्वीकारले.



प्रभाकर पूर्वीप्रमाणे अलीकडे येत नसे. मध्यंतरी तो रस्त्यात भेटला तेव्हा मी त्याला घरी घेऊन गेलो. प्रभाकरने त्याला मुलगी झाल्याचे सांगितले आणि तो म्हणाला, 'तसं घरचे कोणी काही म्हणत नाहीत, पण मी आता एका कोचींग क्लासमध्ये तीन तास शिकवतो.' मी म्हणालो, 'हे ठीक आहे, पण पीएच.डी.चे कुठवर आलंय.' प्रभाकर खिन्नपणे म्हणाला, 'नाही सर फारशी प्रगती नाही.' मी विचारले, 'गाईड मार्गदर्शन करीत नाहीत का?' प्रभाकर म्हणाला, 'ते त्यांच्याच अनेक कामात असतात. मधूनमधून दौऱ्यावरही जातात. मी चाचपडतोय.' मी फारसं काहीच बोललो नाही. मी इतकेच म्हणालो, 'पीएच.डी. लवकर संपव. त्याच्याशिवाय लेक्चरर नाही होता येणार?' प्रभाकरच्या डोळ्यातून पाणी यायला लागले, तो म्हणाला, 'सर काय करावं मला सुचत नाही. डॉ.ओझा काही सांगत नाहीत. फक्त मधूनमधून माझ्याकडे काही मागत असतात. मी वर्षाचे तांदूळ त्यांना देतोच. परवाच त्यांना टी.व्ही. घेऊन दिला. मात्र ते म्हणतात, तू पीएच.डी.ची काळजी करू नकोस. मी त्यांच्या कचाट्यात सापडलोय. काय करावं मला सुचत नाही.' मलाही काही सुचत नव्हते. मात्र मी त्याला म्हणालो, 'डॉ.ओझांचं वागणं बरोबर नाही.' प्रभाकर काहीच न बोलता निघून गेला. चंदू मध्यंतरी आला, त्यालाही काय करावे ते समजत नव्हते. तो मला इतकेच म्हणाला, 'पीएच.डी.ला नाव नोंदवून आता चार वर्षे होतील, पण आमच्या प्रभाकरचं गाडं कुठं अडलंय समजत नाही. मध्यंतरी त्याने गाईड लिहून काही पैसे मिळविले, पण त्यात काय मिळणार?' मी म्हणालो, 'जूनमध्ये पाहू काय ते' आणि अनपेक्षितपणे प्रभाकरला पीएच.डी. मिळाल्याचे समजले. मला हायसे वाटले. पण तितक्यात चंदू आला आणि प्रभाकर आजारी असल्याचे समजले.

चार-पाच दिवसांनी चंदूचा मुलगा आला तो म्हणाला, 'प्रभाकरदादाला इथं आणलंय. तो आजारीच आहे. तुम्ही त्याला पहायला याल का?' 'मी येईन आज संध्याकाळी.' मी सांगितले. संध्याकाळी मी गेलो तर प्रभाकर झोपला होता. मी त्याच्याजवळ गेलो, म्हणालो, 'प्रभाकर उठ पाहू, मी अभिनंदन करायला आलोय, तू पीएच.डी. झालास म्हणून.' प्रभाकर एकदम उठला आणि माझ्या खांद्यावर डोकं टेकून रडायला लागला. मी म्हणालो, 'तू शांतपणे मला सगळं सांग पाहू आधी' मी त्याच्या बायकोला, चंदूलाही दुसऱ्या खोलीत जायला सांगितले. पाच मिनिटांनी प्रभाकर थोडा शांत झाला. मी त्याला म्हणालो, 'सगळं नीट सांग पाहू मला.' प्रभाकर एकदम म्हणाला, 'सर माझी पीएच.डी. खोटी आहे. फ्रॉड आहे. त्या पीएच.डी.च्या आधारानं मी लेक्चरर होणं म्हणजे आयुष्यभर खोटेपणानं जगणं, मला वेड लागेल अशानं.' मला त्याच्या बोलण्याचा नीट अर्थ कळत नव्हता. तो पुढे म्हणाला, 'सर मी फार दुर्दैवी आहे' आणि पुन्हा रडायला लागला. मीही फार अस्वस्थ झालो. पण मी त्याला म्हटले, 'प्रभाकर रडण्यानं तुझा प्रॉब्लेम सुटणार नाही. तू मला सगळं नीट सांग नंतर त्याने जे सांगितले, त्यामुळे मीही चक्रावून गेलो. प्रभाकर सांगू लागला. 'चार वर्षांपूर्वी डॉ.ओझा सरांनी मला पीएच.डी.साठी विद्यार्थी म्हणून घ्यावयाचे कबूल केल्यावर ते मला म्हणाले, 'तू आधी इंग्रजी टायपिंग आणि शॉर्टहँड शिकून घे.' मला काही समजेना. मी त्यांना म्हणालो, 'सर आपण मी लिहिलेले सिनॉपसिस तपासून दिल्यावर मी आपल्या सांगण्याप्रमाणे काही प्रयोग करून संशोधनाला सुरुवात करायची असे मला वाटले होते.'

सर एकदम रागावले आणि म्हणाले, ‘माझ्या हाताखाली काम करायचं असेल तर मी सांगतो तसं ऐकलं पाहिजे.’ मी मुकाट्याने टायपिंगच्या क्लासमध्ये नाव घातले. चार महिन्यांनी टायपिंग आणि शॉर्टहँडच्या परीक्षेत मी पास झालो. त्यानंतर मी ओझासरांच्याकडे गेलो आणि त्यांना टायपिंग आणि शॉर्टहँडचा कोर्स पुरा केल्याचे सांगितले. ते म्हणाले, ‘आता एक इंग्लिश टाइपरायटर घे आणि रोज सकाळी दोन तास माझ्याकडे येत जा.’ मी जाऊ लागलो. ओझासर त्यांच्या कामाची पत्रे मला डिक्टेट करीत. मी ती शॉर्टहँडमध्ये घेत असे आणि घरी येऊन नव्याने विकत घेतलेल्या टाइपरायटरवर ती टाइप करून दुसऱ्या दिवशी सरांना देत असे. आणि एखादा दिवस सरांची लहर लागली की ते माझ्या प्रबंधाच्या विषयावर पंधरा-वीस मिनिटे बोलत आणि मला काय वाचायचे ते सांगत. अशीच दोन वर्षे गेली. मी एकदा धीर करून सरांना म्हणालो, ‘सर मला आता प्लॅण्ट पॅथॉलॉजी हा विषय बराच समजला आहे. पण मी लॅबोरेटरीत प्रयोग करायला केव्हा सुरुवात करू.’ डॉ.ओझा म्हणाले, ‘तुला अद्याप बरेच वाचन केले पाहिजे, मग मी तुला तू कोणते प्रयोग कर ते सांगेन.’ अशी तीन-साडेतीन वर्षे गेली. डॉ.ओझा त्यांच्या विषयाच्या परिषदांमधील निबंध मला डिक्टेट करीत. मी त्यांना निबंध टाईप करून दिल्यावर त्यात दुरुस्त्या करून पुन्हा टाईप करायला लावीत. माझ्या सहनशक्तीचा अंत झाला. संशोधनाबाबत मी नुसता चाचपडत होतो. डॉ.ओझा काही मार्गदर्शन करीत नव्हते. मधून मधून माझ्याकडून काही वस्तू मागत. पैसे मागत आणि मी ते त्यांना देत राहिलो. शेवटी चार महिन्यांपूर्वी मी त्यांच्याकडे गेलो आणि त्यांना सांगितले, ‘मी आपल्या घरासमोर स्वत:ला जाळून घेणार आहे’ हे ऐकून मात्र ते धास्तावले. ते मला म्हणाले, ‘तुला पीएच.डी. व्हायचंय ना? काही काळजी करू नकोस उद्या तुझे सिनॉपसिस आण.’ मी ते घेऊन गेलो. त्यांनी ते फाडून टाकले आणि मला म्हणाले, ‘मी तुला डिक्टेट करतो ते लिही. मग त्यांनी मला नवीनच सिनॉपसिस डिक्टेट करून ते टाईप करायला लावले. ते म्हणाले, ‘हे माझ्याकडे ठेव आणि महिन्यानंतर माझ्याकडे ये. तुला पीएच.डी.चा थिसीसच डिक्टेट करीन. मात्र पंधरा दिवसांनी पाच हजार रुपये घेऊन ये. मी जुगार खेळायचे ठरविले होते. बायकोला न कळवता माझ्या ताब्यात असलेले तिचे दागिने गहाण टाकले आणि तीन हजार रुपये आणले. त्या सावकाराने मला आणखी दोन हजार रुपये मी प्रॉमिसरी नोट लिहून दिल्यावर दिले. मी ते डॉ.ओझांना नेऊन दिले. ते म्हणाले, ‘आता काळजी करू नको. उद्यापासून रोज सकाळी दोन तास आणि संध्याकाळी दोन तास येत जा. मी तुला डिक्टेट करीन ते लिहून घे.’ आणि ते मला रोज थिसीस डिक्टेट करू लागले. मी त्यांना म्हणालो, ‘यात लिहिलेले प्रयोग मी केले नाहीत. मला ओरलमध्ये काही विचारलं तर माझी फजिती होईल.’ ओझा माझ्यावर भडकले, ‘तुला पीएच.डी. व्हायचंय ना? मी सांगतो ते लिहून घे. नंतर महिनाभर ते घरी घोकून ठेव, त्यानंतर तुझी ओरल होईल. महिन्याभरात प्रबंधाचे डिक्टेशन संपले. मी तो थिसीस टाईप करून आणला. सरांनी तो तपासला. त्यात बऱ्याच दुरुस्त्या केल्या. मला त्याच्या पुन्हा दोन प्रती टाईप करून आणायला सांगितल्या. टायपिंगचे पैसे मी काकांच्याकडून घेतले. त्यानंतर मी महिनाभर त्या थिसीसचा अभ्यास करीत होतो. काही अडले तर सरांच्याकडे जाई. ते मला काहीतरी समजून सांगत. एक महिन्याने माझा प्रबंध स्वीकारला गेल्याचे डॉ.ओझांनी मला सांगितले. नंतर काही दिवसांनी माझी ओरल होती. डॉ.ओझा मला म्हणाले, ‘या ओरल घेणाऱ्यांची मला सरबराई करावी लागेल. तू दोन हजार रुपये आण.’ मी पुन्हा कोणालाही न कळवता कर्ज काढले. ओरल बरी झाली आणि महिन्याभरात माझा रिझल्ट लागला. माझा पीएच.डी.चा प्रबंध परीक्षकांनी मान्य करून मला पीच.डी. द्यावी असे माझे गाईड डॉ.ओझा यांच्यामार्फत पुणे विद्यापीठाला कळवले. माझा रिझल्ट कळल्यावर माझ्या पत्नीला, घरच्या सगळ्यांना आनंद झाला. मी मात्र कमालीचा दु:खी झालो. सर तो थिसीस माझा नाही, त्याच्यातले अनेक भाग मॅनिप्युलेट केलेले आहेत. त्या निष्कर्षांना प्रयोगांचा आधार नाही. माझा थिसीस साफ खोटा आहे. अशा खोट्या संशोधनावर माझे भावी आयुष्य उभारले तर मी दरोडेखोर ठरेन. मी बोर्डीला साने गुरुजींची बौद्धिके ऐकली. मी कधी खोटे बोललो नाही. लबाडी केली नाही आणि आता या खोट्या पीएच.डी.च्या आधाराने मी जगायला लागलो तर आज माझा नर्व्हस ब्रेकडाऊन झालाय. सहा महिन्यात मी वेडा होईन. मी ती पीएच.डी घेणार नाही.’ प्रभाकर पुन्हा रडू लागला. मला प्रभाकरच्या पीएच.डी.ची ही दुर्दशा माहीत नव्हती. मी त्याला म्हणालो, ‘प्रभाकर तू आता माझे ऐक. तू पीएच.डी घेऊ नकोस. तू एम.एस्सी परीक्षा पास झाला आहेस. तू एम.एस्सी आहेस. तुला बी.एससी.ला सेकंड क्लास आहेच. एक-दोन वर्षांनी ‘क्लास इम्प्रुव्हमेंट’ स्कीमखाली तू पुन्हा एम.एस्सीला बसून सेकंड क्लास मिळव मग तुला लेक्चरर होता येईल. सध्या ग्रामीण भागात नव्याने जी कॉलेजे निघत आहेत, त्याच्यामध्ये कोठेतरी तुला डेमॉन्स्ट्रेटरची नोकरी मी सहज मिळवून देईन.’ माझे हे बोलणे ऐकून प्रभाकर बराच शांत झाला. मी त्याला म्हणालो, ‘मी उद्या पुन्हा येईन. तू मी आणि तुझा चंदूकाका एकत्र बसू आणि काय ते ठरवू.’ त्याप्रमाणे आम्ही बसलो, मी सांगेन तेथे डेमॉन्स्ट्रेटरच्या जागेसाठी अर्ज करण्याचे प्रभाकरने मान्य केले. त्याचबरोबर त्याला जेथे डेमॉन्स्ट्रेटरची नोकरी मिळेल तिथे तो पीएच.डी. आहे हे सांगायचे नाही हे मी कबूल केले.

या दिवशी प्रभाकर जेव्हा माझ्या खांद्यावर डोके ठेवून रडू लागला तेव्हा त्याच्या पाठीवरून हात फिरवीत मी म्हणालो, ‘वेडा रे वेडा’. पण आज मात्र त्याच्या वेडेपणापुढे माझे शहाणपण बुजून गेले होते. त्याच्या मनाची ही जगावेगळी वेदना पाहून मी चकित झालो होतो. ‘असत्यावर आयुष्य उभे करणार नाही,’ या त्याच्या निर्धाराच्या तेजामुळे व्यवहारी जगाला सरावलेले माझे डोळे दिपून गेले होते.

**ग. प्र. प्रधान**
महाराष्ट्र आरोग्य मंडळ,
माळवाडी, हडपसर, पुणे ४११ ०२८.

**घटना विशेष** चित्रांगदा

# आणीबाणीचे दिवस आणि न्यायमूर्ती खन्ना

भारतातील लोकशाही येथील लोकांच्या समंजसपणामुळे टिकून आहे; नाहीतर अनेक धर्म; भाषा, जाती, संस्कृती असलेल्या या भारतात लोकशाहीची मुळे इतकी खोलवर रुजणे शक्य नव्हते असे बऱ्याच परदेशी अभ्यासकांचे मत आहे. त्याचबरोबर हे श्रेय या देशातील न्यायसंस्थेचेही निश्चितच आहे. अनेक वेळा आज न्यायालये अनेक खटल्यात सत्ताधाऱ्यांना झुकते माप देताना दिसली, तरी येथील न्यायालयात अशाही न्यायमूर्तींच्या न्यायदानाची नोंद आहे की ज्यांनी लोकशाहीच्या आणि घटनेतील मूलभूत तत्त्वांसाठी प्रबळ शासनाशीही झुंज घेतली. १९७१ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत पंतप्रधान इंदिरा गांधींनी सरकारी यंत्रणेचा वापर केला म्हणून त्यांची निवडणूक रद्द ठरवणारे अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री.जगमोहन सिन्हा हे त्याचे एक उदाहरण. उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयांमध्ये गेल्या पन्नास वर्षांत अशा काही न्यायमूर्तींची नावे आपल्याला घेता येतील की जे सत्ता, संपत्ती आणि सरकारी अनुग्रह यांच्यापासून दूर राहिले आणि त्यांनी आपले न्यायदानाचे काम मोठ्या निष्ठेने व चोखपणे सांभाळले. अलीकडेच दिवंगत झालेले न्यायमूर्ती एच.आर.खन्ना हे या अशा तत्त्वनिष्ठ न्यायमूर्तींपैकी एक होते आणि लोकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षक म्हणून त्यांनी आणीबाणीच्या कालखंडात व इंदिरा गांधींच्या शासनाबरोबर झुंज देऊन न्यायसंस्थेच्या कामकाजावर आपल्या नि:स्पृहपणाचा एक ठसा उमटवला.

२६ जून १९७५ या दिवशी तेव्हाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणीबाणी जाहीर करून देशाला एका अंधारयुगात ढकलले. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली त्यावेळी विरोधी पक्षीयांनी इंदिरा गांधींच्या भ्रष्ट राजवटीच्या विरोधात जी आघाडी उघडली होती. आणि आंदोलने सुरू झाली होती, त्यांच्यावर आणीबाणी जारी करून सरकारने प्रहार केला. जयप्रकाशांसहित देशातील सर्व प्रमुख नेते रातोरात पकडले गेले आणि देशभरच्या विविध कार्यकर्त्यांना 'मिसा'खाली (मेंटेनन्स ऑफ इन्टर्नल सिक्युरिटी ॲक्ट) पकडून वेगवेगळ्या प्रांतातील तुरुंगात डांबून ठेवण्यात आले. आणीबाणीतील परिस्थितीबाबत नंतर नेमल्या गेलेल्या 'शाह कमिशन'चा रिपोर्ट सांगतो की भारत संरक्षण कायदा (डिफेन्स ऑफ इंडिया) आणि 'मिसा' या दोन कायद्यांच्या आधारे पकडलेल्या लोकांची संख्या देशात एक लाखाहून अधिक होती. शिवाय अनेक कार्यकर्ते सत्याग्रह करून तुरुंगात जात होतेच. या कायद्यांखाली अटक झालेल्या कार्यकर्त्यांमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट, समाजवादी, जनसंघ व रा.स्व.संघ इत्यादी प्रमुख राजकीय पक्षांचे नेते व कार्यकर्ते होते. वृत्तपत्रे, साप्ताहिके यांच्यावरील सेन्सॉरशिप, भाषणबंदी, सभाबंदी अशा निर्बंधामुळे मूलभूत स्वातंत्र्यांवरच गदा आली होती. बेकायदा कृत्यांना रंगसफेदी करण्यासाठी भराभर केलेल्या घटना दुरुस्त्यांबद्दल न्यायालयांत दाद मागणेही अशक्य होऊन बसले होते. पुण्यात यदुनाथ थत्ते यांच्या निर्भय आणि प्रभावी संपादनाखाली चालवलेल्या 'साधना'ला सरकारने अनेक प्रकारे शह देण्याचा प्रयत्न करून स्वातंत्र्यासाठी उठवल्या जाणाऱ्या आवाजाची मुस्कटदाबी सुरू केली. साधनाने या अन्यायाविरुद्ध न्यायालयात दाद मागितली. या खटल्याचे कामकाज न्यायमूर्ती तुळजापूरकर आणि न्या.गाडगीळ यांच्यासमोर चालले. तब्बल १२ दिवस त्याची सुनावणी झाली आणि ७ डिसेंबर १९७६ या दिवशी 'साधना'वर सरकारने ठेवलेल्या सर्व आरोपातून मुक्त करणारा निकाल या दोन न्यायमूर्तींनी सरकारच्या विरोधात दिला. साधनाने दिलेल्या या प्रदीर्घ लढ्याची कथा 'साधना व्हिंडिकेटेड' या पुस्तकात ग्रथित केली आहे. 'साधना'प्रमाणेच मुंबईच्या 'लोकमित्र सहकारी प्रेस'वरही सरकारने धाड टाकली होती. तिथे समाजवाद्यांचे 'जनवाणी' साप्ताहिक छापले जात होते. त्याचे प्रकाशन बंद करण्यात आले. शिवाय तेथून भूमिगत चळवळीतले

*आता पुन्ना ही बाटली घरामंदी आनलीस ना तर तीच तुज्या टक्कुऱ्यात हानून तुलाच आडवा करीन... 'आडव्या बाटली'ची वाट बघत बसनार न्हाई!*



वाङ्मय छापून वितरित केले जाते, असाही एक संशय होता. शेवटी सरकारने प्रेसला टाळे ठोकले. २२ दिवस प्रेस बंद होता. अखेर उच्च न्यायालयात लोकमित्र प्रेसची बाजू न्यायमूर्ती गोगटे यांनी उचलून धरली आणि प्रेसचे सील काढण्याचा आदेश सरकारला दिला. रत्नागिरीच्या समानता साप्ताहिकालाही अशाच प्रकारे त्रास दिला गेला. त्यांच्याकडून सरकारने जामीनाची मागणी केली. हुकूमशाहीचा असा वरवंटा फिरत असताना संजय गांधींच्या नेतृत्वाखाली देशातले युवा काँग्रेसचे कार्यकर्ते म्हणवणारे मात्र सगळीकडे भरपूर धिंगाणा घालत होते.

या परिस्थितीत मिसाखाली पकडलेल्या कार्यकर्त्यांची न्यायालयीन चौकशी न होता, त्यांना तसेच तुरुंगात डांबून ठेवले जात होते. देशातील सर्व उच्च न्यायालयात त्याविरुद्ध असंख्य अर्ज दाखल होत होते. त्यावर भारत सरकारने असा आक्षेप घेतला होता की या अर्जांना कोणताही कायदेशीर आधार नाही, कारण घटनेचे २१ वे कलम आणीबाणीच्या घोषणेनंतर राष्ट्रपतींकडून रद्द केले गेले आहे. कारण घटनेतील त्या कलमान्वये, कोणत्याही व्यक्तीचे अस्तित्व आणि स्वातंत्र्य यांना कायदेशीर कारवाईशिवाय धक्का लावता येणार नाही हे अधोरेखित होते. भारत सरकारने मांडलेल्या आपल्या भूमिकेनुसार हे कलम रद्द झाल्यावर एखाद्या व्यक्तीची सुरक्षा सैनिकाकडून जरी हत्या झाली आणि जरी ती आकसाने केली गेली असे कोणाचेही म्हणणे असले तरी आणीबाणीत त्याची चौकशी करता येणार नाही; व त्या विरोधात न्यायालयात अर्जही दाखल करता येणार नाही असा त्याचा अर्थ होता. तर अर्जदारांचे असे म्हणणे होते की, 'कायद्याचे राज्य' या संकल्पनेचा पायाच मुळी कायद्याच्या अधिकार क्षेत्रातील कार्यवाहीशिवाय व्यक्तीचे अस्तित्व आणि स्वातंत्र्य यांना धक्का लावता येणार नाही असा आहे; कारण घटना अस्तित्वात येण्यापूर्वीही देशात कायद्याचा अंमल चालू होता. त्यामुळे घटनेतील हा मूलभूत अधिकार रद्द करण्यात आला, तरी अर्जदारांना 'कायद्याच्या राज्या'चे पाठबळ राहतेच. देशातील सात राज्यांच्या उच्च न्यायालयांत अर्जदारांचा हा दावा न्यायमूर्तींनी फेटाळून लावला पण तीन राज्यांत तो मान्य केला गेला. त्यांपैकी एक महाराष्ट्र राज्य होते.

उच्च न्यायालयांच्या विरोधी याचिका नंतर सर्वोच्च न्यायालयात पाच न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर दाखल करण्यात आल्या. सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख न्यायमूर्ती ए.एन.रॉय, न्यायमूर्ती एच.आर.खन्ना, न्यायमूर्ती एम.एच.बेग न्यायमूर्ती वाय.व्ही.चंद्रचूड आणि न्यायमूर्ती पी.एन.भगवती या पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर जबलपूरच्या जिल्हा न्यायाधिशांच्या निर्णयाविरोधात केलेल्या एस.एस.शुक्ला यांच्या 'हेबीयस कॉर्पस केस'ची सुनावणी झाली, हे सर्वच न्यायाधीश अत्यंत मान्यवर आणि ज्येष्ठता क्रमानुसार मुख्य न्यायमूर्तींच्या पदापर्यंत पोहोचलेले होते. देशाचे प्रमुख न्यायमूर्ती बनण्याचा बहुमान त्या साऱ्यांसमोर होता. त्यामुळे सरकार विरोधी निर्णय देण्यातला धोका सर्वांसमोर स्पष्टच होता. या खटल्यात ४ विरोधी १ अशा पद्धतीने निर्णय होऊन श्री.शुक्ल यांची याचिका फेटाळण्यात आली. फक्त न्यायमूर्ती एच.आर.खन्ना यांनी कोणत्याही परिस्थितीत कायदेशीर आधाराशिवाय मानवी जीवित आणि त्याचे स्वातंत्र्य यांची पायमल्ली करता येणार नाही, असे खंबीरपणे प्रतिपादन केले आणि त्याची शिक्षाही भोगली. प्रमुख न्यायाधीश पदावरचा त्यांचा हक्क डावलून सरकारने त्यांच्यापेक्षा सेवेत कनिष्ठ असलेल्या न्यायमूर्तींची वर्णी त्या जागी लावली. एच.आर. खन्ना यांनी ताबडतोब राजीनामा दिला आणि ते न्यायव्यवस्थेपासून दूर गेले. परदेशात या खटल्याचा बराच बोलबाला झाला आणि दडपशाहीला न जुमानता निखळ न्यायाच्या बाजूने उभे राहणाऱ्या एच.आर.खन्नांचे जगातील पत्रकारांनी मुक्तपणे अभिनंदन केले आणि देशातील जनतेसमोर धैर्याचा आदर्श निर्माण केल्याबद्दल सर्व स्वातंत्र्यप्रेमींनी त्यांना धन्यवाद दिले.

अलीकडेच न्यायमूर्ती खन्ना यांच्या निधनाची बातमी वाचली आणि तीस-पस्तीस वर्षांपूर्वीचे ते भयाण दिवस आणि मूलभूत हक्कांसाठी जनतेने चालविलेला संघर्ष डोळ्यांसमोर उभा राहिला. डॉ.आंबेडकरांनी घटना समितीसमोर केलेल्या आपल्या शेवटच्या भाषणात अतिरिक्त व्यक्तिनिष्ठेतून निर्माण होणाऱ्या हुकूमशाहीचा इशारा देऊन ठेवलाच होता; त्याचे या काळात प्रत्यंतर आले आणि तरीही ज्यांनी सर्व प्रकारचे धोके व इंदिरा सरकार आणि त्यांचे मित्र यांनी दिलेली 'देशद्रोही'सारखी विशेषणे पचवून या हुकूमशाहीला प्रतिकार केला, त्या सर्वांच्या अग्रभागी असलेल्या न्यायमूर्ती खन्नांसारख्या व्यक्तींचे स्मरण होऊन मन भरून आले.

**चित्रांगदा**

*नव्या अर्थसंकल्पाविषयी मला अजिबात उत्सुकता नव्हती... निवडणुकांचं स्टेशन जवळ येऊ लागल्यानंतर लालू एक्स्प्रेसच्या ट्रॅकवरूनच चिदंबरम् एक्स्प्रेस धावणार हे अपेक्षितच होतं!*



सत्यातून साहित्याकडे

# निमित्त : खैरलांजी

## अवधूत परळकर

'धादांत खैरलांजी' हे प्रज्ञा पवारांनी लिहिलेल्या नाटकाचं पुस्तक हातात आलं तेव्हा वाटलं, आता काय हे वाचायचं? खैरलांजीला घडलेल्या करुण घटनेवर आजवर वृत्तपत्रात आणि इतरत्र इतकं काही लिहिलं-बोललं आहे, आता पुन्हा नाटकात त्यावर कोण काय वेगळं बोलणार? खैरलांजीसारख्या भयंकर घटनेची कलात्मक रूपं सादर केली जाऊ नयेत असंही मनात कुठेतरी वाटत राहिलं.

मराठी साहित्यविश्वात कविता हे माध्यम प्रगल्भतेनं हाताळणाऱ्या मोजक्या कवयित्री आहेत. प्रज्ञा पवार हे यापैकी एक महत्त्वाचं नाव. त्यामुळे एकीकडे नाटकाबद्दल असा उदास दृष्टिकोन असला, तरी दुसरीकडे चांगली कवयित्री जेव्हा नाटकासारखं माध्यम हाताळते तेव्हा ते ती कसं हाताळते हे जाणून घ्यायची उत्सुकता होती.

'धादांत खैरलांजी' म्हणजे खैरलांजी प्रकरणाची पुनर्भेट नव्हे. खैरलांजीतल्या घटनेचं हे रंगमंचावरलं सादरीकरण नाही. नाटकाच्या सुरुवातीच्या पानातच याचा अंदाज आला आणि बरं वाटलं. घटनेचं सादरीकरण नसलं तरी नाटकाला खैरलांजीमध्ये घडलेल्या त्या भीषण प्रकाराचा संदर्भ अर्थातच आहे.

वैशाली आणि अमिताभ या पुरोगामी दांपत्याच्या जीवनात घडलेल्या लहानशा वादळाची ही गोष्ट आहे. खैरलांजी प्रकरण आणि त्यातून निर्माण झालेले वैचारिक, राजकीय वातावरण याच्याशी या कथेचा काही प्रमाणात संबंध आहे किंबहुना संपूर्ण नाटकावर त्या अन्यायकारक घटनेची आणि प्रशासनानं ज्या निर्दयपणे या घटनेची हाताळणी केली त्या गैरव्यवहाराची छाया आहे... खैरलांजी प्रकरणावर सिनेमा काढण्याच्या उद्देशाने एक निर्माता दांपत्याच्या घरात प्रवेश करतो आणि त्यातून 'धादांत खैरलाजी'मधलं नाट्य आकार घेऊ लागतं. सिनेमावाले नेहमी ताज्या विषयाच्या शोधात असतात. जनमानसात बोलबाला असलेल्या घटनांवर त्यांना सिनेमा बनवायचा असतो. तो त्या घटनांविषयी त्यांना विशेष आस्था, कळकळ असते म्हणून नाही. आपण सदर प्रकरणाकडे एक कमर्शियल वस्तू म्हणून पाहात नसून सामाजिक दायित्वाच्या भूमिकेतून आपल्याला हे प्रकरण पडद्यावर आणायचं आहे असं हे सिनेमावाले खुशाल सांगू द्यात; त्यांचा मूळ हेतू घटनेविषयी जनमानसात असलेल्या कुतूहलाचं, भाव-भावनांचं, वेदना-संवेदनांचं भांडवल करणं हा असतो.

अर्थात हे सर्वसाधारण निरीक्षण झालं. वास्तवाचं कलाकृतीत रूपांतर करू पाहणारे सर्व अप्रामाणिक असतात असं म्हणता येणार नाही. 'धादांत खैरलांजी'मधला खैरलांजीवर सिनेमा बनवायला निघालो इसम मात्र तद्दन व्यावसायिक नजरेतून या घटनेकडे पाहतोय हे त्याच्या संवादातून स्पष्ट होतं.

निर्मात्याला सिनेमाची पटकथा अमिताभ बनसोडेंकडून लिहून हवी आहे. मात्र हे काम देण्यापूर्वी त्यानं स्वत: मनातल्या मनात सिनेमाची रूपरेषा तयार केली आहे. ती तो अमिताभना ऐकवतो. खैरलांजीवर सिनेमा काढू पाहणाऱ्यांचं खरं रूप त्याच्या या निवेदनातून आपल्यासमोर येतं. पटकथेत एक प्रेमप्रकरण असावं असा त्याचा आग्रह आहे. अमिताभ त्याची ही अफलातून कल्पना ऐकून घेतात. पत्नी वैशालीला मात्र राहावत नाही, ती त्यांच्या या कल्पनेला विरोध करते– खैरलांजीसारख्या गोष्टीवर सिनेमा बनवताना अशा गोष्टींची गरजच काय असं तिचं म्हणणं. कोणाही सुबुद्ध व्यक्तीला पटावं अशीच वैशालीची ही भूमिका असते.

या निर्मात्याला हात जोडून दाराचा रस्ता दाखवला असता तर नाटक इथंच संपुष्टात आलं असतं. पण तसं घडत नाही. अमिताभ सुबुद्ध नसतो असं नाही पण वैशालीच्या तुलनेनं तो अधिक सोशिक, अधिक सहिष्णू आणि शांत स्वभावाचा असतो.

अमिताभ शांतपणे निर्मात्याचं म्हणणं ऐकून घेतो. कथानकात प्रेम प्रकरण आणण्याची सूचना तो वरकरणी मान्य करतो तेव्हा त्याच्यासमोर वेगळे हिशेब असतात. कथेत प्रेमप्रकरण आणायचं पण त्याचा वापर सवंगपणे न करता खैरलांजी प्रकरणातून पुढं आलेले मुद्दे अधिक भेदकपणे मांडण्यासाठी करायचा असं अमिताभ मनाशी योजतो.

**वैशाली या शापाची बळी आहे. प्रतिकूल वातावरणात लढताना प्रत्येक पातळीवर तिला होणारा मनस्ताप लेखिका आपल्यापर्यंत आणते. रस्त्यावरले लढे तिला स्वत:वरला अन्याय दूर करायला उपयोगी पडत नाहीत. खासदाराच्या हस्तक्षेपानं त्यांच्यावरला अन्याय चुटकीसरशी दूर होतो हे तर खूप छान मांडलं आहे. सामाजिक सत्य मांडताना प्रज्ञाबाई समाज चळवळींकडे रोमँटिक दृष्टिकोनातून पाहात नाहीत. त्यांचा कल वास्तवाचं यथार्थ दर्शन घडवण्याचा आहे. वास्तवाचं साहित्यकृतीत भाषांतर करताना आपल्या पहिल्यावहिल्या नाटकात त्यांनी दाखवलेली परिपक्वता प्रशंसनीय आहे. आजूबाजूला दिसतात अशाच हाडामासाच्या व्यक्तिरेखा प्रज्ञाबाईंनी नाटकात उभ्या केल्या आहेत. नाट्यात्मक परिणाम साधण्यासाठी व्यक्तिरेखांना मुद्दाम धार लावण्याचा प्रयत्न इथं आढळत नाही.**

हे सर्व चालू असताना वैशालीच्या महाविद्यालयातल्या घडामोडींमुळे एक वेगळं तणावपूर्ण नाट्य वैशालीच्या आयुष्यात आकाराला येत असल्याचं सूचित होत राहातं. हळूहळू ते नाटकाचा मुख्य भाग बनून जातं. या नाट्याचा संबंध दूरान्वये खैरलांजी प्रकरणाशी आहे. वैशालीनं खैरलांजी घटनेसंदर्भातल्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतल्यानं महाविद्यालयाचं व्यवस्थापन तिच्यावर नाराज असतं; कोणत्या तरी किरकोळ मुद्याचं निमित्त करून व्यवस्थापन वैशालीची कोंडी करायचे प्रयत्न सुरू करतं.

मानवी समस्या एकात एक गुंतलेल्या असतात. सामाजिक घटना कौटुंबिक वातावरणात खळबळ निर्माण करू शकतात आणि कार्यकर्त्यांच्या घरातील कौटुंबिक ताण-तणाव त्याच्या सामाजिक कार्यावर परिणाम घडवून आणू शकतात. 'धांदांत खैरलांजी' नाटकात या दोन भिन्न वास्तवांची सरमिसळ आहे आणि ती वरकरणी भिन्न असली तरी व्यक्तिगत पातळीवर एकात एक मिसळलेली आढळते. माणसाचं कौटुंबिक विश्व आणि व्यावसायिक विश्व या दोन स्वतंत्र गोष्टी नसतातच.

नाट्यवस्तूंची बैठक केवळ इथं मांडली आहे; त्यातला तपशील टाळला आहे. प्रज्ञा पवारांच्या या नाटकाची समीक्षा यथावकाश नाट्यसमीक्षक करतीलच. खैरलांजीसारख्या वास्तव घटनेला कारणीभूत ठरलेलं जातीय पर्यावरण खेडोपाडी अजूनही आहे. निरनिराळ्या स्वरूपात त्याचे उद्रेक होत राहतात. शहरातल्या समाजाला व्यक्तिगत पातळीवर जातीय मानसिकतेच्या झळा लागत असतात. या वास्तवाच्या नाट्य-रूपांतराचं हे केवळ अवलोकन आहे. वास्तविक या नाटकात रूढ अर्थानं खैरलांजी नाहीच, त्या घटनेचं भांडवल करून आपली तुंबडी भरू पाहणारे लोक आहेत; खैरलांजीचं निमित्त करून आपल्या अवतीभोवती चाललेल्या अन्यायाचं, शिक्षणसंस्थेतल्या दहशतवादाचं जे चित्रण प्रज्ञा पवार यांनी या नाटकात केलं आहे ते महत्त्वाचं आहे.

प्रामाणिक माणसांना संपवून टाकणारा हा दहशतवाद निष्पाप माणसाला जिवंत जाळण्याइतकाच भयानक आहे. स्पष्टवक्तेपणाची जबर किंमत आज संस्थांत काम करणाऱ्या प्रत्येक सुजाण, सत्प्रवृत्त नागरिकाला चुकवावी लागते आहे.

आर्थिक गरज साऱ्यांची कोंडी करते; आणि त्या गरजेपोटी कितीतरी जणांना नोकरीच्या ठिकाणी तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागतो. वैशाली या मनस्वी प्राध्यापिकेचा वरिष्ठांनी केलेला मानसिक छळ मांडून आजचं सामाजिक वास्तव रंगभूमीवर आणायचा प्रयत्न प्रज्ञा पवारांनी केला आहे. वरिष्ठांच्या कृष्ण कारवाया एकीकडे आणि दुसरीकडे सहकारी प्राध्यापकांनी त्यांना दिलेली साथ यामुळे वैशालीची जी घुसमट होते ती वैशालीइतकीच आपल्याला अस्वस्थ करून सोडते.

नाटककारानं रंगवलेलं वैशालीचं व्यक्तिमत्त्व लढाऊ आहे. सामाजिक चळवळीत तिनं सक्रिय भाग घेतला आहे. सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी झटणारी वैशाली; तिच्यावर व्यक्तिगत अन्याय होतो; नोकरी गमावण्याची पाळी येते तेव्हा असहाय बनून गेलेली दिसते. आपली सर्व बाजूने कोंडी करण्याचं सामर्थ्य व्यवस्थेत आहे हे तिच्या लक्षात येतं. थेट भाष्य किंवा निष्कर्षसूचक विधान न करता नाटककारानं, नाट्यतंत्राचा बऱ्यापैकी वापर करून हे वास्तव आपल्यापर्यंत पोहोचवलं आहे. त्यासाठी नाटककाराला कुठेही मेलोड्रामाची मदत घ्यायची गरज भासली नाही. व्यक्तिरेखांची अतिवास्तव 'लार्जर दॅन लाईफ' प्रतिमा निर्माण करायची गरज भासली नाही.

नाटकातल्या सगळ्या घटनांना जातीय परिमाण आहे. पण नाट्यगत विधान करताना लेखिकेनं जात-वास्तवावर भर दिलेला नाही. इथली झुंज प्रामुख्यानं राजकीय ताकद लाभलेली मूल्यहीन व्यवस्था आणि मानवी मूल्यांचा आग्रह धरणारा बुद्धिवादी नागरिक यांच्यात आहे.

संवेदनशील असूनही समरप्रसंगी ठाम बाजू घेऊन व्यवस्थेविरुद्ध उभं राहायला कचरणारा नाटकातला आकाश हा तरुण आजच्या तरुण पिढीचा प्रतिनिधी म्हणता येईल. त्याला वाटणारी असुरक्षितता ही समाजातल्या विघातक शक्तींचं खरंखुरं भांडवल आहे. ठाम भूमिका घ्यायला डगमगणारे आकाशसारखे तरुण अप्रत्यक्षरित्या भ्रष्ट समाजव्यवस्थेचे हितसंबंध सांभाळत असतात, हे वास्तव नजरेआड करून चालणार नाही. लढाऊ वैशाली आणि तिचा मित्र यांच्यातल्या स्नेहसंबंधाची कारणं नाटकात हाताशी लागत नाहीत. कोणत्या समान तत्त्वांवर या दोघांमधली मैत्री आधारित आहे हे कळत नाही. आपल्याला कोंड्यात टाकणारी मित्रत्वाची अनेक नाती आपण समाजात पाहतो, त्यामागे ना लैंगिक जाणीवेचं परिमाण ना वैचारिक समानतेचं अवधान. वैशाली-आकाश यांची मैत्री हा यापैकीच एक प्रकार मानला तर समाज वास्तवातील हाही बारकावा नाटककारानं चांगला टिपला आहे असं म्हणता येईल.

लढाऊ बाण्याची वैशाली आणि चळवळीच्या सहवासात वाढलेला तिचा जोडीदार अमिताभ ही तशी अपवादात्मक माणसं आहेत. वैशालीला महाविद्यालयात ज्या अपमानास्पद प्रसंगांना तोंड द्यावं लागलं तसे प्रसंग इतरांवर ओढवत नसतील असं नाही. पण त्यांची प्रतिक्रिया वैशालीप्रमाणे होत नाही. बोटचेपे धोरण स्वीकारून, वरिष्ठांकडून केले जाणारे अपमान गिळून जगणारी माणसं समाजात विपुल आहेत. संवेदनशील असणं, अन्यायानं उसळून उठणं हा माणसाला मिळालेला शाप आहे की काय असं अशावेळी वाटू लागतं.

वैशाली या शापाची बळी आहे. प्रतिकूल वातावरणात लढताना प्रत्येक पातळीवर तिला होणारा मनस्ताप लेखिका आपल्यापर्यंत आणते. रस्त्यावरले लढे तिला स्वत:वरला अन्याय दूर करायला उपयोगी पडत नाहीत. खासदाराच्या हस्तक्षेपानं त्यांच्यावरला अन्याय चुटकीसरशी दूर होतो हे तर खूप छान मांडलं आहे. सामाजिक सत्य मांडताना प्रज्ञाबाई समाज चळवळींकडे रोमँटिक दृष्टिकोनातून पाहात नाहीत. त्यांचा कल वास्तवाचं यथार्थ दर्शन घडवण्याचा आहे.

वास्तवाचं साहित्यकृतीत भाषांतर करताना आपल्या पहिल्यावहिल्या नाटकात त्यांनी दाखवलेली परिपक्वता प्रशंसनीय आहे. आजूबाजूला दिसतात अशाच हाडामासाच्या व्यक्तिरेखा प्रज्ञाबाईंनी नाटकात उभ्या केल्या आहेत. नाट्यात्मक परिणाम साधण्यासाठी व्यक्तिरेखांना मुद्दाम धार लावण्याचा प्रयत्न इथं आढळत नाही.

संवादात कुठेही भाषिते पेरणं नाही, माणसं माणसासारखी बोलतात. यात विशेष काय असं ज्यांना वाटत असेल त्यांनी मुख्य प्रवाहातली मराठी नाटकं किंवा टीव्ही सिरियल पाहाव्यात.

महाविद्यालयात जे घडलं त्याचं निवेदन ऐकवण्यापेक्षा तिथली प्रत्यक्ष चर्चा रंगमंचावर आणता आली असती तर ती अधिक परिणामकारक ठरली असती, अंगावर येणारी ठरली असती; वैशालीच्या भूमिकेतून लेखिका आपल्याशी बोलते असे वाटणे हे ठीक आहे, पण घरगुती गप्पांमध्ये वैशाली-अमिताभ दरम्यानचे काही संवाद भाषणं दिल्याप्रमाणे लांबलचक झाले आहेत ते खटकतात. अशा स्वरूपाचे किरकोळ दोष नाटकात काढता येतील; पण हे दोष म्हणायचे, की नाटककाराकडून आपल्याला असलेल्या अपेक्षा?

सामाजिक वास्तवाचे निरनिराळे तुकडे 'धादांत खैरलांजी'मध्ये पहायला मिळतात. यातून नाटककारानं समाजाचं जे फाटकं वस्त्र आपल्यापुढे धरलं आहे ते नाटकाला खैरलांजी प्रकरणापलीकडे घेऊन जातं. वास्तवाची समग्रता पकडण्याचा धीट आणि प्रांजळ प्रयत्न म्हणून प्रज्ञा पवारांच्या 'धादांत खैरलांजी' या नाटकाकडे पाहता येईल.

**अवधूत परळकर**
रोझ ब्लॉसम, बी-१२,
शितलादेवी मंदिर मार्ग, माहीम (पू.),
मुंबई ४०० ०१६.


## महाराष्ट्र शासन
## ग्रामविकास व जलसंधारण विभाग
### ब-१ निविदा सूचना क्रमांक ११ सन २००७-०८

खालील कामाच्या ब-१ नमुन्यातील सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे स्थास्तर विभाग, पुणे ६. (दूरध्वनी क्र. ०२०-२६६१२९८६) हे कार्यालय नूतनीकरण कामांशी संलग्न असलेल्या तज्ज्ञ अंतर्गत सजावटदारांकडून मागवीत आहेत. कोरे निविदा संच दिनांक ७/३/२००८ दिनांक १४/३/२००८ या कालावधीत कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, पुणे यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत योग्य ती निविदेची फी रोख स्वरूपात भरल्यानंतर देण्यात येतील. भरून पाठविलेल्या सिलबंद निविदा दिनांक १८/३/२००८ रोजी दुपारी १२-०० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे स्थास्तर विभाग, पुणे ६. यांचे कार्यालयात स्वीकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी दुपारी १५-०० नंतर उघडण्यात येतील.

| कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये | इसारा रक्कम रुपये | कोऱ्या निविदेची किंमत रुपये | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| अ.अ.यांचे कार्यालयाचे नूतनीकरणांतर्गत दरवाजे, खिडक्या दुरुस्त करून रंगरंगोटी करणे. | ७८,७६८/- | ७८८/- | ५००/- | २ महिने |
| अ.अ.यांचे कार्यालयाचे नूतनीकरणांतर्गत अ.अ.यांचे दालनातील खिडक्या, मिटींग टेबल, खुर्च्या करणे. | ९७,३०५ | ९७३/- | ५००/- | २ महिने |

**टीप :**
१. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थास्तर) विभाग, पुणे ६. यांचे कार्यालयामध्ये नोटीस बोर्डावर सविस्तर सूचना पहावयास मिळेल.
२. कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास नोटीशीची प्रत विनामूल्य मिळू शकेल.
३. अंतर्गत सजावटदारांनी याप्रमाणे केलेल्या कामांची यादी सादर करावी. केलेल्या कामांची खातरजमा केल्यानंतर कोरी निविदा देण्यात येईल.
४. कोणतेही कारण न देता कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा वा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

**विलास र. लोंढे**

**कार्यकारी अभियंता**
लघु पाटबंधारे (स्थास्तर) विभाग,
येरवडा पोस्टामागे, पुणे ६.

**विमाका/पुणे/जाहि/७२०/२००७-०८**

परिघावरून...

वैशाली रोडे

**आपल्याला सगळंच करायचं असतं... हेही, तेही, तेही आणि तेही... कधी सगळं जमूनही जातं, पण नेहमीच नाही. 'खूप कामं करते मी... कुणाची मदतच नाही... वेळच मिळत नाही इतर कशाला...' या सगळ्याच्या आपण इतक्या प्रेमात पडलेल्या असतो, की नवऱ्याला आपण कधी मुलांना सांभाळायची, त्यांचा अभ्यास घ्यायची, वरण-भाताचा कुकर लावायची सवयच लावलेली नसते. अशी छोटीछोटी कामं मुलांकडून कधी करूनच घेतलेली नसतात, आणि मग आपल्याला बनायचं असतं सुपरवुमन! सगळी कामं स्वत: करणारी... ऑफिस आणि घर दोन्ही सांभाळणारी...**

# 'सुपर वुमन' की 'सुपर फॅमिली'?

'काय काय करणार... घास घ्यायलाही वेळ मिळत नाही!'

'घरी कुणी आजारी पडलं की मला वाटतं आपणही आजारी पडावं आणि चार दिवस मस्तपैकी झोपून रहावं... पण आजारी पडायलाही फुरसत नसते.'

'काही आयुष्यच नाही गं राहिलंय ऑफिस आणि घर यांशिवाय...'

'या आणि अशाच तऱ्हेच्या एक ना दोन, अनेक वैतागवाण्या प्रतिक्रिया आपण आपल्या मैत्रिणींकडून ऐकत असतो. घर आणि ऑफिस सांभाळता सांभाळता त्यांना करावी लागणारी कसरत पहात असतो, त्यांची होणारी तारांबळ अनुभवत असतो. कधी त्यांच्यासाठी चुकचुकत असतो, हळहळत असतो... आणि मनातल्या मनात म्हणत असतो, 'काय करणार... वुई आर सेलिंग इन द सेम बोट...! आपली परिस्थिती सारखीच आहे!'

चूल आणि मूल यात रमणारी बाई अर्थार्जनासाठी घराबाहेर पडायला लागली... घराबाहेरच्या जगात वावरण्याचा आत्मविश्वास तिला आला आणि मग तिच्या घराबाहेर पडण्याचं कारण केवळ अर्थार्जन उरलं नाही. बुद्धीचा, सर्जनशीलतेचा वापर आणि त्यातून मिळणारं मानसिक समाधान हे उद्देशही तिच्या घराबाहेर पडण्याला जोडले गेले. आता तर असं एकही क्षेत्र नसेल, जिथं स्त्री नाही. पुरुषांची मक्तेदारी मानली जाणारी अनेक क्षेत्रं तिने पादाक्रांत केली आहेत...

सगळीकडे हे आपण वाचत असतो. गेल्या आठवड्यातल्या महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येक ठिकाणी याची उजळणी झाली. वेगळ्या क्षेत्रात करिअर करताना यशस्वी ठरलेल्या स्त्रियांचे ठिकठिकाणी सत्कार झाले. कौतुक झाले. त्यांच्यावर अनेक ठिकाणी छापून आलं. खास स्त्रियांच्या मासिकांचे महिला दिन विशेषांक या सगळ्यांमुळे भरभरून वाहिले. या सगळ्याला जोड होती अधूनमधून होणारी संशोधनं, पाहण्या आणि त्यांचे निष्कर्ष, अहवाल यांची. त्यातूनही सगळीकडे स्त्रियांच्या कर्तृत्वाचं. क्षमतेचं खणखणीत नाणं वाजवलं जात होतं. कुणी म्हणत होतं, स्त्री जात्याच पुरुषापेक्षा कणखर असते... शरीरानेही आणि मनानेही. त्यामुळेच ती भरपूर शारीरिक कष्ट करू शकते. त्याचबरोबर संकटांचाही खंबीरपणे सामना करू शकते. मोठ्या संकटात पुरुष कोलमडून जातो, बाई मात्र जिद्दीने त्यातून उभी राहते...

कुणी कौतुक करत होतं तिच्या 'मल्टिटास्किंग'चं. एकाच वेळी अनेक कामं करण्याच्या, अनेक गोष्टी लक्षात ठेवण्याच्या, अनेक व्यवधानं सांभाळण्याच्या तिच्या क्षमतेचं...

यासाठी फार लांब नकोच जायला, जरा आपली कामं आणि दिवसभरात डोक्यात फिरणारी चक्रं आठवून पहा. पहाटे पाच वाजता गजर होतो, आपण उठतो. उठल्याबरोबर पहिला विचार येतो, ऑफिसमध्ये आज पुढच्या तीन महिन्यांच्या प्लॅनिंगची मीटिंग आहे... काय काय करता येईल... एकीकडे हात काम करत असतात, भाजी चिरून होते, ती फोडणीला जाते... पोळ्या होतात... मुलांना उठवलं जातं... त्यांचं आवरणं, डबे घेऊन त्यांना शाळेत पाठवणं... मग घर आवरणं, स्वत:चं आवरणं.... मधे बेल वाजत असते... कुणीतरी येत असतं... त्यांना हवं ते देणं, हवं ते सांगणं... आवरल्यावर पोटात काहीतरी ढकलणं आणि कधी, कोणत्या गोळ्या घ्यायच्या, ते सासूबाईंना समजावून सांगून बाहेर पडणं... बाहेर पडतो, तेव्हा घर पूर्ण आवरलेलं... स्वच्छ, नीटनेटकं, व्यवस्थित.... आणि ऑफिसमधलं तीन महिन्यांचं प्लॅनिंग डोक्यात तयार!

एखादं गाणं आपण ऐकतो, तेव्हा ते अनेक साऊंड ट्रॅक्सचं मिक्सिंग असतं. आपलं आयुष्यही तसंच असतं. एकाच वेळी अनेक ट्रॅक्स चालू... आपलं आपल्यालाच कौतुक वाटतं... कित्ती करतो आपण!

पस्तिशी उलटून जाते, चाळीशी जवळ यायला लागते आणि मग स्वत:च्या कौतुकाची जागा घ्यायला लागतो वैताग! घरच्या कामात कुणाचीच मदत होत नाही. बरं, ही कामं टाळताही येत नाहीत. घर तर चालायलाच हवं ना! ऑफिसमध्ये जबाबदाऱ्या वाढलेल्या, दिवसेंदिवस जाण्या-येण्याच्या प्रवासाची दगदगही वाढलेली... त्यातून होणारी चिडचीड... आणि मग त्याचा आख्ख्या घरावरही

परिणाम आणि स्वत:वरही... आता उफाळून येते स्वत:बद्दलची कीव, कणव....

त्यातच येतो महिला दिन. सगळीकडे स्त्रियांची कौतुकं. करिअरिस्टिक स्त्रिया सगळ्या. त्यांना हमखास विचारला जाणारा प्रश्न. 'घर आणि करिअर, दोन्ही कसं सांभाळता?'

आणि त्यांचं हसतमुख उत्तर, 'टाइम मॅनेजमेंट! वेळेचं व्यवस्थापन करतो आम्ही, आणि कामांची प्राथमिकता ठरवतो. घरी आमची जास्त गरज असेल तेव्हा ऑफिस मागे सारतो आणि ऑफिसमध्ये अतिशय महत्त्वाचं काम असेल तेव्हा घर... अर्थात आपण ऑफिसला गेला नाही की आपल्या कामांचा चार्ज कुणाकडे तरी देतोच की नाही... तसा तो घरच्या कामांचाही द्यायचा! कधी नवऱ्याकडे, कधी मुलांकडे! दिवसाचे चोवीस तास असतात आणि तेवढ्या वेळात ठराविक कामं करायचीच असतात.... हात तर लागणारच की ती कामं करायला!'

तपशील बदलत असतील, पण बहुतेकींचं उत्तर हेच असतं. आणि नेमका तोच त्यांच्यातला आणि आपल्यातला फरक असतो... आपल्याला सगळंच करायचं असतं... हेही, तेही, तेही आणि तेही... कधी सगळं जमूनही जातं, पण नेहमीच नाही. 'खूप कामं करते मी... कुणाची मदतच नाही... वेळच मिळत नाही इतर कशाला...' या सगळ्याच्या आपण इतक्या प्रेमात पडलेल्या असतो, की नवऱ्याला आपण कधी मुलांना सांभाळायची, त्यांचा अभ्यास घ्यायची, वरण-भाताचा कुकर लावायची सवयच लावलेली नसते. झाडांना पाणी घालणं, फर्निचरवरची धूळ पुसणं अशी छोटीछोटी कामं मुलांकडून कधीच करूनच घेतलेली नसतात. आणि मग आपल्याला बनायचं असतं सुपरवुमन! सगळी कामं स्वत: करणारी... ऑफिस आणि घर दोन्ही सांभाळणारी...

दोन्ही सांभाळलं जात असतं... अगदी छान, व्यवस्थित. फक्त आपण रात्री थकून बिछान्याला पाठ टेकतो तेव्हा आपल्या डोक्यात वैताग असतो आणि सकाळी उठतो तेव्हाही वैताग! कधी वाचायला मिळालेलं नसतं, कधी टीव्हीवरचा एखादा आवडता कार्यक्रम पहायला मिळालेला नसतो, कधी गाण्याच्या कार्यक्रमाला जाता आलेलं नसतं... सगळ्यांचं कारण एकच... भरपूर कामं!

अर्थात शंभर टक्के स्त्रियांना हे आणि हेच लागू पडतं असं नाही. कित्येक जणी घरच्या जबाबदाऱ्या वाटून देऊन स्वत:साठी वेळ काढण्यात यशस्वी होतात. कधी एकट्याच विंडो शॉपिंगला जातात, कधी मैत्रिणींबरोबर ट्रीपला जातात, तर कधी घरचं सगळं नऊ वाजताच आवरून घरातले सर्वजण रात्री बारा वाजेपर्यंत आवडता कार्यक्रम पहात बसतात किंवा चक्क बाहेर फिरायला जातात! पण बहुसंख्य स्त्रियांच्या बाबतीत मात्र....

'मल्टिटास्किंग' हे स्त्रियांचं वैशिष्ट्य आहे. शंकाच नाही. स्त्रिया एकाच वेळी अनेक कामं करू शकतात. आपल्या या क्षमतेबद्दल स्वत:चा अभिमानही बाळगायला हवा. पण एका वेळी अनेक कामं करू शकते म्हणून घरातलं प्रत्येक काम स्त्रीच करेल, असं घरातल्यांनी का गृहीत धरावं? प्रश्न फक्त स्त्रियांनी काम करण्याचा तर आहेच; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचं, घरातल्या इतरांनी त्यांना गृहीत धरण्याचा आहे आणि हे गृहीत धरणं स्वत: स्त्रीला न खटकण्याचा आहे.

ऑफिसमध्ये पोहोचलो की आपण दिवसभरातल्या ऑफिसच्या कामांची प्राधान्यक्रमानुसार यादी करतो आणि एकेक काम झालं की त्यावर टीक करत जातो. घरच्या कामांच्या बाबतीतही आपण असा प्रयोग केला तर... घरातली कामं काही फार बदलत नाहीत, बदलतात ते फक्त त्यांचे तपशील...

रोज रात्री घरातल्या सगळ्यांनी बसून दुसऱ्या दिवशीच्या कामांची यादी करा. आपापल्या वेळेनुसार, क्षमतेनुसार कोणी, कधी, कुठली कामं करायची हे ठरवा. जी कुणालाही जमणार नाहीत ती दुसऱ्या दिवसासाठी ठेवा किंवा ती करणं आवश्यकच असेल तर त्यावर कसा मार्ग काढता येईल याचा सगळ्यांनी मिळून विचार करा.... दिवसाच्या शेवटी सर्व कामं झालेली असतील, तीही तुम्हाला फ्रेश ठेवून!

आणि फक्त तुम्ही 'सुपर वुमन' नाही, तुमचं संपूर्ण कुटुंब 'सुपर फॅमिली' झालेलं असेल!


**वैशाली रोडे**

२०२ माध्यम सोसायटी,
१३९ महात्मा गांधी रस्ता, गोरेगाव (प.)
मुंबई ४०००६५.


*इमाने-इतबारे समदी कर्जफेड केली आणि नंतर कर्जमाफी आली,*
*त्यो धक्का त्यानला सहन झाला न्हाई.*





महाराष्ट्र शासन
नव्या कृषीपर्वाचा प्रारंभ
केंद्र शासनाचा कर्जमाफीचा ऐतिहासिक निर्णय
• ६० हजार कोटींच्या कर्जमाफीने ४ कोटी शेतकऱ्यांना नव्या उमेदीने शेती करण्याची संधी उपलब्ध
• महाराष्ट्रातील ३३ लक्ष शेतकऱ्यांना ९३१० कोटी रुपयांची कर्जमाफी
• जलसिंचनाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी २०,००० कोटी रु.
• राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना देशातील सर्व जिल्ह्यात सुरू करण्यासाठी १६,००० कोटी रु.
• शहरांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी ६८६६ कोटी रु.
• शैक्षणिक सोयी-सुविधा तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी ३४,४०० कोटी रु.
• अल्पसंख्याक विभागासाठी १००० कोटींची तरतूद.
अल्पसंख्याकांची मोठी संख्या असलेल्या २८८ जिल्ह्यात राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखा.
मा. श्रीमती सोनिया गांधी
मा. श्री. मनमोहन सिंह
मा. श्री. शरद पवार
मा. श्री. पी. चिदम्बरम
'आम आदमी' चा सर्वसमावेशक विकास
नजरेसमोर ठेवून घेतलेल्या या निर्णयाबद्दल
महाराष्ट्र आभारी आहे!
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
मा. श्री. विलासराव देशमुख
मा. श्री. आर. आर. पाटील

वाद-संवाद

# एकही प्रतिक्रिया मुख्य मुद्यावर नव्हती म्हणून...

पुरुषोत्तम खाडेकर

२६ ऑक्टोबर २००७ च्या 'साधना' अंकातील 'म्हणून हा खटाटोप' ह्या माझ्या पत्रवजा लेखावर तीन प्रतिक्रिया आल्या. त्यातील एकही प्रतिक्रिया लेखातील मुख्य मुद्यावर नव्हती.

मुख्य मुद्दा, मला साधनेबद्दल काय वाटते किंवा संघ वा भाजपाची भलावण हा नसून, मुसलमानांशी स्पष्ट व परखड संवाद साधण्याची आवश्यकता आहे, तसे करण्यास उपयुक्त परिस्थिती निर्माण झालेली आहे, असा संवाद जो मुसलमानांना परका समजत नाही तोच सुरू करू शकतो व साधना त्यासाठी उपयुक्त व्यासपीठ झालेलं आहे हा होता.

हा लेख लिहिण्याची प्रेरणा मला दोन जाणीवांतून झाली. पंधरा कोटी मुसलमान व ऐंशी कोटी हिंदूंचा हा देश आहे (एक दोन कोटी इकडे तिकडे घ्यावे द्यावे). हिंदू कितीही बहुसंख्य असले तरी मुसलमानांना समुद्रात लोटून, हात झाडून मोकळे होऊ शकत नाही व मुसलमान पुन्हा हा देश फत्ते करून इथे राज्य करू शकत नाहीत. हे स्पष्ट असतानाही स्वातंत्र्याची ६० वर्षे आपण एकमेकांना मारण्या-जाळण्यात घालवली. हे असंच चालू राहील काय व का म्हणून? हिंदूंना मुसलमानांबद्दल माहिती नाही, त्यांच्याशी संबंध नाहीत, बहुसंख्य असूनही त्यांच्याबद्दल भीती आहे, अनेक खऱ्या किंवा काल्पनिक शंका-कुशंका आहेत, ज्यांच्याबद्दल उघड विचारणं शिष्टसंमत मानलं जात नाही.

हे प्रश्न उघड्यात आणले पाहिजेत व एकत्र शांतीने राहण्याची काय किंमत मोजावी लागेल, ह्याची आडपडदा न ठेवता चर्चा झाली पाहिजे.

दुसरी जाणीव होती की आपल्याकडे मुसलमानांनी जगभर चालविलेल्या दहशतवादी कृत्यांची व त्यामागील मन:स्थितीची मूलगामी चर्चा होत नाही. हिंदूंची वृत्ती ''सगळे मुसलमान हे असेच'' ही आहे, सरकारची वृत्ती एकीकडे मुसलमानांचं तुष्टीकरण, जे वास्तवात मुल्ला-मौलवींचं तुष्टीकरणंच ठरतं व दुसरीकडे हा प्रश्न 'कायदे कानून'च्या कक्षेतला आहे हा समज व त्या अनुसार वर्तन अशी आहे.

मुसलमान 'मी नाही' ह्या पावित्र्यात म्हणजे ह्या दहशतवादी कृत्यांना आमचे दुष्मन मुद्दाम वाढवून दाखवितात, असं मुसलमान करीतच नाही दुसरे ही करतात, त्यांना दोष दिला जात नाही, अशा 'मी नाही त्याने केलं' सदृश्य पावित्र्यात. ह्या परिस्थितीत चर्चा कशी होणार?

भाजपाची टीका सतत मुसलमानांच्या प्रश्नावरून होत असते, पण मुसलमानांना खरी भीती स्वत:पासूनच आहे. एकविसाव्या शतकात कुराणाचं अक्षरश: पालन करून कसं जगायचं हा त्यांच्यापुढील प्रश्न आहे. त्यामुळे त्यांच्यात मोठा अंतरकलह निर्माण झालेला आहे. सगळ्या जगात पसरलेला इस्लामी दहशतवाद हा त्याचंच एक फळ आहे.

ह्या कलहात प्रागतिक मुसलमानांना आपलं म्हणणं मांडायची संधीही नाही व व्यासपीठही नाही किंवा नव्हतं. आपल्या प्रश्नावर स्पष्टपणे, परखडपणे पण खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा करण्याचं एक छोटंसं व्यासपीठ मुसलमानांना आहे, ते म्हणजे 'ई टीव्ही' उर्दूचा 'हमारे मसालियात' (आमचे प्रश्न) हा कार्यक्रम. ह्यात युनिव्हर्सिटी व कॉलेजातले प्रोफेसर्स, मोठमोठ्या पदावरून रिटायर झालेले अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, उर्दू वृत्तपत्रांचे संपादक, रिपोर्टस्, स्तंभलेखक, विद्यार्थी वर्ग, स्त्रिया, मुल्ला-मौलवी, मुस्लिम लॉ बोर्डाचे सदस्य, सर्व थरांचे व वर्गाचे मुसलमान असतात. ते मुसलमानांच्या सर्व प्रश्नावर दिलखुलास चर्चा करतात. लग्न, तलाक, चार बायका, दहशतवाद, जगाबरोबर आपण का चालत नाही, त्यात धर्म कुठे आडवा येतो, दुसऱ्या धर्मांच्या लोकांबरोबर रहायचं असेल तर आपल्यालाही चार पावलं पुढे चालावे लागेल ह्याची आवश्यकता, अशा सर्व प्रश्नांची चर्चा होते. ती फार उद्बोधक असते. कधीकधी विषयानुरूप दुसऱ्या धर्मांच्या तज्ज्ञांनाही बोलावलं जातं. कुलदीप नायर व पूर्वीचे लोकसभेचे सेक्रेटरी कौशल, ह्या दोघांनाही मी ह्या प्रोग्राममध्ये ऐकलं आहे.

'साधना'च्या वाचकांनी हा कार्यक्रम बघावा अशी शिफारस मी करू शकतो. मुसलमानांची ओळख करून घेण्यासाठी तर हा फार उपयोगी आहे.

आणखी एक आशादायक घटना मी नमूद करू इच्छितो. ते जे.एस.बंदूकवाला यांचं पत्र. ते बडोद्याचे आहेत, जेथे अहमदाबाद नंतर सगळ्यात जास्त प्रमाणात दंगे झाले होते. त्यांचं पत्र मुसलमानांच्या प्रश्नासंबंधी नसून भारताच्या सर्वसमावेशकतेला अनुसरून आहे. हे पत्र डी.एन.ए. ह्या इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते. सलमान रश्दी व तस्लीमा नसरीन ह्यांची मतं मला पटत नाहीत, पण मी दुसऱ्यांना त्यांची पुस्तकं वाचायला वा त्यांच्याशी सामाजिक वा साहित्यिक संबंध ठेवायला थांबवू शकत नाही असं ते म्हणतात. ते पत्राची सुरुवातच 'भारत एक सर्व धर्मांच्या वा जातींच्या लोकांना आपापसातले मतभेद व टकराव असूनही एकत्र राहणं शक्य असलेला देश बनत आहे' असं प्रशस्तीपत्र देतात व शेवटी सर्वसमावेशक लोकशाही हाच मुसलमानांना न्याय देणारा, समानतेने व आपली अस्मिता जपून राहणं शक्य करणारा समाज असू शकतो असं म्हणतात.

मुसलमानांमध्ये अंतर्मुख होण्याची प्रवृत्ती वाढत आहे. ह्याची कितीतरी उदाहरणं माझ्यासमोर आहेत. त्यातली बहुतेक परदेशातली आहेत. आपल्या देशातही तसं विचार करणारे कितीतरी मुसलमान आहेत. त्यांना बोलकं करणं हे आपलं काम आहे.

(पृष्ठ ३२ वर

## एक गोष्ट आपण तत्काळ अंमलात आणू शकतो...

'आपण समाजवादी आहोत का?' हे 'साधना'च्या १६ फेब्रुवारीच्या अंकातील दत्तप्रसाद दाभोलकर यांचे निवेदन वाचले. त्यांच्या विवेचनातील मुख्य मुद्दा हा अत्यंत विचारार्ह व त्याहून जास्त 'आचारार्ह' असून हा विचार चर्चेसाठी पुढे आणल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

''पण जेथे आपण नक्की काहीतरी करू शकू, अशा गोष्टीतही स्वत:ला समाजवादी म्हणविणारे आपण काय करतो? घरची धुणी-भांडी, केरकचरा काढणारी बाई, स्वयंपाकीण, ड्रायव्हर यांना आपण केवढा नगण्य पगार देतो?'' हा त्यांचा प्रश्न आपण सर्वांनीच स्वत:ला विचारला पाहिजे आणि ही अन्याय्य परिस्थिती बदलण्यासाठी, निदान स्वत:पुरता आपल्या आचरणात विनाविलंब बदल घडवून आणला पाहिजे.

परंतु ज्याने त्याने स्वत:च्या मनाने आपापल्या कामगारांचा पगार वाढविल्याने चांगल्या दिशेने एक पाऊल उचलले गेले, इतकेच फारतर म्हणता येईल. सुधारणा करणाऱ्याची सदसद्विवेकबुद्धीची टोचणी त्यामुळे कमी होईल व कामगारांचाही थोडा लाभ होईल. पण कामगारांना न्याय हक्क व प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने अशा वैयक्तिक सुधारणा ही फक्त वरवरची मलमपट्टी ठरेल. मालकांनी केलेल्या असल्या वैयक्तिक, ऐच्छिक बदलांमुळे कामगार हक्क प्रस्थापित होण्याऐवजी, मालकांमध्ये स्वत:च्या औदार्याचे प्रकटीकरण केल्याचे समाधान व कामगारांमध्ये उपकृत झाल्याची भावना, अशा अनिष्ट भावना रुजतील आणि समाजवादी समतेपेक्षा भूतदयावादी वृत्तीखाली कामगार दडपून जातील.

हे सर्व टाळण्यासाठी व कामगारांना त्यांचे न्याय्य हक्क प्राप्त करून देण्यासाठी समाजवादी विचार-आचारवंतांनी त्वरेने पुढील पावले उचलावयास हवीत.

१. व्यक्तिगत पातळीवर, उदारपणाच्या नव्हे तर कामगार हक्कांच्या दृष्टीने कृती करणाऱ्या व्यक्तींची नावे, पत्ते व त्यांच्या कृतीचा तपशील यांना साधनासारख्या साप्ताहिकात दरमहा प्रसिद्धी देऊन त्यातून अशा व्यक्तींचे गट उभे करण्याचा प्रयत्न करणे.

२. या गटांनी परस्पर विचारांच्या देवाण-घेवाणीतून आपापल्या कामगारांच्या संदर्भात अधिकाधिक न्याय्य कृतींचा अंगिकार करणे.

३. या गटांनी घर-कामगार, मालक व या क्षेत्रातील जाणकार यांच्या समित्या नेमून कामगारांचे वेतन, रजा, कामगार-संरक्षण याबाबत नियमावली तयार करणे.

४. या कामगारांचे वेतन, रजा, कामगार-संरक्षण इत्यादी बाबतीत सरकारने लवकरात लवकर कायदा करून त्याची सत्वर व प्रभावी अंमलबजावणी करावी यासाठी सरकारवर दडपण आणणे.

याबरोबरच या सर्व बदलांचा प्रारंभ म्हणून सर्व समाजवाद्यांना तत्त्वत: मान्य असलेली, पैशाच्या दृष्टीने अंमलबजावणीत अडचण नसलेली आणि कृतीतून कामगारहक्कांचे प्रभावी समर्थन करणारी एक गोष्ट आपण तात्काळ अंमलात आणू शकतो; ती म्हणजे या कामगारांना हक्काची साप्ताहिक सुट्टी मंजूर करणे. माझ्यापुरती ही सुट्टी देण्याचा अनेकवार पुढे ढकलला जाणारा विचार दत्तप्रसाद दाभोलकरांच्या निवेदनामुळे मी तात्काळ सुरू केला आहे. असाच प्रतिसाद देणारे लोक मिळतील व त्यातून एका चांगल्या स्थित्यंतराचा प्रारंभ होईल असा विश्वास वाटतो.

**प्रा.डॉ. अमरजा नेरूरकर**

निवृत्त प्रपाठक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई.

(या विषयावर चर्चा– कृतिशील प्रतिसाद अपेक्षित आहे– **संपादक**)

## असे ताजेपण दुर्लभ आहे

९ फेब्रुवारीचा 'साधना'चा अंक पोचला. त्यात बाबांचे वाक्य संजय जोशी यांच्या लेखाच्या अग्रभागी आहे आणि त्यांचा उल्लेखही शेवटी आहे, हा एक योगायोग म्हणावा!! २ फेब्रुवारीच्या अंकात खूप चांगले लेख आहेत. अग्रलेखही कसदार उतरत आहेत. 'व्यासपीठ' सदर तर बहारीचे आहे. शिक्षणाविषयीचे पानसे व व्यंकटरामन यांचे लेख नव्या दृष्टीच्या कार्यकर्त्यांना खूप प्रेरक आहेत. दोन्ही राजन महोदयांचे लेखदेखील खूप चर्चात्मक आहेत. चित्रकाराला (गिरीष सहस्रबुद्धे) तुम्ही आणखी वाव द्यावा व अंक सजवावा ही विनंती. राजन खान यांच्या लेखावर खूप नवनव्या प्रतिक्रिया येतील, इतका महत्त्वाचा विषय त्यात आहे. साधना कामत यांनी संगीत समीक्षक नाडकर्णी यांचे दोन पानात अप्रतिम व्यक्तिचित्र उभे केले आहे. त्यांनी आणखी खूप माणसे शोधून अशीच दोन पानात सजवावीत. 'प्रतिसाद'मधील पत्रेदेखील विसरता येत नाहीत. वाचन-संस्कृती अभियान आणखी ठिकठिकाणी खूप बहरले असेल. त्यांचेही अहवाल छापावेत.

एन.डी.नं. आर.एन.आय.१६०१/५७
रजि.क्र. एल-२/आर.एन.पी./पी.एन.डब्ल्यू./डब्ल्यू/६८/२००६-२००८
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना नं. ७
पोस्टींग दर गुरुवारी मार्केट यार्ड पी.एस.ओ.सॉर्टींग ऑफिसमधून

शीर्षके व पोटशीर्षके, लेखकाचे नाव इत्यादींबाबत काही एकवाक्यता, समानता, पानांची रचना करणाऱ्यांनी खास ध्यानी घ्यायला हवीत. लेखकांची नावे वेगवेगळ्या अक्षरात, कधी अधोरेखित तर कधी नाही– असतात. पोटशीर्षकात (:–) हे नको. ज्यांना मुद्रणात रस आहे, अशी माणसे 'साधना'च्या मुद्रणावर, प्रत्येक शब्दावर लक्ष देऊन असतीलच. ...खूप नवनवे लेखक व विषय 'साधना'तून येत आहेत, हे असे ताजेपण अतिशय दुर्लभ आहे. अशा कितीतरी लेखातूनच पुढे एका संस्कृतीची रेखावाट तयार होऊ शकते. १९६४ साली यदुनाथजींनी बाबांच्या कार्यावर केवढा अप्रतिम विशेषांक प्रगट केला. त्यानंतर कितीतरी नवनवे प्रकारच सतत आकार घेत राहिले.

**गोपाळ शहा**
बी/१८९ चाणक्यपुरी, बारडोली, जि. सुरत. ३९४६०१.

## कुंदर नव्हे; मनोहर

१६ फेब्रुवारीच्या 'साधना'मधील डॉ.बाबा आमटे यांच्यावरील ग.प्र.प्रधान यांचा 'महामानव हरपला' हा लेख वाचला. गांधीजींच्या कुष्ठरोग्यांची सेवा करणाऱ्या अनुयायींमध्ये कुंदर दिवाण यांचा उल्लेख प्रधानांनी केला आहे. पण नावात त्यांनी गल्लत झाली आहे, प्रधानांना मनोहर दिवाणांचा उल्लेख करावयाचा होता. कुंदर दिवाण हे त्यांचे धाकटे बंधू. ते हयात आहेत. मनोहर दिवाण हे पहिले भारतीय कुष्ठसेवक म्हणून गणले जातात. त्यांच्या कार्याबद्दल त्यांना राष्ट्रपती राजेंद्रबाबूंच्या हस्ते पद्मश्री देण्यात आली. मनोहर दिवाण यांनी १९४० साली वर्धा जवळील दत्तपूर येथे कुष्ठरोग्यांची संस्था स्थापन केली. ही संस्था आजही कार्यरत आहे. १९८० साली मनोहन दिवाण यांचे वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले.

**जयंत दिवाण**, १८/७१ यशवंतनगर, गोरेगाव (प.), मुंबई ६२.

*पृष्ठ ३० वरून)*

मुख्य मुद्दा पुन्हा एकदा मांडून हे पत्र संपवतो. मुसलमान समाज, हिंदूइतकाच 'भारतीय' आहे, इतर सर्व समाजाप्रमाणे त्यालाही काळाप्रमाणे बदलावे लागेल. हा बदल तेच घडवू शकतील, बाहेरच्या शक्ती नाही. त्यासाठी समाजसुधारकही त्यांच्यातूनच पुढे यावे लागतील. तसे काही येत आहेत, पण त्यांना त्यांच्या समाजातून तर नाहीच, पण प्रागतिक हिंदू समाजातूनही मदत व सहारा मिळत नाही. अगदी सोशलिस्ट-कम्युनिस्टांकडूनही नाही. हमीद दलवाई हे ह्याचं एक जुनं उदाहरण आहे. त्यांच्या 'मुस्लिम पोलिटिक्स इन सेक्युलर इंडिया' ह्या पुस्तकाची प्रतही आता मिळत नाही. त्यांना एकटंच लढावं लागलं. तस्लीमा नसरीन ह्या आजचं उदाहरण आहे. कम्युनिस्टांच्या बंगालमध्येही त्या राहू शकत नाहीत.

साधनेने हा विषय जिवंत ठेवावा अशी माझी अपेक्षा आहे, ह्या प्रश्नाची हिंदुत्व, संघ, भाजपा ह्यांच्याशी गल्लत न करता. 'साधना'सारख्या मराठी साप्ताहिकात ह्याची चर्चा करून काय उपयोग? त्याचा आवाज सर्वसाधारण मुसलमानांपर्यंत कसा पोचेल असं कुणी विचारू शकेल. माझं उत्तर आहे की मराठी वाचणाऱ्या हिंदू व मुसलमान वाचकांपर्यंत तरी पोचू शकेल ना?

शिवाय विचारांना पंख असतात हा माझा विश्वास आहे.

**पुरुषोत्तम खांडेकर**
२१२ डी.बी.जे.रोड, बसस्टँड, बांद्रा (वेस्ट), मुंबई ५०.

## 'साधना'च्या वर्गणीत वाढ

प्रिय वाचकहो,

गेल्या पाच वर्षांत एक पैशाचीही वाढ झाली नाही, अशी एखादी गोष्ट आपणास आठवते का? नाहीच आठवणार, कारण सद्य:परिस्थितीत तसे काही नाहीच! परंतु एक अपवाद आहे, तो म्हणजे 'साधना' साप्ताहिकाचा.

साधना साप्ताहिकाची वार्षिक वर्गणी गेल्या पाच वर्षांत अजिबात वाढवलेली नाही. साधना साप्ताहिक दर आठवड्याला ३२ पानांचा अंक, असे वर्षभर (शिवाय ३ विशेषांक) अवघ्या रु.३००/- (व्यक्तीसाठी) व रु.४००/- (संस्थेसाठी) या दराने देते. वर्षभरात या सर्व अंकांची मिळून पृष्ठसंख्या होते : जवळपास १६००. साधना साप्ताहिकाच्या एका पानात, नेहमीच्या आकाराच्या पुस्तकाच्या दोन पानांइतका मजकूर असतो. याचा अर्थ पुस्तकाच्या ३२०० पानांचा मजकूर साधना साप्ताहिक दरवर्षी आपणास देते. सोपा हिशेब करावयाचा तर प्रत्येकी १०० पानांचे एक, अशी ३२ पुस्तकेच साधना आपणास घरपोच देते. अगदी कमी धरली तरी १०० पानी पुस्तकाची किंमत असते किमान रु.५०/-. म्हणजे अत्यंत किफायतशीर बाजारभावानेही साधना साप्ताहिक देत असलेल्या मजकुराचे आर्थिक मूल्य आहे रु.१६००/-.

ही प्रचंड तूट प्रतिवर्षी दिवाळी अंकातील जाहिरातींद्वारे भरून काढणे चालू आहे; परंतु त्यातील अडचणी सर्वजण जाणतातच. म्हणून **१ एप्रिल २००८ पासून** साधनाची वार्षिक वर्गणी **व्यक्तीसाठी रु.४००/-** व **संस्थेसाठी रु.५००/-** करण्यात येत आहे. साधनावरील लोभ यापुढेही असाच चालू ठेवावा ही विनंती.

**– संपादक 'साधना'**